● पुणे, सोमवार, १० मार्च २०२५ ● RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 103 ● वर्ष ४ थे, अंक १०३ ● किंमत ₹ ६ ● पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News




# भारतच 'चॅम्पियन'

## न्यूझीलंडवर ४ गडी राखून दणदणीत विजय



### भारत सलग तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत

● भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासात सलग तिसरा अंतिम सामना खेळत आहे. यापूर्वी, भारताने २०१३ आणि २०१७ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामनाही खेळला होता. टीम इंडियापूर्वी कोणत्याही संघाला चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये सलग तीन अंतिम सामने खेळता आले नव्हते. आता भारताने अशी कामगिरी करत इतिहास रचला आहे. भारताने महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली २०१३ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना खेळला तर २०१७ मध्ये विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना खेळला होता. आता रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली हा सामना खेळला जात आहे.

● सर्वाधिक सलग अंतिम सामने खेळणारे संघ :

● भारत : ३ अंतिम सामने (२०१३, २०१७, २०२५)

● वेस्ट इंडिज : २ अंतिम सामने (२००४, २००६)

● ऑस्ट्रेलिया : २ अंतिम सामने (२००६, २००९)

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दुबई :** चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडला सहा विकेट्सने पराभूत करून विजेतेपद पटकावले आहे. हे भारताचे हे आयसीसी स्पर्धेतील सलग दुसरे जेतेपद आहे. यापूर्वी २०२४ मध्ये टीम इंडियाने टी-२० विश्वचषक जिंकला होता. त्याचबरोबर भारताने १२ वर्षांतर तिसरी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडवर ४ गडी राखून दणदणीत विजय मिळवला आणि ट्रॉफीवर तिसऱ्यांदा भारताचे नाव कोरले. रवींद्र जडेजाने चौकार ठोकत सामना भारताच्या नावावर केला. भारतीय संघाने कोणतीही चूक न करता, तब्बल १२ वर्षांनंतर विजेतेपद पटकावले. रोहित शर्माच्या नेतृत्वाखील टीम इंडियाने वर्षभरात दुसऱ्यांदा आयसीसी ट्रॉफी आपल्या नावावर केली. केएल राहुल २९ धावांवर, तर हार्दिक पांड्या १६ चेंडूत १८ धावांवर नाबाद राहिले. २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी भारतीय संघाला चांगली सुरुवात करून दिली. दोघांमध्ये पहिल्या विकेटसाठी १०५ धावांची भागीदारी झाली. गिलने ५० चेंडूत ३१ धावा केल्या. विराट कोहलीला दोन चेंडूत एकच धावा करता आली.

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यात सामन्यात रोहित शर्माने न्यूझीलंडविरुद्ध ४१ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. आयसीसी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात रोहितचे हे पहिलेच अर्धशतक आहे. त्याने सुरुवातीपासूनच किवी गोलंदाजांविरुद्ध आक्रमक भूमिका स्वीकारली. कर्णधाराने सामन्याच्या दुसऱ्या चेंडूवर षटकार मारला.

न्यूझीलंडने दिलेल्या २५२ धावांचा पाठलाग करताना टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माने उपकर्णधार शुबमन गिलसह डावाची सुरुवात केली. गिलने सावध सुरुवात केली, तर रोहितने वेगाने धावा काढण्याची जबाबदारी घेतली. मिशेल सँटनरने टाकलेल्या ११ व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर धाव घेत रोहित शर्माने आयसीसी फायनलमध्ये आपले पहिले अर्धशतक पूर्ण केले. यासह त्याने न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय क्रिकेटमध्ये १००० धावा पूर्ण केल्या. त्याचबरोबर त्याने पाकिस्तानच्या बाबर आझमला मागे टाकले. रोहित शर्माने न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात १००० धावा पूर्ण केल्या. न्यूझीलंडविरुद्धच्या या सामन्यापूर्वी रोहित शर्माने एकदिवसीय सामन्यात ९९७ धावा केल्या होत्या. म्हणजेच या संघाविरुद्ध १००० धावा पूर्ण करण्यासाठी त्याला फक्त तीन धावांची आवश्यकता होती. त्याने डावातील दुसऱ्या चेंडूवर काइल जेमीसनला षटकार मारला. यासह, त्याने या आपले आक्रमक शैलीत न्यूझीलंडविरुद्ध १००० धावा पूर्ण केल्या, तेही यानंतर रोहित शर्माने बाबर आझमलाही मागे टाकले. पाकिस्तानच्या बाबर आझमने न्यूझीलंडविरुद्ध २३ एकदिवसीय सामन्यांमध्ये १००९ धावा केल्या होत्या, पण रोहितने आता त्याला मागे टाकले आहे. रोहितनेही चौकार मारून हे साध्य केले. ३७ वर्षीय रोहितने अवघ्या ४१ चेंडूत अर्धशतक झळकावल्यामुळे भारताने ८ षटकांत ५० धावांचा टप्पा ओलांडला.

भारताने चांगली सुरुवात केल्यानंतर काही षटकांतच तीन गडी गमावले. कर्णधार रोहित शर्मा ८३ चेंडूत ७६ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. रचिनविरुद्ध मोठा शॉट खेळण्याच्या प्रयत्नात तो यष्टिचित झाला.

त्यानंतर श्रेयस आणि अक्षरने डावाची धुरा सांभाळली. सँटनरच्या ३९व्या षटकातील चौथ्या चेंडूवर श्रेयस अय्यर झेलबाद झाला, रचिन रवींद्रने एक कमालीचा झेल टिपत भारताने चौथी मोठी

» पान ७ वर

# दादांचा 'विक्रमी' अर्थसंकल्प

## महायुतीचा पहिला, अजित पवारांचा अकरावा अर्थसंकल्प आज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार हे सोमवारी राज्याचा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. नव्याने सत्तेवर आलेल्या महायुती सरकारचा हा पहिला अर्थसंकल्प असून अर्थमंत्री म्हणून अजित पवार यांचा हा अकरावा अर्थसंकल्प असणार आहे.

अजित पवार हे आर्थिक शिस्तीचे कठोर प्रशासक म्हणून ओळखले जातात. जनमताची नाडी ओळखून अर्थसंकल्पात लोकाभिमुख निर्णय जाहीर करताना राज्याच्या विकासप्रक्रियेला धक्का बसणार नाही याची काळजी ते घेत असतात. विकासयोजनांना निधी उपलब्ध करुन देण्यात तसेच पायाभूत विकासाची प्रक्रिया गतिमान ठेवण्यात ते सातत्याने यशस्वी ठरले आहेत. कोविडच्या संकटकाळात अनेक राज्यांची अर्थव्यवस्था अडचणीत असताना अजित पवार यांनी महाराष्ट्राची



आर्थिक शिस्त बिघडू दिली नव्हती, त्याबद्दल त्यांच्या कार्याचा केंद्रीय पातळीवर गौरव झाला आहे.

शेतकरी, कष्टकरी, महिला, दलित, आदिवासी, विद्यार्थी, युवक हे घटक त्यांच्या अर्थसंकल्पाच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. २०२१ चा अर्थसंकल्प ८ मार्च जागतिक महिला दिनी जाहीर करताना त्यांनी तो राज्यातील महिला शक्तीला समर्पित केला होता. २०२२ चा अर्थसंकल्प स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतीदिनी ११ मार्च रोजी सादर केला होता. तो छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग, समर्पण, स्वराज्यनिष्ठेला समर्पित होता. कृषी, उद्योग, दळणवळण, आरोग्य, मनुष्यबळ विकास या पंचसूत्रीवर आधारीत अर्थसंकल्पही त्यांनी सादर केला आहे. मागील वर्षीचा निवडणूकपूर्व अर्थसंकल्प सर्वसमावेशक, क्रांतीकारी अर्थसंकल्प होता. महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आणण्यात त्या अर्थसंकल्पातील लोकोपयोगी, लोकप्रिय निर्णयांचा महत्वाचा वाटा होता. सोमवारी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाकडून राज्यातील जनतेला अनेक अपेक्षा असून अजित पवार त्या अपेक्षांवर खरे उतरतील, हा विश्वासही जनतेच्या मनात आहे.

### अजित पवार विक्रमाच्या वाटेवर

● उपमुख्यमंत्री अजित पवार हे उद्या त्यांचा अकरावा अर्थसंकल्प सादर करतील. त्यानंतर ते शेषराव वानखेडे यांच्यानंतर (१३ वेळा) दुसरे सर्वाधिक (११) वेळा अर्थसंकल्प सादर करणारे अर्थमंत्री ठरतील. शेषराव वानखेडे यांनी १३ वेळा, अजित पवार यांनी उद्याचा अर्थसंकल्प धरून ११ वेळा, त्यांच्यानंतर सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा मान जयंत पाटील (१० वेळा) आणि सुशीलकुमार शिंदे (९ वेळा) यांना जातो.

# मुंबईत पुन्हा दहशतवादी हल्ला?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई पोलिसांनी कुलाब्यातील छाबडा हाऊस इथे सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याच्या लक्ष्यांपैकी एक असलेल्या छाबडा हाऊसची गुगल इमेज, राजस्थानमध्ये हल्ल्याची योजना आखण्यासाठी अटक करण्यात आलेल्या दोन आरोपींकडून जप्त करण्यात आली आहे.

पोलिसांना मिळालेल्या माहितीनंतर या माहितीनंतर पोलिसांनी कुलाबा येथील ज्यू कम्युनिटी सेंटरमध्ये सुरक्षा वाढवली आहे. महाराष्ट्र एटीएसने काही दिवसांपूर्वी पुणे पोलिसांकडून मोहम्मद इम्रान मोहम्मद युनूस खान आणि मोहम्मद युनूस मोहम्मद याकूब साकी यांना ताब्यात घेतले होते. या प्रकरणाच्या तपासादरम्यान पोलिसांना त्यांच्याकडून छाबडा हाऊसची गुगल इमेज मिळाली आहे. महाराष्ट्र एटीएसनं, मुंबई पोलिसांना माहिती दिल्यानंतर लागलीच या केंद्रावरील सुरक्षा वाढवण्यात आली आहे. हे दोघेही राजस्थानमधील रतलामचे रहिवासी असून ते सध्या

» पान ७ वर

# अंधश्रद्धेतून बाहेर या!

## राज ठाकरेंचे महाकुंभबाबत वादग्रस्त वक्तव्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशातली एकही नदी स्वच्छ नाही. कोरोना आजारातून देश नुकताच बाहेर निघाला आहे. मात्र कुणालाही त्याचं देणंघेणं नाही आणि लोक कुंभमेळ्यात गर्दी करत अंघोळी करत आहेत. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातला फरक समजा. अंधश्रद्धेतून जरा बाहेर या, डोकी हलवा. असं म्हणत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांनी कुंभमेळ्यातील पवित्र स्नानावर भाष्य करत खिल्ली उडवलीय. मनसेच्या वर्धापन दिनानिमित्त ते पिंपरी चिंचवडमध्ये पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलत ते होते.

दरम्यान, मनसेच्या वर्धापन दिनानिमित्त पिंपरी-चिंचवड येथे मेळाव्यात बोलताना राज ठाकरे यांनी कुंभ मेळ्याबाबत टीका करत म्हणाले, मध्यंतरी मुंबईत आमच्या पदाधिका-यांची मेळावा बैठक लावली होती. त्यात काही शाखेचे पदाधिकारी गैरहजर होते आणि जे गैरहजर होते त्यांची हजेरी मी घेतली.



त्यावेळी प्रत्येकाला विचारलं असता त्यातला अनेकांनी आपली आपली करणे दिली. त्यातल्या बहुतांश लोकांनी कुंभमेळ्याचे कारण पुढे केले. मुळात तुम्ही पाप करताच कशाला? असा प्रश्न मी त्यांना केला. बाळा नांदगावकर ही कमंडलूमधून पाणी घेऊन आले. मी नाही पिणार पाणी वगैरे, असं मी त्यांना म्हणालो. सोशल मीडियावर माणसे-बाया अंग घासून अंघोळ करताय आणि आमचे बाळा नांदगावकर पाणी प्यायला देत आहेत. मला सांगा कोण पिणार ते पाणी, असं म्हणत राज ठाकरेंनी कुंभमेळ्यातील पवित्र स्नानाची खिल्ली उडवली.

नुकताच करोना महामारी होऊन गेली आहे. दोन वर्ष तोंडाला कापड लावून आपण फिरलो आणि तिकडे जाऊन कुंभमेळ्यात अंघोळ करत आहेत. कुणालाही कुणाचे देणेघेणे नाही. परदेशात ज्यावेळेस आम्ही जातो त्यावेळेस तिथल्या नद्या पाहतो तर त्या एकदम स्वच्छ असतात. आपण आपल्या इथे नद्यांना माता म्हणतो मात्र परदेशात असे होत नाही. आता तुम्ही श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातला फरक समजा, असेही राज ठाकरे म्हणाले.

# आजपासून केंद्रीय अर्थसंकल्पाचा दुसरा टप्पा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील दुसऱ्या टप्प्याचे कामकाज उद्यापासून (सोमवार) सुरू होईल. अधिवेशनाच्या उर्वरित काळात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये विविध मुद्द्यांवरून जुंपण्याची शक्यता आहे. त्यामुळे अधिवेशनाचा दुसरा टप्पा वादळी ठरण्याची चिन्हे आहेत.

अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्याचे कामकाज ३१ जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीत झाले. त्यानंतर घडलेल्या काही घडामोडींमुळे सत्ताधाऱ्यांना घेरण्यासाठी आणखी मुद्दे विरोधकांच्या हाती आले आहेत. त्यामुळे मोदी सरकारची कोंडी करण्यासाठी विरोधकांना आणखीच बळ मिळणार आहे. प्रामुख्याने मतदार याद्यांमधील कथित अनियमितता, मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचाराची पडलेली ठिणगी, अमेरिकेच्या आयात शुल्क धोरणाचा परिणाम आदी मुद्दे उपस्थित करण्याची विरोधकांची योजना आहे.

कॉंग्रेसने इंडिया आघाडीतील इतर घटक पक्षांना साथीला घेऊन महत्वाचे मुद्दे मांडण्याची ग्वाही दिली आहे. द्रमुकने लोकसभा मतदारसंघ फेररचनेवरून आक्रमक पवित्रा स्वीकारला आहे. तर, तृणमूल कॉंग्रेसने डुप्लिकेट मतदार ओळखपत्र क्रमांकांचा मुद्दा लावून धरण्याचे सूतोवाच केले आहे. अधिवेशनात विरोधकांना निष्प्रभ ठरवण्याचे आव्हान सत्ताधाऱ्यांपुढे असेल. लेखानुदान मागण्यांना मंजुरी, अर्थसंकल्पीय प्रकिया पूर्णत्वास नेणे

» पान ७ वर

# तुकोबारायांची जगातील सर्वात भव्य पगडी !

### धार्मिक

**जगातील सर्वात मोठ्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पगडीचा लोकार्पण सोहळा येत्या ११ मार्च रोजी सकाळी ११ वाजता जगद्गुरु संत तुकाराम महाराज मुख्य मंदिर, श्रीक्षेत्र देहू या ठिकाणी पार पडणार आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** संत तुकाराम महाराज बीज निमित्ताने जगातील सर्वात मोठ्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पगडीचा लोकार्पण सोहळा येत्या ११ मार्च रोजी सकाळी ११ वाजता जगद्गुरु संत तुकाराम महाराज मुख्य मंदिर, श्रीक्षेत्र देहू या ठिकाणी पार पडणार आहे. या प्रसंगी विशेष उपस्थिती वर्ल्ड रेकॉर्डस् इंडिया ॲन्ड जिनिअस फाऊंडेशनचे सी.ई.ओ पवनकुमार सोलंकी आणि संत तुकाराम महाराज देवस्थान ट्रस्ट - श्रीक्षेत्र देहूचे अध्यक्ष ह.भ.प. पुरुषोत्तम मोरे यांची राहणार आहे. तर



तुकाराम बीजे दिवशी होणार लोकार्पण

संकल्पना व आयोजन दिलीप सोनिगरा ज्वेलर्स यांनी केले आहे.

दिलीप सोनिगरा म्हणाले की जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पावन झालेल्या नगरीमध्ये आम्ही वास्तव करत असून याच परिसरात आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून व्यवसायात स्थिर झालो आहे. तुकाराम महाराजांवर आमची नितांत श्रद्धा, प्रेम आणि स्नेह आहे.

याच सदभावनेतून आम्ही जगातील सर्वात मोठी पगडी तयार केली असून वर्ल्ड रेकॉर्डस् इंडिया ॲन्ड जिनिअस बुकमध्ये हिची नोंद होणार आहे.

> सदरील पगडीचा घेराव हा २२ फुटांचा असून पगडीची उंची ४ फूट आहे. तर पगडीला ४५० मीटर लांबीचा कपडा लागला आहे.
>
> -दिलीप सोनिगरा

सदरील पगडी दर्शनासाठी १० तारखेला सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत दिलीप सोनिगारा ज्वेलर्स चिंचवड येथे ठेवण्यात येणार आहे. सदरील पगडी पाहण्यासाठी व दर्शनासाठी सर्वांसाठी खुली आहे. तरी जास्तीजास्त पिंपरी चिंचवडकरांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन दिलीप सोनिगरा यांनी केले आहे.

#रा



## ज्येष्ठ कवियत्री डॉ. अरूणा ढेरे यांचा आज सन्मान

**पुणे :** कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा कवितेचा वारसा पुढे नेणाऱ्या ज्येष्ठ कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांना काव्य क्षेत्रातील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल विदिशा विचार मंचतर्फे यंदाचा कविश्रेष्ठ कुसुमाग्रज स्मृती सन्मान जाहीर करण्यात आला आहे. कुसुमाग्रजांच्या स्मृतिदिनी म्हणजे सोमवार दिनांक १० मार्च रोजी ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द लेखक आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी आणि कोहिनूर ग्रुपचे चेअरमन आणि कार्यकारी संचालक कृष्णकुमार गोयल उपस्थित राहणार आहेत.



## भारती विद्यापीठाची राष्ट्रीय युवा महोत्सवात कामगिरी

**पुणे :** नोएडा येथील एमिटी युनिव्हर्सिटीमध्ये असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीच्या वतीने आयोजित ३८ व्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सच्या विद्यार्थ्यांनी संचालक प्रा . शारंगधर साठे यांच्या मार्गदर्शनाखाली उल्लेखनीय कामगिरी केली आहे. २ दोन सुवर्णपदके एक १ रौप्य पदक तर तीन कांस्य पदकांची कमाई केली आहे.

या स्पर्धेत एकूण १४२ विद्यापीठे पात्र ठरली होती. भारती विद्यापीठाच्या

विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये पदके पटकावली. भारतीय शास्त्रीय गायनात नंदिनी गायकवाड आणि भारतीय वाद्य संगीत (ताल वाद्य) यामध्ये सूर्यकांत शिंदे यांनी सुवर्णपदक पटकाविले.

भारतीय सुगम संगीत स्पर्धेत अंजली गायकवाड हिने रौप्यपदक पटकाविले. भारतीय वाद्य संगीत (स्वर वाद्य) हर्षिद शंकर, लोकवाद्य ऑर्केस्ट्रा आणि भारतीय शास्त्रीय नृत्यात गौरी पेंडसे हिने कांस्यपदकाची कमाई केली.

## वसतिगृहातील मृत विद्यार्थ्यांच्या वारसांना मदत

**पुणे :** महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी वसतिगृहातील मृत दोन विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. यासंदर्भातील प्रस्ताव समाज विकास विभागाने स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला होता.

गेल्यावर्षी जुलै महीन्यात पुण्यात ताप, सर्दी , खोकला आदी आजाराचे प्रमाण वाढले होते. या वसतिगृहात असलेल्या विद्यार्थी आजारी पडले होते. या आजारामुळे सिद्धांत दिपक खैरे आणि वेदांत सुभाष सोनुने हे दोन विद्यार्थी मृत्यूमुखी पडले होते. यामुळे महापालिकेच्या विरोधात राजकीय पक्षांच्या विद्यार्थी संघटनांकडून आंदोलन केले गेले होते. तसेच वसतिगृहातील अस्वच्छता , पाण्याची गळती आदी सुविधांचा प्रश्न त्यावेळी ऐरणीवर आला होता. आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले यांनी या वसतिगृहाला भेट देऊन तेथील सुविधांची पाहणी केली होती. यानंतर काही प्रमाणात सुधारणा झाली.

दरम्यान, मयत विद्यार्थ्यांच्या पालकांनी अर्थसहाय्य मिळण्यासाठी मुख्यमंत्री सहायक निधीकडे अर्ज केला होता. महापालिकेच्या आर्थिक निधीतून ही मदत देण्यात यावी अशी विनंती प्राप्त झाल्यानंतर समाज विकास विभागाने प्रस्ताव तयार केला. हा निधी देण्यासाठी वसतिगृहातील खाणावळीसाठी असलेल्या तरतुदीचा उपयोग केला जाणार आहे. ही तरतुद शिल्लक राहत असल्याने यातुन ही रक्कम देण्यात यावी असे प्रस्तावात नमूद केले गेले होते.

## विराट महामोर्चा...!



पुणे महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या पाठिंब्यासाठी पुण्यात बौद्ध अनुयायांचा विराट मोर्चा काढण्यात आला. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समिती, पुणेच्या वतीने आयोजित या महामोर्चात लाखोंच्या संख्येने बौद्ध अनुयायी सहभागी झाले होते.

## मुक्ती आंदोलनाच्या पाठिंब्यासाठी बौद्ध अनुयायांचा मोर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बुद्धम् शरणम् गच्छामि ॥ धम्मम् शरणम् गच्छामि॥ संघम् शरणम् गच्छामि .. च्या स्वरात शांततेचा संदेश देत महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या पाठिंब्यासाठी पुण्यात बौद्ध अनुयायांचा विराट मोर्चा काढण्यात आला. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समिती, पुणेच्या वतीने आयोजित या महामोर्चात लाखोंच्या संख्येने बौद्ध अनुयायी सहभागी झाले होते.

बिहार मधील बूद्धगया येथे तथागत भगवान गौतम बुद्धांचे हजारो वर्षापासूनचे विहार आहे. मात्र त्याचा ताबा बौद्धेतर विशेषता ब्राम्हणी धर्मपंडितांकडे आहे. या गोष्टीचा जगभरातून निषेध होत असून महाबोधी विहाराचे व्यवस्थापन हे बौद्ध अनुयायांच्या देखरेखी खाली कार्यान्वित करण्यात यावे, अशी मागणी होत आहे. सध्या बुद्धगया येथे जगातील बौद्ध भिख्खूंचे प्रतिनिधी आंदोलन करत आहेत. भदंत नागघोष महाथेरो, भंते राजरत्न, भंते बुद्धघोष थेरो, भंते धम्मधर थेरो.भंते पय्यारक्खित. भंते धम्मानंद, भंते यश, भंते प्रियदर्शी भंते सुमंगल, भंते राहुल आदी बौद्ध भिख्खूंच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या महामोर्चातलाखोंच्या संख्येने बौद्ध अनुयायी सहभागी झाले होते.

# पीएमपीचा कारभार सुधारला...!

### आधीच समजणार थांब्याची माहिती; १८८० गाड्यांमध्ये 'नेक्स्ट स्टॉप अनाऊन्समेंट सिस्टिम' बसविणार

लाखो पुणेकर प्रवाशांची 'लाईफलाईन' समजल्या जात असलेल्या 'पीएमपीएमएल' प्रशासनाचा कारभार हळुहळु का होइना पण सुधारु लागला आहे; आता तब्बल सहाशे वातानुकुलित बसेस घेण्याचे नियोजन केल्यानंतर आता प्रवाशांच्या सोयीसाठी तब्बल १ हजार ८८० बसेसमध्ये 'नेक्स्ट स्टॉप अनाऊन्समेट सिस्टिम'बसविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयाची टप्प्याटप्प्याने प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे, त्याचा फायदा दिव्यांग आणि अंध व्यक्तींना होणार आहे. मात्र; ही यंत्रणा टिकविण्याचे मोठे आव्हान प्रशासनाच्या समोर असणार आहे. विशेष म्हणजे ही यंत्रणा केवळ 'नव्याची नवलाई' ठरु नये अशी माफक अपेक्षा प्रवाशी व्यक्त करत आहेत.

> प्रवाशांना बसमधून प्रवास करताना पुढील थांब्याची माहिती स्पष्ट आणि मोठ्या आवाजात मिळणे आवश्यक आहे. याकरिता बसमध्ये नेक्स्ट स्टॉप अनाऊन्समेंट सिस्टीम कार्यान्वित असणे आवश्यक आहे. त्यामुळे आम्ही ताफ्यातील सर्वच्या सर्व म्हणजेच 1880 बस गाड्यांमध्ये नेक्स्ट स्टॉप अनाऊन्समेट सिस्टीम बसवत आहोत. ही यंत्रणा बसवण्याचे काम अंतिम टप्प्यात असून, याकरिता आवश्यक आवाजाचे रेकॉर्डिंगचे काम पूर्ण झाले आहे. महिनाभराच्या कालावधीत ही यंत्रणा पीएमपीच्या सर्व बसमध्ये कार्यान्वित झाल्याचे पाहायला मिळेल. याचा प्रवाशांना फायदा होईल.
>
> **-नितीन नार्वेकर,** सह व्यवस्थापकीय संचालक पीएमपी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मेट्रोसह रेल्वे स्थानक, पुणे विमानतळ यांसारख्या प्रवाशांना नियोजित प्रवासी वाहनाची माहिती मिळावी, याकरिता अनाऊन्समेंट सिस्टीम असते. मात्र, पीएमपीच्या बस गाड्यांमधील ही यंत्रणा गेल्या काही वर्षांपासून बंद आहे. यामुळे शहरात बसमधून प्रवास करताना अनेक दृष्टिहीन, दिव्यांग आणि ज्येष्ठ प्रवाशांचा गोंधळ उडत आहे. त्यांचे थांबे चुकत आहेत. त्यामुळे पुढील थांब्याची प्रवाशांना स्पष्ट, मोठ्या आवाजात माहिती मिळावी, याकरिता पीएमपीच्या ताफ्यातील सर्वच्या सर्व म्हणजेच 1880 गाड्यांमध्ये नेक्स्ट स्टॉप अनाऊन्समेट सिस्टिम बसवण्यात येणार आहे.

### अशी आहे परिस्थिती...!

- पीएमपीच्या ताफ्यातील बससंख्या: १८८० बस
- प्रत्यक्ष मार्गावरील बस: १६६० बस
- नियोजित मार्ग: ३८१ मार्ग
- नियोजित फेऱ्या: २० हजार ११२
- आगारांची संख्या: १५
- रोजचे प्रवासी: १३ लाखांपर्यंत
- दररोजचे उत्पन्न: किमान दीड ते पावणेदोन कोटी

ही यंत्रणा बसवण्याचे काम अंतिम टप्प्यात असून, याकरिता आवश्यक आवाजाचे रेकॉर्डिंगचे कामसुध्दा पूर्ण झाले आहे. महिनाभराच्या कालावधीत ही यंत्रणा पीएमपीच्या सर्व बसमध्ये बसवली जाणार आहे. त्यामुळे दृष्टिहीन, दिव्यांग आणि ज्येष्ठ प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

अनेकदा वाहक आणि त्यांच्यात शाब्दिक चकमकी झाल्याचेसुध्दा समोर आले आहे. यामुळे पीएमपी प्रशासनाकडून ताफ्यातील सर्वच्या सर्व बसमध्ये (1880 बस) ही अनाऊन्समेंट यंत्रणा बसवण्यासंदर्भातील कार्यवाही युध्दपातळीवर सुरू आहे. महिनाअखेरपर्यंत ही यंत्रणा कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

## केंद्रीय विद्यालयात ऑनलाइन अर्ज मुदतवाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्रीय विद्यालयातील इयत्ता पहिली आणि बालवाटिकेच्या प्रवेशासाठीची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, २१ मार्चपर्यंत ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी मुदत देण्यात आली आहे.पहिलीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्याचे किमान वय ६ वर्षे असावे.

याशिवाय बाल वाटिका- १, २ आणि ३ मध्ये प्रवेशासाठीचे वय अनुक्रमे ३ ते ४ वर्षे, ४ ते ५ वर्षे आणि ५ ते ६ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. वर्गात निवड झालेल्या उमेदवारांची पहिली यादी आणि प्रतीक्षा यादी २५ मार्च रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.





बाल वाटिकेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांची निवड यादी आणि प्रतीक्षा यादी २६ मार्च रोजी प्रसिद्ध केली जाईल. पहिल्या यादीनंतर जागा रिक्त राहिल्यास दुसरी यादी २ एप्रिल रोजी प्रसिद्ध केली जाईल. बालवाटिकेत जागा रिक्त राहिल्यास, अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गांसाठी शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत प्रवेशासाठी दुसरी अधिसूचना ७ एप्रिल रोजी जारी केली जाईल. अशा विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया ८ एप्रिलपासून सुरू होईल. बालवाटिका- २ आणि वर्ग- २ आणि यांसारख्या इतर वर्गांमध्ये प्रवेश दिला जाईल.

वर्ग- २, बालवाटिका-२ आणि इतर वर्गांमध्ये प्रवेश प्रक्रिया २ एप्रिलपासून सुरू होईल आणि ११ एप्रिलपर्यंत चालेल. ज्या वर्गांमध्ये जागा रिक्त आहेत. त्या वर्गांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. बालवाटिका-२, वर्ग- २ आणि इतर वर्गांमध्ये प्रवेशासाठी पहिली यादी १७ एप्रिल रोजी प्रसिद्ध केली जाईल.

अकरावी वगळता सर्व वर्गांमध्ये प्रवेशाची अंतिम तारीख ३० जून असेल. ३० जूननंतर जागा रिक्त राहिल्या, तर विशेषाधिकार प्राप्त मुलांना प्राधान्यक्रमाने निर्धारित मर्यादेवर प्रवेश देण्यात येणार आहेत, असे केंद्रीय विद्यालय संघटनेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## 'पुणे इंटरनॅशनल डान्स फेस्टिव्हल'चे उद्‌घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** इंदिरा युनिव्हर्सिटीचे स्कुल ऑफ लिबरल आर्टस,इन्फोसिस फाऊंडेशन आणि भारतीय विद्या भवनच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय 'पुणे इंटरनॅशनल डान्स फेस्टिव्हल'चे दि.८ मार्च रोजी ध्रुव सभागृह(इंदिरा युनिव्हर्स कॅम्पस ,ताथवडे) येथे सकाळी ११ वाजता शानदार उदघाटन झाले. ज्येष्ठ नृत्यगुरू डॉ.सुचेता भिडे-चापेकर,शमा भाटे,डॉ. नंदकिशोर कपोते,डॉ.तरिता शंकर(संस्थापक अध्यक्ष -इंदिरा ग्रुप ऑफ इंस्टिट्यूट्स),डॉ.पंडित माळी(मुख्य कार्यकारी अधिकारी),डॉ.आनंद जुमळे(प्राचार्य,इंदिरा कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स),प्रा. रेणू गर्ग(डायरेक्टर इंदिरा स्कुल ऑफ कम्युनिकेशन) आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.. फेस्टिव्हलच्या निमंत्रक रसिका गुमास्ते,समन्वयक सुवर्णा बाग तसेच संयोजन समिती सदस्य नेहा मुथियान,अस्मिता ठाकूर,शमा अधिकारी तसेच वरदा वैशंपायन यांनी स्वागत केले.

हा महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य आहे.रसिका गुमास्ते,नेहा मुथियान,अस्मिता ठाकूर,शमा अधिकारी यांनी गेली ६ वर्षे इंडिया इंटरनॅशनल डान्स फेस्टिव्हल चे पुण्यात यशस्वी आयोजन केले.



पुणे 'पुणे इंटरनॅशनल डान्स फेस्टिव्हल'चे उद्‌घाटन करताना ज्येष्ठ नृत्यगुरू डॉ.सुचेता भिडे-चापेकर, डॉ.तरिता शंकर, रसिका गुमास्ते, नेहा मुथियान आदी मान्यवर

# बंधुत्वाच्या भावनेतून स्थापित होणारी समता जैविक : प्रा. सुभाष वारे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "समाजात आजही विषमता मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहे. समतेचे वातावरण निर्माण व्हायचे असेल, तर समतेला बंधुतेचा ओलावा मिळाला पाहिजे. अंतःकरणातून प्रेमभावाने समानता आली, तर खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात उल्लेखित केलेल्या समतेचा व बंधुतेचा आदर होईल. अशी समता खऱ्या अर्थाने जैविक असते," असे मत २७ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष व ज्येष्ठ समाजवादी विचारवंत प्रा. सुभाष वारे यांनी व्यक्त केले. बंधुभावाच्या भावनेतून समाजातील विषमता दूर करण्यासह संविधानाचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

विश्वबंधुता साहित्य परिषद, रयत शिक्षण संस्थेचे औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय व काषाय प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २७ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रा. वारे यांचा, तर विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रा. भारती जाधव यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

नवी पेठेतील एस. एम. जोशी फाउंडेशनच्या आवारातील संविधान कट्ट्यावर झालेल्या कार्यक्रमावेळी विश्वबंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक प्रकाश रोकडे, संमेलनाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय ताम्हाणे, काषाय प्रकाशनचे प्रा. चंद्रकांत वानखेडे, परिषदेचे सरचिटणीस प्रा. शंकर आथरे, एस. एम. जोशी फाऊंडेशनचे व्यवस्थापक राहुल भोसले, बंधुता प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत रोकडे आदी उपस्थित होते.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथमित्र पुरस्कारासाठी प्रा. डॉ. प्रभंजन चव्हाण (पुणे), प्रा. डॉ. संदीप सांगळे (तळेगाव ढमढेरे), प्रा. डॉ. कामयानी सुर्वे (चिंचवड), प्रा. भारती जाधव (वाघोली), हनुमंत चांदुगडे (बारामती), प्रा. डॉ. जयश्री आफळे (सातारा), शरद शेजवळ (नाशिक), विजयकुमार मिठे (नाशिक), दिनकर बेडसे (धुळे), राजू मोहन (देहू), बाळासाहेब गोजगे (तळेगाव दाभाडे), भाऊसाहेब मोते (नाशिक) यांची निवड झाली आहे. डॉ. विजय ताम्हाणे यांनी स्वागत केले. प्रा. शंकर आथरे यांनी प्रास्ताविक केले. प्रशांत रोकडे यांनी आभार मानले.

> समाजात आज बंधुतेच्या मूल्याची रुजवण होणे गरजेचे असून, संविधानाला सर्वोच्च मानून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी उभारली पाहिजे. बंधुत्वाचे नाते दृढ झाले, तर समाजातील विषमता दूर होण्यास मदत होईल, असे रोकडे यांनी नमूद केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर करून समाजातील समता, बंधुभाव आणि साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन व्हावे.
>
> **— प्रकाश रोकडे,** संस्थापक, विश्वबंधुता साहित्य परिषद



## सिध्दा पांडे हिच्या स्काय इस अ बिलिफचे प्रकाशन

**पुणे :** पुण्यातील द न्यू इंडिया स्कुल येथे इयत्ता नववी मध्ये शिकणाऱ्या सिध्दा पांडे या विद्यार्थिनीने लिहिलेल्या द स्काय इस अ बिलिफ हे पुस्तक डिजिटल स्वरूपात प्रकाशित झाले आहे.लहान मुलांसाठी आघाडी सर्जनशील व्यासपीठ असलेल्या ब्रायबुक या फ्लॅटफॉर्मवर डिजिटल स्वरूपात हे पुस्तक उपलब्ध आहे. सिध्दा पांडे हिचे इंग्रजी भाषेतील १०८ पानांचे हे पुस्तक असून काल्पनिक कथेवर आधारित आहे.नाती आणि मैत्री ही फक्त आपल्या वयोगटातील लोकांशीच नव्हे तर कुणाशीही होऊ शकते.या कथेमध्ये विद्यार्थी आपल्या शिक्षकांबरोबर मैत्री करून आयुष्यातील अमुल्य धडे मिळण्याची आशा बाळगतो,पण या मैत्रीमध्ये विद्यार्थीच शिक्षकांचा मार्गदर्शक बनतो. पुस्तकाबाबत माहिती देताना सिध्दा पांडे म्हणाली की,लहानपणापासूनच मला लिहिण्याची आवड होती व मी कविता लिहायचे.या आवडीमुळेच माझे पहिले पुस्तक मी आणू शकले.






## 'एमआयटी एडीटी'त महिला पुरस्कारांचे वितरण

**पुणे :** महिला आता कुठल्याही क्षेत्रात मागास राहिलेल्या नाहीत. मुली उच्च शिक्षण घेत आहेत, प्रत्येक क्षेत्रात आपला वेगळा असा ठसा उमठवत आहेत. मात्र, तरीही कामाच्या ठिकाणी आजही महिलांना दुजाभावाचा सामना करावा लागतो. तरीही, योग्यवेळी संधी, कुटूंबाचा भक्कम पाठिंबा मिळाल्यास महिला कुठलीही अशक्य गोष्ट शक्य करू शकतात, इतकी ताकद त्यांच्यात असते, असे मत औद्योगिक शिक्षण मंडळ शिक्षण समूहाच्या (एएसएम) ट्रस्टी डॉ. प्रिती पाचपांडे यांनी व्यक्त केले.

त्या एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्याचा आंतरराष्ट्रीय महिला दिन कार्यक्रम व त्यानिमित्त आयोजित कर्तृत्ववान महिला पुरस्कारांचे वितरण समारंभात बोलत होत्या. याप्रसंगी, रिलायन्स लाइफ सायन्सच्या व्यावसायिक प्रमुख डॉ.शैलजा सक्सेना, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे प्र.कुलगुरु प्रा.डॉ.मोहित दुबे, एमआयटी स्कुल ऑफ बायो इंजिनिअरिंगच्या प्राचार्या डॉ.रेणू व्यास, डॉ.अश्विनी पेठे आदी मान्यवर उपस्थित होते.

## कोथरुडमध्ये घरातून पाच लाखांचे दागिने लांबविले

**पुणे :** सदनिकेत शिरलेल्या चोरट्यांनी पाच लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना कोथरूड भागातील एका सोसायटीत घडली. याप्रकरणी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एका महिलेने कोथरूड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला कोथरूड भागातील परांजपे शाळेजवळ असलेल्या ऋतुरंग सोसायटीत राहायला आहेत. सदनिकेत शिरलेल्या चोरट्यांनी कपाटातून पाच लाख रुपयांचे दागिने चोरून नेल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला. महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. सदनिकेत चोरी करणारा चोरटा माहितगार असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. पोलीस उपनिरीक्षक बसवराज माळी तपास करत आहेत.

## कुलुप तोडून साडेतीन लाखांचे दागिने लांबविले

**पुणे :** वानवडी भागातील एका सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी साडेतीन लाख रुपयांचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. तक्रारदार वानवडीतील एका वसाहतीत राहायला आहेत. ७ मार्च रोजी सायंकाळी सव्वासातच्या सुमारास तक्रारदार तरुण कुटुंबीयासह बाहेर गेला होता. चोरट्यांनी सदनिकेचे कुलूप तोडून कपाटातील तीन लाख ६४ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

# दादांची यशस्वी 'शिष्टाई'...!



**पुणे** वडगावशेरी, खराडी आणि चंदननगरला गेल्या काही दिवसांपासून अपुरा आणि अनियमित पाणीपुरवठा होत आहे, त्याकडे लक्ष वेधण्यासाठी माजी नगरसेविका उषा कळमकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. त्यावेळी दादांनी हा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासनाला तातडीचे आदेश दिले यावेळी माजी नगरसेविका शीतल सावंत उपस्थित होत्या.

## वडगांवशेरीच्या पाण्यासाठी दादांची 'शिष्टाई'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून वडगांवशेरी, चंदननगर आणि खराडीला अपुरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे, त्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. या प्रश्नाकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी माजी नगरसेविका उषा कळमकर यांच्या नेतृत्वाखाली रविवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले. त्यावेळी त्यांनी प्रशासनाशी तातडीने संपर्क साधून हा पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आणि त्याचा अहवाल दोन दिवसात सादर करण्याचे आदेश दिले.

वडगावशेरी, खराडी, विमाननगर, सोमनाथ नगर, *गणेशनगर, आदी भागांत अनेक दिवसांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळित झाला असून...प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचे जाणवते.सदर बाब ही दादांच्या निदर्शनास आणून देऊन, पाणीटंचाई बाबत सविस्तर चर्चा करून सर्व माहिती दादांना देण्यात आली यावेळी माजी नगरसेविका शीतल सावंत उपस्थित होत्या.

.सबंधित प्रकरणात लक्ष घालून..योग्य ती चौकशी करून, सर्व अहवाल दादांच्या च्या पुढील दोन दिवसात होणाऱ्या पुणे बैठकीत सादर करण्यात बाबत आदेश दिले .

# पालिकेच्या ठेवींची 'कोटीच्या कोटी उड्डाणे'..!

## चार हजार कोटींच्या ठेवीवर वर्षाला मिळतेय दोनशे कोटींचे व्याज

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत पुणे महापालिकेला चांगलीच ' श्रीमंती' आली आहे, महापालिका प्रशासनाच्या बँकेत तब्बल चार हजार कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या असून प्रशासनाने या माध्यमातून ' कोटीच्या कोटी उड्डाणे' घेतली आहेत. विशेष म्हणजे या ठेवीतून प्रशासनाला तब्बल दोनशे कोटींहूनही अधिक व्याज वर्षाला मिळत आहे; त्यामुळे या व्याजावर शहराचा ' कारभार' सुरु असून त्यातून शहराच्या विकासाला हातभार लागत आहे. विशेष म्हणजे शहराला राज्य शासनाच्या माध्यमातून घसघशीत असा निधी मिळत आहे; हा निधीही बँकेत ठेवला जात असल्याने ठेवींचा हा टक्का दिवसेंदिवस अधिकच वाढत चालला आहे. मात्र; आगामी काळात ही ' श्रीमंती' टिकविण्याचे मोठे आव्हान प्रशासनाच्या समोर असणार आहे.



"गेल्या काही वर्षांच्या कालावधीत राज्य शासनाने शहराच्या विकासासाठी भरघोस निधी दिला आहे, हा निधी बँकेत ठेवल्याने त्याचा मोठा लाभ प्रशासनाला झाला असून त्या माध्यमातून शहरातील विकासकामे होत आहेत. विशेष म्हणजे या ठेवींवर घसघशीत व्याज मिळत असल्याने त्यातून शहराचा समतोल विकास साधला जात आहे, आगामी काळात या ठेवी वाढविण्यावर प्रशासनाचे प्राधान्य असणार आहे.

**-डॉ. राजेंद्र भोसले,** महापालिका आयुक्त पुणे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** करोनाच्या साथीत सलग दोन वर्षे महापालिकेच्या खर्चावर बंधने घालत केवळ आरोग्य सेवांसाठी खर्च करण्यात आल्याने महापालिकेच्या ठेवी मोठ्या प्रमाणात वाढल्या असून मिळणारी व्याजाची रक्कमही वाढली असल्याचे महापालिकेच्या अंदाजपत्रकातून समोर आले आहे. या, शिवाय, शासनाकडूनही आलेला निधी अनेक वेळा महापालिका लगेच खर्च करीत नसल्याने हा निधीही बँकेत ठेवला जात असल्याने त्यावरही महापालिकेस घसघशीत व्याज मिळत आहे. महापालिकेकडून दरवर्षी शिल्लक राहिलेले पैसे प्रत्येक सहा महिन्यांसाठी बँकेत ठेवले जात आहेत. या ठेवी सुमारे चार हजार कोटींच्या घरात गेल्या असून त्यातून महापालिकेस वर्षाला तब्बल २०० कोटींचे व्याज मिळत आहे.

करोना काळात मार्च २०२० पासून पुढील दोन वर्षे शहरातील विकासकामे ठप्प होती. पालिकेच्या वित्तीय खर्चावर मर्यादा आणण्यासाठी शासनाकडून आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली वित्तीय समिती नेमण्यात आली. त्यामुळे केवळ आरोग्य विभागास खर्चाची मुभा होती तर इतर विभागांना केवळ ३३ टक्केच खर्च करण्याचे बंधन होते. या काळात पालिकेचे मिळकतकर, शासनाचे अनुदान, बांधकाम विकसन शुल्क यांचे उत्पन्न सुरू असल्याने महापालिकेकडे मोठ्या प्रमाणात निधी शिल्लक होता. हा निधी पालिकेकडून बँकेत ठेवींमध्ये ठेवण्यात आला. त्यामुळे २०२०-२१ नंतर पालिकेच्या ठेवींमध्ये लक्षणीय वाढ झाली. २०२०-२१ मधे महापालिकेस ठेवींवरील् व्याजातून ८० कोटी ६१ लाखांचे उत्पन्न मिळत होते हे उत्पन्न २०२४-२५ पर्यंत तब्बल २०१ कोटी ६३ लाखांवर गेले आहे.

२०२४- २५ या आर्थिक वर्षात महापालिकेस २०१ कोटी ६३ लाखांचे व्याज मिळाले आहे. तर पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात ( २०२५-२६) मध्ये व्याजातून २३० कोटींचे व्याजाचे उत्पन्न गृहीत धरण्यात आले आहे.

### वर्ष / ठेवींवर मिळालेले व्याज

- २०२०-२१ : ८० कोटी ६१ लाख
- २०२१-२२ : ११९ कोटी १५ लाख
- २०२३-२४ : १५९ कोटी ६० लाख
- २०२४-२५ : २०१ कोटी ६३ लाख
- २०२५-२६ : २३० कोटी (अंदाजित)

# 'पीएमपीएमएल' देणार खासगी बसेसना 'थांबा'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातून बाहेरगावी जाणाऱ्या खासगी बस रस्त्यांवर थांबत असल्याने होणारी वाहतूककोंडी सोडविण्यासाठी या बस पीएमपीच्या डेपोत ठरवीक वेळेत थांबण्यासाठी परवानगी द्यावी, असा प्रस्ताव पुणे महापालिकेकडून पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडकडे (पीएमपीएमएल) पाठविण्यात येणार आहे.

शहरातून बाहेरगावी जाणाऱ्या खासगी बस रस्त्यावर थांबतात. त्यामुळे होणारी वाहतूककोंडी सोडविण्यासाठी त्यांना पीएमपी डेपोत ठरावीक वेळेत थांबण्यासाठी परवानगी द्यावी, असा प्रस्ताव आहे. शहरातून विविध जिल्ह्यांमध्ये जाणाऱ्या खासगी बस सकाळी, सायंकाळी, तसेच रात्रीच्या वेळी रस्त्यावरच थांबलेल्या असतात. त्यामुळे होणारी कोंडी टाळण्यासाठी महापालिकेने हा प्रस्ताव तयार करून पीएमपी प्रशासनाकडे पाठविण्याचे निश्चित केले आहे.

या सर्व खासगी बसचा प्रवास शहरातील वेगवेगळ्या भागांतून होतो. काही बस कात्रज-देहूरोड बाह्यवळण मार्गाने कात्रजवरून स्वारगेटला येतात. त्यानंतर हडपसरवरून सोलापूर, नांदेड, लातूरकडे जातात. तर काही बस गणेशखिंड रस्ता, शिवाजीनगर, वाकडेवाडी, संगमवाडी, नगर रस्त्यावरून मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्रात जातात. शहरातील प्रमुख रस्त्यांवर प्रवाशांना घेण्यासाठी या बस जागोजागी थांबतात. पौड रस्ता, वाकडेवाडी, शिवाजीनगर, स्वारगेट चौक, नगर रस्त्यावर या बस थांबत असल्याने वाहतूककोंडी होते.



# बेकायदा वास्तव्य; बांगलादेशी तरुण जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी तरुणाला भारती विद्यापीठ पोलिसांनी पकडले. याप्रकरणी रियाजूल मामरुल मुल्ला (वय २५, सध्या रा. आंबेगाव खुर्द) याच्याविरुद्ध परकीय नागरिक कायदा कलम १४, तसेच पारपत्र अधिनियम, परकीय नागरिक आदेश कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार रवींद्र चिप्पा यांनी याबाबत भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुल्ला मूळचा बांगलादेशी आहे. तो कात्रज भागातील आंबेगाव खुर्द परिसरात बेकायदा वास्तव्य करत होता. याबाबतची माहिती भारती विद्यापीठ पोलिसांच्या तपास पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याला आंबेगाव खुर्द परिसरातून शनिवारी ताब्यात घेतले. रात्री उशीरा त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक युवराज शिंदे तपास करत आहेत.



महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आयोजित गांधी विचार साहित्य संमेलन २०२५ मध्ये रूबी रमा प्रवीण यांसह पुणेकर नागरिक प्रत्यक्ष चरख्यावर कार्य अनुभवताना एक झलक. या संमेलनाला पुणे शहर आणि परिसरातील अनेक नागरिकांनी भेट देऊन माहिती घेतली, यामध्ये लहान मुले आणि तरुण तसेच तरुणींचा लक्षणीय सहभाग होता.

# हातातील ताट घेतले आणि दादांनी केली मंजुश्रीताईंना ओवाळणी...!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सर्वच ठिकाणी महिलांनी , सुवासिनींनी अतिथीला ओवाळून त्यांचे स्वागत करण्याची प्रथा आहे. तथापि महिला दिनानिमित्त काल आयोजित एका कार्यक्रमात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री नामदार चंद्रकांत पाटील हे अतिथी म्हणून लिहिले असता त्यांनी महिलांच्या हातातील ताठ घेऊन स्वतः नगरसेविका मंजुश्री खर्डेकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनाच ओवाळले आणि आता आपण पुरुषांनी महिलांना ओवाळून त्यांचा सन्मान करण्याचा नवीन पायंडा पाडू असे सांगत स्त्री सन्मानाची एक नवी संकल्पना सादर केली.

मंजुश्री खर्डेकर यांचा वाढदिवस असल्यामुळे नामदार पाटील यांनी त्यांना अशा अनोख्या शुभेच्छा दिल्या.

८ मार्च जागतिक महिला दिन आणि ९ मार्च मंजुश्री संदीप खर्डेकर यांचा वाढदिवस. ह्या निमित्ताने आयोजित केलेल्या आरोग्य चिकित्सा शिबिराच्या उदघाट्न प्रसंगी हा सुखद प्रसंग घडला आणि सर्व उपस्थित भारावून गेले.

पुरुषांनी सर्व ठिकाणी महिलांचा सन्मान करणे व त्यांना समान वागणूक देणे हीच महिला दिनाची खरी भेट असल्याचे प्रतिपादन ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.कोणत्याही पुरुषाने कुटुंबातच नव्हे तर कुठे ही महिलांना त्रास न देणे हे त्यांचे कर्तव्यच असल्याचेही

चंद्रकांतदादा म्हणाले; यावेळी प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, प्रदेश प्रवक्ता संदीप खर्डेकर, शहर सरचिटणीस पुनीत जोशी,नगरसेवक दीपक पोटे, नगरसेवक जयंत भावे, शहर उपाध्यक्ष प्रशांत हरसुले,सुनील पांडे,मंडल अध्यक्ष डॉ. संदीप बुटाला, प्रभाग अध्यक्ष एड. प्राची बगाटे,सुभाषशेठ नाणेकर,सौ. कल्याणी खर्डेकर,राजेंद्र येडे, निलेश गरुडकर, बाळासाहेब धनवे, वैभव जमदाडे, श्रीकांत गावडे, अपर्णा लोणारे, मंगलताई शिंदे,सुमित दिकोंडा, सतीश कोंडाळकर, राम भिसे, विनायक गायकवाड इ मान्यवर उपस्थित होते.

यावेळी एम एन जी एल च्या माध्यमातून सर्व प्रकारच्या आरोग्य चाचण्या मोफत उपलब्ध करून दिल्याबद्दल राजेशजी पांडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच ह्या उपक्रमाचे समन्वयक सुनील पांडे यांचा देखील सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे उत्तम संयोजन सुधीर फाटक,अनिकेत मंडाले, हर्षल होजगे, राहुल चौधरी, आकाश जाधव,सचिन पवार, रोहित मंडाले, अभिषेक पवार, अमोल जाधव, रोहित बाबर, सौरभ खंकाळ यांनी केले. पतित पावन संघटनेच्या माध्यमातून श्रावणधारा वसाहत येथे देखील आरोग्य चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपा प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, भाजपा प्रदेश प्रवक्ता संदीप खर्डेकर,पतित पावन चे शहर अध्यक्ष श्रीकांत शिळीमकर, पालक मनोज नायर, कार्याध्यक्ष गोकुळ शेलार,सुनील मराठे, ज्ञानेश्वर साठे, राहुल पडवळ, मारुती धुमाळ, संजय येनपुरे इ मान्यवर उपस्थित होते.यावेळी महिलांनी मंजुश्री खर्डेकर यांचा विशेष सत्कार केला व मोफत आरोग्य तपासणी उपलब्ध करून दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.



"पुरुषांनी सर्व ठिकाणी महिलांचा सन्मान करणे व त्यांना समान वागणूक देणे हीच महिला दिनाची खरी भेट आहे;कोणत्याही पुरुषाने कुटुंबातच नव्हे तर कुठे ही महिलांना त्रास न देणे हे त्यांचे कर्तव्यच असून महिलांनीच कां पुरुषांना ओवाळायचे ? पाच पुरुषांनी महिलांना कां ओवाळू नये व त्यांचा सन्मान का करू नये..

**— चंद्रकांतदादा पाटील,** उच्च व तंत्र शिक्षणमंत्री



कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे तर्फे कर्तृत्ववान महिलांचा गौरव

# कऱ्हाडे भूषण पुरस्कार उर्जादायी

पुणे : आपल्या आवडीच्या क्षेत्रात कर्तृत्वाच्या बळावर ठसा उमटविणाऱ्या महिलांचा ‘कऱ्हाडे भूषण राणी लक्ष्मीबाई’ पुरस्काराने केलेला सन्मान हा भविष्यातील वाटचालीसाठी उर्जा देणारा ठरेल, असे प्रतिपादन पुणे महिला मंडळाच्या अध्यक्षा केतकी कुलकर्णी यांनी केले. मातृत्व, नेतृत्व आणि कर्तव्याचा हा सन्मान संस्काराची जपणूक करणारा आहे, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणेतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त कऱ्हाडे ज्ञातीतील विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा ‘कऱ्हाडे भूषण राणी लक्ष्मीबाई’ पुरस्काराने सन्मान करण्यात आला. सन्मान केतकी कुलकर्णी आणि कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणेच्या अध्यक्षा मुक्ता चांदोरकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्या वेळी कुलकर्णी बोलत होत्या. कर्वेनगरमधील युनायटेड वेस्टर्न सोसायटी सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
डॉ. सुचित्रा कुलकर्णी, श्रुती नाटेकर, सुधाताई जावडेकर, मुक्ता पंडित, वृषाली आठल्ये, मंजिरी धामणकर यांचा ‘कऱ्हाडे भूषण राणी लक्ष्मीबाई’ पुरस्काराने तर वयाची 75 वर्षे पूर्ण केलेल्या अनुराधा देसाई, सुनंदा बेळगी, निला शेवडे, सुनिता सरदेसाई, अरुणा पळसुले-देसाई, इंदूताई धामणकर, शीला महाजनी, उषाताई नानल यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणेच्या कार्याचा गौरव करून केतकी कुलकर्णी म्हणाल्या, संस्कारक्षम पिढी घडविण्याचे तसेच संघटनात्मक दृष्टीने सुरू असलेले कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणेचे काम अभिनंदनीय आहे.



वाघोलीत महिला दिनानिमित्त महिला बचत गट मेळाव्याला प्रतिसाद

वाघोली येथे जागतिक महिला दिनानिमित्त उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना आमदार ज्ञानेश्वर कटके,समोर महिला मेळाव्यात उपस्थित महिलांनी गर्दी.

# मतदारसंघात ‘अस्मिता भवन’ उभारणार : कटके

**वाघोली :** शिरूर हवेली विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक माणूस म्हणजे माझे कुटुंब आणि त्या कुटुंबाचा मी प्रतिनिधी आहे.जनतेने मला जी संधी दिली,त्या संधीचे सोने करून सर्वस्वी जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडून नागरिकांना भेडसावणाऱ्या सर्व समस्या मार्गी लावेल अशी ग्वाही दिली.तसेच शिरूर हवेलीतील महिला भगिनींच्या सक्षमीकरणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महत्वपूर्ण योगदान देणार आणि येत्या काही महिन्यांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील सोडवून साऱ्यांची तहान भागवणार तसेच मतदार संघात महिलांसाठी अस्मिता भवन बांधण्याचे विचार देखील मांडले.



जागतिक महिला दिनानिमित्त वाघोली येथे महिला बचत गट मेळावा आज मोठ्या उत्साहात संपन्न झाला असून या मेळाव्यासाठी महिलांनी उत्स्फूर्तपणे आपली उपस्थिती दर्शविली.या दरम्यान महिला भगिनींना महिला दिनाच्या शुभेच्छा आमदार कटके यांनी दिल्या व मार्गदर्शन केले.

येणाऱ्या पाच वर्षात वाघोलीचा चेहरामोहरा बदलून सर्वांगीण विकास घडवण्यासाठी मी आमदार या नात्याने कटिबद्ध भूमिका निभावेल असे कटके यांनी सांगितले.विशेष म्हणजे सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे खराडी ते शिरूर बायपास अत्याधुनिक उड्डाणपुलाचे काम लवकरच मार्गी लागणार असून त्यासाठी मंजुरी मिळाली आहे.यामुळे समस्त पुणेकरांचे आणि इतर जिल्ह्यांतून ये-जा करणाऱ्या प्रवाश्यांचा प्रवास सुखकर होईल .



# आयईईईच्या वतीने मार्गदर्शक सत्राने महिलादिन साजरा

**पुणे** : आपल्या आवडीच्या क्षेत्रात कर्तृत्वाच्या आयईईई पुणे विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त केक कापून व मार्गदर्शक सत्राचे आयोजन करून साजरा करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या रिसर्च पार्क फौंडेशन येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी जपान येथील डॉ.टकाको हशिमोटो(-डायरेक्टर आय ईईई रिजन १०) व डॉ.अरुणा कटारा(होप फौंडेशन) यांच्या हस्ते केक कापण्यात आला. या प्रसंगी डॉ.आदित्य अभ्यंकर( तंत्रज्ञान विभाग प्रमुख सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) ,अमर बुचडे(चेअर आयईईई पुणे विभाग), डॉ.सिमरन खियानी(चेअर WIE आयईईई पुणे), डॉ.ज्योती भाकरे(इंचार्ज रजिस्ट्रार SPPU), अभिजित खुरपे (सेक्रेटरी आयईईई पुणे विभाग) आदी मान्यवरांच्या बरोबरच मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी बोलतांना प्रमुख मार्गदर्शक डॉ.टकाको हाशीमोटो यांनी महिलांनी यशस्वी होण्यासाठी कौशल्य,जनसंपर्क या बरोबरच कुटुंबाकडून पाठींबा मिळवायला हवा,कुटुंबाच्या आधार असल्यास यश मिळवता व टिकवता येते असे सांगितले. या प्रसंगी आयोजित चर्चा सत्राचे संचालन डॉ.राजश्री जैन यांनी केले.






# महिला दिनी महिलांची रंगली गान मैफल, उलगडला 'सखी मनरंग' !

पुणे : भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत 'सखी मनरंग' हा संगीतमय कार्यक्रम पुण्यात आयोजित केला होता. शनीवार,दि.८ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता भारतीय विद्या भवन (सेनापती बापट रस्ता) सभागृहात येथे झाला. मराठी आणि हिंदी गीतातून स्त्रियांच्या मनाचे अंतरंग उलगडून दाखविणारा हा कार्यक्रम 'सुरसखी' मधून प्रस्तुत करण्यात आला.कार्यक्रमात सर्व गायिका या महिला होत्या. साथसंगत देखील महिला कलाकारांनी केली.मानिनी गुर्जर यांची निर्मिती होती. संकल्पना-निवेदन रंजना काळे यांनी केले. गीते अनुराधा पटवर्धन,देवयानी सहस्त्रबुद्धे यांनी सादर केली. संपदा खरे-देशपांडे(हार्मोनियम),शिल्पा आपटे(तबला),किमया काणे(कीबोर्ड),उर्मिला भालेराव(-तालवाद्य) यांनी साथसंगत केली.भारतीय विद्या भवनचे सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी सर्व कलाकारांचा सत्कार केला. हा कार्यक्रम विनामूल्य होता. भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत होणारा २३६ वा कार्यक्रम होता. ही वाट दूर जाते, नजरिया लागे नही, तिन्ही सांजा सखे , मी राधिका, ये तेरा घर ये मेरा घर, जानू जानू री, ( अंगाई ) नीज माझ्या, कुणीही पाय नका वाजवू ही मेडले सादर करण्यात आली.लिंबलोण उतरता , झूठे नैना बोले या गीतांनंतर गीतरामायणातील काही गीतांची मेडली सादर करण्यात आली.




# त्यांच्या कला-साहित्यातून उलगडली ‘ती’


## ऋत्विक सेंटर आयोजित कार्यक्रमात व्यक्त झाले कलाकार

**पुणे** : कला हे अभिव्यक्तीचे माध्यम असते, त्यात भावना निर्माण होण्यासाठी ‘ती’चे अस्तित्व असावेच लागते. चित्रपट सृष्टीतील स्त्रीच्या प्रतिमेचा प्रवास अत्यंत निसरडा आहे. कारण हे माध्यम पुरुषांनी पुरुषांसाठी स्त्रीयांना वापरून निर्माण केले आहे. चित्रकलेच्या माध्यमातून स्त्रीरूप साकारताना तिच्याकडे ‘ऑब्जेक्ट’-‘प्रॉडक्ट’ म्हणूनच पाहिले जाते. परंतु चित्रकाराची स्त्रीकडे पाहण्याची नजर दैनंदिन व्यवहारात जशी स्त्री दिसते तशी असावी. नृत्याच्या क्षेत्रात स्त्रीने पुरुषाची नजर मान्य केली आहे, असे दिसते. कलाकार स्त्री असली तरी नृत्याद्वारे व्यक्त होणाऱ्या भावना पुरुषाच्या लेखणीतूनच उमटल्या आहेत, असा सूर ‘कलाकारांच्या नजरेतून ती’ या परिसंवादात उमटला.

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ऋत्विक सेंटरतर्फे विविध क्षेत्रातील प्रसिद्ध कलाकार आणि त्यांच्या कलेतील ‘ती’ या अनोख्या संकल्पनेवर विशेष कार्यक्रमाचे कोथरूडमधील ऋत्विक सेंटर येथे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात सुप्रसिद्ध दिग्दर्शक सुनील सुकथनकर, प्रसिद्ध चित्रकार राजू सुतार, भरतनाट्यम नृत्य कलाकार डॉ. परिमल फडके यांचा सहभाग होता. त्यांच्याशी पॉडकास्टर सौमित्र पोटे यांनी संवाद साधला. या निमित्ताने प्रख्यात चित्रकार प्रसाद भारद्वाज यांच्या अमूर्त चित्रकृतींचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

# अक्कलकोट पालखी पादुका दर्शन सोहळा

**पुणे :** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट येथून श्री स्वामी समर्थ पालखीचे पुण्यात आगमन होत असून बुधवार दिनांक १२ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता मंडईमधील श्री शारदा गजानन मंदिरापासून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. पालखी पादुका दर्शन सोहळ्यानिमित्त १६ मार्च पर्यंत कॉंग्रेस भवन येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



कार्यक्रमाचे आयोजन अण्णा थोरात, विनायक घाटे, विजय काजळे, नामदेवराव मोहिते, राजाभाऊ वरखडे, विलास चव्हाण यांनी केले आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने आणि श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र बलकवडे यांच्या हस्ते पालखी पादुका पूजन आणि आरती होऊन मिरवणूकीस प्रारंभ होईल.

यंदाचा श्री स्वामी समर्थ पुरस्कार श्री अक्कलकोट स्वामी समर्थ ट्रस्ट पुणे चे संस्थापक अध्यक्ष वीरेंद्र किराड यांना प्रदान करण्यात येणार आहे. १६ मार्च रोजी हा पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे. यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अक्कलकोटचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, पुनीत बालन ग्रुपचे पुनीत बालन, आमदार हेमंत रासने, सिद्धार्थ शिरोळे उपस्थित राहणार आहेत.

पालखी सोहळ्यात १३ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता तुकाराम दैठणकर आणि हर्षद कुलकर्णी हे ‘स्वामी भक्ती गीते’ सादर करणार आहेत. तसेच १४ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता लुई ब्रेड अंध अपंग कल्याण संस्था ऑर्केस्ट्रा साई सातसूर परिवार सांस्कृतिक मंच यांचा 'साई सातसुर' हा कार्यक्रम होणार आहे. तर १५ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता मुकुंद बादरायणी हे ‘स्वर समर्थ अभंगवाणी’ हा कार्यक्रम सादर करणार आहेत. १६ मार्च रोजी सायंकाळी ८ वाजता योगेश तपस्वी आणि सहकारी ‘स्वामीगीत सुगंध’ हा कार्यक्रम सादर करणार आहेत. यानंतर महिलांच्या हस्ते महाआरती होणार आहे. उत्सवात सर्व दिवस 'रक्तदान महायज्ञ' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

# कलेचा अनुभव भावनाविश्वाशी जोडलेला असतो -जयंत जोशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कलेची अभिव्यक्ती हा एक निश्चित स्फुरलेला विचार मांडण्याचा प्रयोग असतो. संगीतातही आणि चित्रकलेतही. तो कधीच अपघात नसतो. चित्राच्या निर्मितीमध्ये त्या चित्रकाराचे व्यक्तिमत्व दिसते. त्याची चित्रे पाहताना चित्रकाराच्या मनोभूमिकेबद्दल अंदाज बांधता येतो. तसेच कलेचा अनुभव अतिशय वैयक्तिक आणि पाहणाऱ्याच्या भावनाविश्वाशी जोडलेला असतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रकार जयंत जोशी यांनी केले. महाराष्ट्र कल्चरल सेंटरच्या पुणे गॅलरी ऑफ व्हिज्युअल आर्ट (पीजीव्हीए)च्या वर्षपूर्ती निमित्त आयोजित ‘चित्रध्वनी’ या दृक श्राव्य प्रदर्शनाचे उद्घाटन जयंत जोशी यांच्या हस्ते संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ. नितीन हडप, पीजीव्हीएचे समन्वयक प्रमोद काळे, विक्रम मराठे, चैतन्य कुंटे, सचिन निंबाळकर हे देखील यावेळी उपस्थित होते.

टिळक रस्त्यावरील हिराबाग चौकात असलेल्या ज्योत्स्ना भोळे सभागृह, श्रीराम लागू रंग अवकाश या ठिकाणी पुढील तीन महिने ‘चित्रध्वनी’ हे प्रदर्शन रसिकांसाठी सकाळी ११ ते सायं ८ या वेळेत विनामूल्य खुले असणार आहे.



पुणे महाराष्ट्र कल्चरल सेंटरच्या पुणे गॅलरी ऑफ व्हिज्युअल आर्ट (पीजीव्हीए)च्या वर्षपूर्ती निमित्त आयोजित ‘चित्रध्वनी’ या दृक श्राव्य प्रदर्शनाचे उद्घाटन जयंत जोशी यांच्या हस्ते संपन्न झाले, महाराष्ट्र कल्चरल सेंटरच्या पुणे गॅलरी ऑफ व्हिज्युअल आर्ट (पीजीव्हीए)च्या वर्षपूर्ती निमित्त आयोजित ‘चित्रध्वनी’ या दृक श्राव्य प्रदर्शनाचे उद्घाटन जयंत जोशी यांच्या हस्ते झाले.

# गायन, वादनाने रंगला निरामय संगीत सोहळा

## गांधर्व महाविद्यालय आणि जयंत केजकर शिष्यवृंदातर्फे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कला शिकण्यासाठी वयाचे बंधन नसते. कलेविषयीचे प्रेम, परिश्रमांची तयारी, गुरुंवरील निष्ठा आणि प्रयत्नांमधील सातत्य, यांच्या आधाराने व्यक्ती स्वतःमधील कलाकार घडवू शकतो याचा प्रत्यय देणाऱ्या प्रगल्भ सादरीकरणातून युवा आणि ज्येष्ठ कलाकरांनी रसिकांची दाद मिळवली.

गांधर्व महाविद्यालय आणि जयंत केजकर शिष्यवृंद आयोजित निरामय संगीत सोहळाझाला. गायन, वादन आणि सहगायनाने ही मैफल उत्तरोत्तर रंगत गेली.



निरामय संगीत सोहळ्यात सुरवातीला उस्ताद बाले खाँ यांच्या शिष्या किशोरी कुलकर्णी यांचे सतारवादन झाले. त्यांनी राग अहिरभैरव मध्ये आलाप, जोड झाला या क्रमाने वादन केल्यानंतर तीन तालातील रचना सादर केली. त्यांना तबल्याची साथ महेश केंगार यांनी केली.

त्यानंतर डॉ. प्रकाश कुलकर्णी यांनी राग तोडी सादर केला. ‘दैय्या बट दुबर भयी’ हा विलंबित त्रिताल आणि जोडून द्रुत तीनतालात ‘मै तुमरी शरणागत प्यारी’ ही रचना ऐकवली. त्यांना श्रीपाद शिरवळकर (तबला), मयुरेश गाडगीळ (हार्मोनियम) तसेच विनय कोहाड व कन्हैया भोसले यांनी तानपुरा साथ केली.

त्यानंतर कन्हैया भोसले आणि विनय कोहाड या युवा कलाकरांचे सहगायन रंगले. त्यांनी राग भटियार मध्ये बडा ख्याल ‘बरनीन जाय’ (विलंबित त्रिताल), छोटा ख्याल ‘काहे को हमसंग करत’ (ताल त्रिताल) सादर केला. त्यांना श्रीपाद शिरवळकर (तबला), मयुरेश गाडगीळ (हार्मोनियम), तर कौस्तुभ लिमये व प्रद्युम्न नाडगौडा (तानपुरा) यांनी साथ केली. कार्यक्रमात पुढे पं. प्रमोद मराठे यांचे संवादिनी वादन रंगले. त्यांनी सुरुवातीस राग किरवाणी सादर केला. तसेच पहाडी धून पेश केली. तबलासाथ अभिजीत जायदे यांनी केली. त्यांच्या संवादिनी वादनाने रसिक मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाची सांगता जयंत केजकर यांच्या गायनाने झाली. त्यांनी राग ललत मधील ‘अरे मन राम’, ‘जोगिया मोरे घर आये’ या रचना सादर केल्यानंतर राग लंकादहन सारंग मध्ये ‘चरणतक आये’ ही विलायत हुसेन खाँ यांची बंदिशी सादर केली.

“ मी वैद्यकीय क्षेत्रात कारकीर्द केली पण लहानपणापासूनच मला संगीत क्षेत्राची आवड होती. पं. विनायकबुवा पटवर्धन यांच्याकडे माझे वडील संगीत शिकले होते. मी भूलतज्ज्ञ म्हणून वैद्यकीय क्षेत्रातील कार्यातून निवृत्त झाल्यानंतर संगीत कला शिकण्यास सुरुवात केली. आवाज साधनेचा अभ्यास केला.

— डॉ. प्रकाश कुलकर्णी,



## जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिर

**चिंचवड :** श्री जैन विद्या प्रसारक मंडळ चिंचवड या संस्थेने सन १९२७ पासून शैक्षणिक आणि सामाजिक कार्यात अग्रेसर असणारी संस्था म्हणून नावलौकिक मिळवले आहे. हेच कार्य पुढे नेण्यासाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून श्री जैन विद्या प्रसारक मंडळ चिंचवड आणि श्रीमान शांतीलालजी भीकचंदजी कटारिया आदित्य बिल्डर्स यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 8 मार्च जागतिक महिला दिनी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. हे शिबिर रसिकलाल एम धारिवाल इंटरनॅशनल स्कुल (CBSE) वाल्हेकरवाडी रोड, चिंचवड आणि संघवी केशरी कॉलेज व रसिकलाल एम धारिवाल फार्मसी कॉलेज फिनॉलेक्स कंपनी समोर, चिंचवड स्टेशन या दोन ठिकाणी एकाच वेळी आयोजित करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये मध्ये १७ पेक्षा जास्त रक्तपेढी संस्था आणि १७५५ विद्यार्थी, पालक आणि परिसरातील नागरिकांनी आपला सहभाग नोंदविला. सदरील रक्तदान शिबिराची विशेष बाब म्हणजे या रक्तदान शिबिरामध्ये बॉम्बे ब्लड ग्रुप चे अत्यंत दुर्मिळ असे रक्तदाते जे की फक्त महाराष्ट्रामध्ये 16 आणि जगभरात ४०० आहेत त्यापैकी एका रक्तदात्यांनी रक्तदान शिबिरामध्ये सहभाग नोंदविला ही गोष्ट अतिशय अभिमानास्पद आहे.



## देहू ते भंडारा डोंगर भव्य दिंडी सोहळा संपन्न

**देहू :** धन्य तुकोबा समर्थ। जेणे केला हा पुरुषार्थ ॥ हेच वचन मनात ठेवून फुलांनी सजलेल्या पालखीत तुकोबांच्या चांदीच्या पादुका, टाळ – मृदंगाचा गजर, ज्ञानोबा तुकोबांचा नामघोष करीत हजारोंच्या उपस्थितीत देहू ते भंडारा डोंगर मार्गावर दिंडी सोहळ्याने डोळ्यांचे पारणे फेडले. जगद्गुरु तुकोबारायांच्या पंचमवेद गाथा भांडारातील ज्ञानावर अध्यात्मिक पोषण झालेल्या वारकरी बांधवांकडून ३७५ व्या सदेह वैकुंठ गमन सोहळ्याचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ८ ते १७ मार्च २०२५ या दहा दिवसाच्या कालावधीत हे आयोजन करण्यात आले आहे. जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठगमनाला येत्या १६ मार्च रोजी अर्थात तुकाराम बीजेच्या दिवशी ३७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सव सोहळा साजरा होत आहे. या सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आणि संगीत गाथा पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. श्री जगद्गुरू तुकाराम महाराज संस्थान, श्री क्षेत्र देहू यांनी हा मान पुणे जिल्ह्यास दिला आहे. श्री क्षेत्र आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेचे अध्वर्यू हभप मारूतीबाबा कुऱ्हेकर महाराज आणि वारकरी रत्न हभप ज्ञानेश्वर माऊली कदम महाराज यांच्या नेतृत्त्वाने गाथा पारायण सोहळा येत्या ९ मार्च ते १७ मार्च या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. भंडारा डोंगराच्या पायथ्याला हा सोहळा होत आहे.

## नागरिकांचा प्रदूषण विरोधात भव्य मूक मोर्चा

**वाकड :** वाकड-ताथवडे परिसरातील नागरिकांनी हवा प्रदूषणाविरोधात भव्य मूक मोर्चा काढला होता. शनी मंदिर रोड वाकड-ताथवडे परिसरातील २२ हून अधिक गृहनिर्माण सोसायट्यांचे ५०० पेक्षा जास्त रहिवासी आज "*हवा प्रदूषण विरोधी मूक मोर्चात सहभागी झाले होते. सिमेंट मिक्स धुळ आणि बांधकामाच्या धुळीमुळे वाढलेल्या प्रदूषणाच्या विरोधात आवाज उठवत स्वच्छ व निरोगी पर्यावरणाची मागणी करण्यात आली.वाकड-ताथवडे हौसिंग सोसायटीज फोरम यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा कोहिनूर कोर्टयार्ड वन सोसायटी पासून इंदिरा स्कूल मार्गे वाकडकर चौकापर्यंत नेण्यात आला. या मोर्चात ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.नागरिकांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, जर तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर हा आंदोलन पुढील स्तरावर नेला जाईल, असा इशारा नागरिकांनी प्रशासनाला दिला .

## महिलांचा अनोखा सन्मान...




पिंपरी जागतिक महिला दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात कीर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## महिला बचत गटांचा विशेष सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** जागतिक महिला दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात कीर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी माजी महापौर माई ढोरे, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सचिव ॲड. गोरक्ष लोखंडे, माजी नगरसदस्या उषा मुंढे,अनुराधा गोरखे,अश्विनी चिंचवडे, आरती चौंधे,सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,प्रशासन अधिकारी पूजा दूधनाळे यांच्यासह महानगरपालिकेच्या विविध विभागात काम करणाऱ्या महिला अधिकारी, कर्मचारी, महिला बचत गटातील महिला मोठ्या उपस्थित होत्या. यावेळी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सचिव ॲड.गोरक्ष लोखंडे यांनी सांगितले की, 'महाराष्ट्राच्या मातीला महिलांच्या शौर्याचा मोठा इतिहास आहे. स्वराज्य निर्माणाची छत्रपती शिवाजी महाराजांना प्रेरणा देणाऱ्या राजमाता जिजाऊ यांनी केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशभर आपला ठसा उमटवला.

# खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते उद्घाटन

### वाहन मुक्त दिन' हा एक स्तुत्य उपक्रम ठरणार

**पिंपरी :** दिवसेंदिवस शहरातील वाहनांची संख्या वाढत आहे,त्यामुळे वाहतुकीच्या समस्या निर्माण होत आहेत. तसेच पर्यावरणाला हानी पोहचत आहे.शहरात खरेदीसाठी बाहेर पडणाऱ्या पादचारी नागरिकांना देखील वाहतूक समस्या भेडसावत असते,या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने नियोजन करून शहरात प्रथमच गजबजलेल्या पिंपरी बाजारपेठेत वाहन मुक्त दिवसाचे आयोजन करून स्तुत्य उपक्रम राबविला आहे तसाच उपक्रम शहरातील इतर ठिकाणीही राबवावा असे प्रतिपादन खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ८ व ९ मार्च २०२५ रोजी सकाळी ८ ते रात्री ९ वाजेपर्यंत पिंपरी बाजार परिसरात (साई चौक ते शगून चौक आणि शगून चौक ते महर्षी वाल्मिकी चौक) अशा अनोख्या प्रकारच्या पहिला वाहन-मुक्त दिवसाचे उद्घाटन खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांच्या हस्ते झाले त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



### या दिवसाचे महत्वाचे मुद्दे

- १) आयोजित पहिल्या वाहन-मुक्त दिनात पुढील दोन दिवस चालणा-या या उपक्रमात झुंबा, लाईव्ह संगीत, सायकलींग, पथनाट्य, नृत्यप्रदर्शन, खेळ यांसारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन
- २ ) वाहन-मुक्त दिनानिमित्त संपूर्ण पिंपरी बाजारपेठ क्षेत्र सुशोभित करण्यात आले
- ३) या वाहनमुक्त दिवसाचा मुख्य उद्देश नागरिकांना मोकळ्या रस्त्यांचा आनंद घेण्यास संधी देणे आहे, जिथे ते चालू शकतील आणि बाजार परिसराचा आनंद घेऊ शकले
- ४) यासोबतच हा उपक्रम पिंपरी बाजारपेठेत पादचाऱ्यांसाठी आणि सायकलस्वारांसाठी पूरक वातावरण निर्मिती करणे, पर्यावरणाचे संतुलन राखणे आणि प्रदूषण मुक्तीसाठी जनजागृती करणे यासाठी उपयुक्त ठरणार आहे.
- ५) नागरिकांचा पर्यावरण पूरक उपक्रमात सहभाग वाढविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे..

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा पहिला 'वाहन मुक्त दिन' हा एक स्तुत्य**



**उपक्रम ठरणार आहे. यामुळे आज ज्या पिंपरी मार्केट मधील रस्त्यावर चालता येत नव्हते त्या रस्त्यांवर आज लहान मुले खेळ खेळताना दिसत आहेत. या माध्यमातून पादचारी नागरिकांना चालण्यासाठी चांगले मार्ग उपलब्ध होणार आहेत. देशभरात विविध शहरांमध्ये वाहतूक समस्या सोडविण्यासाठी व नागरिकांना रस्तांवर चालताना अडचणी येऊ नये म्हणून वाहन मुक्त दिन साजरा केला जात आहे.**

**- श्रीरंग बारणे,** खासदार

## सीए देशाच्या आर्थिक प्रगतीचे शिल्पकार : बिराजदार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** जीएसटीचा गाडा ओढणे म्हणजे एक प्रकारचा जगन्नाथचा रथ ओढण्या सारखे आहे. या रथाला सर्वांचा हातभार लागणे गरजेचे आहे.जीएसटी विभागाने थकबाकीदारांसाठी सुरु केलेली अभय योजनेचा लाभ मार्च अखेर पर्यंत घ्यावा . जीएसटी ॲम्नेस्टी या योजने अंतर्गत ज्यांचा कर भरायचा राहिला असेल त्यांनी भरून महाराष्ट्राला अधिक समृद्ध करा. असे आवाहन करीत

जीएसटी विभागाचे राज्याच्या आर्थिक प्रगतीमध्ये महत्वाचे योगदान आहे. तर सनदी लेखापाल हे भारताच्या आर्थिक प्रगतीचे शिल्पकार आहेत. असे उदगार राज्य कर विभागाचे अतिरिक्त आयुक्त उमाकांत बिराजदार यांनी काढले. निगडी येथील दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जीएसटी ॲम्नेस्टी कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी राज्य कर सहआयुक्त नरेंद्र कासार, उपायुक्त वैशाली एस काशीद,आयसीएआय पिं चिं शाखेचे अध्यक्ष सीए वैभव मोदी, उपाध्यक्ष सीए सारिका चोरडिया, सचिव मनोज मालपाणी, खजिनदार महावीर कोठारी, विकासा अध्यक्ष धीरज बलदोटा, सदस्य शैलेश बोरे , सदस्य सचिन ढेरंगे, प्रादेशिक परिषद सदस्य राजेश आगरवाल,माजी अध्यक्ष पंकज पाटणी,संतोष संचेती, सचिन बन्सल, सिमरन लिलवानी ,समन्वयक नवनीत बोरा, जीतोच्या पूनम बंब, हर्षद खिंवसरा आणि सुमारे २० सहाय्यक आयुक्त आणि सीए इन्स्टिट्यूट चे माजी अध्यक्ष उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिमा भिसे तर आभार मनोज मालपाणी यांनी मानले.




## ग्रंथालयाच्या वतीने महिला पोलीस सन्मानित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** 'अधिकारी महिलांनी समाजातील उपेक्षित महिलांना न्यायाची आणि सन्मानाची वागणूक द्यावी!' असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या कविता बहल यांनी सोहम् सार्वजनिक ग्रंथालय आणि अभ्यासिका, संत तुकारामनगर, पिंपरी येथे व्यक्त केले. जागतिक महिला दिनानिमित्त ग्रंथालयाच्या वतीने महिला पोलीस कर्मचारी आणि स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थिनी यांचा प्रातिनिधिक सन्मान करताना कविता बहल बोलत होत्या. सोहम् ग्रंथालयाचे संस्थापक - अध्यक्ष जगन्नाथ नेरकर, सचिव प्रदीप बोरसे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

कविता बहल पुढे म्हणाल्या की, 'एकेकाळी पुरुषांची मक्तेदारी असलेल्या पोलीस खात्यात किरण बेदींसारख्या महिलांनी आपल्या कर्तबगारीने कर्तव्य अन् कर्तृत्वाचे नवीन मानदंड निर्माण केले आहेत. त्याचा आदर्श आताच्या कार्यरत आणि भावी महिला अधिकारी यांनी घ्यावा!' जगन्नाथ नेरकर यांनी 'संत मुक्ताई, राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी, भारतरत्न लता मंगेशकर ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या अशा असंख्य थोर महिलांनी भारताचे नाव जगाच्या इतिहासात उज्वल केले आहे. त्यामुळे क्षेत्र कोणतेही असलेतरी विद्यार्थिनींनी केवळ महिलादिनालाच नव्हे तर नेहमीच समाजातील महिलांचा आदर ठेवून उच्च ध्येयाचे लक्ष्य गाठावे!'. पल्लवी माने यांनी प्रातिनिधिक मनोगतातून, 'आईवडिलांचा आशीर्वाद, कठोर परिश्रम, नियमित अभ्यास यामुळे निश्चितच अपेक्षित यशप्राप्ती होते!'



पिंपरी जागतिक महिला दिनानिमित्त ग्रंथालयाच्या वतीने महिला पोलीस कर्मचारी आणि स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थिनी यांचा प्रातिनिधिक सन्मान करण्यात आला.

# नाविण्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या आधारावरच शाश्वत विकास शक्य : कल्याण पवार




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आकुर्डी :** शाश्वत विकास म्हणजे आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय समतोल होय. या तीनही गोष्टींचा समतोल अत्यंत महत्वाचा आहे. या गोष्टी करायच्या असतील तर नाविण्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शक्य होईल. यामध्ये स्वच्छ उर्जा, हरित उर्जा, अक्षय उर्जा या क्षेत्रांध्ये उद्योजकांनी उद्योगशिलता दाखवावी. असे मत एंडुरंस टेक्नॉलॉजीचे कार्यकारी उपाध्यक्ष कल्याण पवार यांनी व्यक्त केले.

आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज आणि डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मास्टर्स ऑफ कॉम्प्यूटर ॲप्लीकेशन ॲण्ड मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी वर्ल्ड एम कंपनीचे संचालक जस्पर फोर्चून, पोसको कंपनीचे चिरंजीव मैनी, विलो मॅथर च्या एच आरच्या महाव्यवस्थापक कल्याणी कुलकर्णी,डॉ .डी .वाय पाटील संस्थेच्या व्यस्थापकीय संचालिका (क्वालिटी ॲश्युरन्स )डॉ . श्वेता चव्हाण पाटील, डी .वाय पाटील एज्युकेशनल कॉम्प्लेक्सचे संचालक रिअर ॲडमिरल अमित विक्रम, सल्लगार संचालक प्रा डी आर करुनूरे, कॉर्पोरेट रिलेशन्स प्रमुख डॉ जयसिंग पाटील, डी .वाय पीआयएमसीएच्या संचालिका डॉ के निर्मला,डिवायपीआयएमएसचे प्र संचालक ललित प्रसाद आदी उपस्थित होते.

कल्याणी कुलकर्णी म्हणाल्या, चाणक्य नितीनुसार आपण इतरांच्या चुकांमधून जास्त शिकतो. कोणताही व्यवसाय करत असताना आपल्याला चांगला मार्गदर्शक असावा लागतो. डी. जसपर फोरच्युन म्हणाले की, कल्पनाशक्तीमध्ये खूप ताकत असते. आपण जर शाश्वत विकासासाठी कल्पनाशक्तीचा वापर केला तर आपण व्यवसाय करताना भेडसावणा-या समस्यांवर मात करु शकतो. श्री मैनी म्हणाले की, शाश्वत विकास म्हणजे निसर्गाला ईजा न पोहोचता केलेला विकास, जो येणा-या पिढ्यांसाठी चिरंतन टिकेल. त्यांनी सांगितले की, प्लास्टिकचा वापर न करता ज्या गोष्टी पुन्हा-पुन्हा वापरण्यात येतील अशा गोष्टी बनविण्यामध्ये व्यावसायिकांनी अंगिकारल्या पाहिजेत.

ॲडमिरल (नि) अमित विक्रम म्हणाले की, एका बाजूला तंत्रज्ञान झापाट्याने बदलत आहे. तर दुस-या बाजूला पर्यावरणीय बदल सुद्धा मोठ्या प्रमाणावर होत आहेत. जागतिक आव्हानांचा फटका अर्थव्यवस्थेला बसणार आहे. भरताचा जर विचार केला तर अक्षय उर्जा आणि तिचे स्त्रोत यावर काम करण्यासाठी भरपूर वाव आहे आणि ते एक शाश्वत विकासाचे उत्तम उदाहरण ठरेल.प्रसाद म्हणाले कि, परिषदेचा विषय हा शाश्वत उद्योजकता आणि स्टार्ट-अप इको-सिस्टीम जागतिक आव्हाने आणि संधी आहे. हा विषय आजच्या घडीला अत्यंत महात्वाचा आहे, सदर परिषदेच्या उद्घाटनाचे सुत्र संचालन प्रा. मिनल वाघ यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. अविनाश पवार यांनी केले.

डिवाय पाटील संस्थेने नेहमीच कॉर्पोरेट क्षेत्रासाठी दर्जेदार व्यवस्थापकीय कौशल्य असलेले नेतृत्व घडविण्यावर भर दिला आहे. तसेच संस्था सामाजिक मुल्ये त्यांच्यामध्ये रुजविण्याचे काम करते व हे सर्व शाश्वत विकासाचा भाग म्हणून संस्था योगदान देत आहे.

**— डॉ. श्वेता चव्हाण,**

संपादकीय विशेष

# अर्थसंकल्पासमोर आव्हाने

राज्याचा अर्थसंकल्प मांडायचा म्हटले तर पै-पैचा हिशोब मांडावा लागतो. यातूनच राज्याची आर्थिक स्थिती समोर येत असते. अजितदादांनी दोन दिवसांपूर्वी सादर केलेल्या आर्थिक पाहणी अहवाल पाहिला, तरी राज्यासमोरील आर्थिक आव्हानांची कल्पना येते. विधानसभा निवडणुकीनंतर अर्थमंत्री अजित पवार हे देवेंद्र फडणवीस २.० सरकारच्या कार्य काळातील पहिलाच अर्थसंकल्प सादर करणार आहेत. वास्तविक महाराष्ट्राच्या २०२५ च्या अर्थसंकल्पासमोर अनेक आव्हाने आहेत. जी प्रामुख्याने राज्याच्या अनिश्चित आर्थिक परिस्थितीमुळे निर्माण झालेली आहेत. २०२४-२५ साठी दोन लाख कोटी रुपयांची वित्तीय तूट ही एक मोठी चिंता आहे. राज्यावरचे एकूण कर्ज सात लाख ८२ हजार ९९१ कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. ते एकूण राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या (जीएसडीपी) १८.३५ टक्के आहे. 'आमदनी अठन्नी खर्चा रुपैया' या म्हणीप्रमाणे राज्य सरकारचे कामकाज सुरू आहे. यामुळे राज्यासमोर आर्थिक संकट वाढले आहे. महसुली उत्पन्नापेक्षा राज्याचा खर्च जास्त होत आहे. कर्ज आणि व्याजापोटी मोठी रक्कम खर्च होत आहे. यामुळे भांडवली खर्चासाठी दुसरे कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही, अशी परिस्थिती आर्थिक पाहणी अहवालातून पुढे आली आहे. आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवालातून राज्याची बिकट परिस्थिती समोर आली आहे. विधानसभेच्या निवडणूक निकालानंतर फडणवीस सरकारचा पहिला अर्थसंकल्प आज अधिवेशनात मांडला जाणार आहे. त्यापूर्वी आर्थिक पाहणी अहवालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. पवार यांच्याकडून राज्याचा अर्थिक अहवाल मांडण्यात आला. त्यात राज्याचे उत्पन्न आणि खर्चाची जी आकडेवारी देण्यात आली आहे, ती चिंताजनक आहे. त्याचे कारण राज्यात मोठमोठे पायाभूत प्रकल्प सुरू आहेत. त्यांच्यासाठी तसेच कल्याणकारी योजनांसाठी निधीची आवश्यकता आहे. लोकानुनयी योजनांसाठी ९६ हजार कोटी रुपये आणि वेतन तसेच अन्य प्रशासकीय बाबींसाठी उत्पन्नाच्या ६५ टक्के रक्कम खर्च होत असेल, तर विकासासाठी पैसेच राहत नाहीत. त्यामुळे आदिवासी, दलित तसेच महिला आणि मुलांच्या योजनांना कात्री लावण्याची वेळ सरकारवर येत असते. सन २०२४-२५ च्या अंदाजानुसार राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये २०२३-२४ तुलनेत ७.३ टक्के वाढ अपेक्षित असून देशाच्या अथर्व्यवस्थेमध्ये साडेसहा टक्के टक्के वाढ अपेक्षित आहे. महाराष्ट्राचा आर्थिक विकास दर देशापेक्षा जास्त असला, तरी त्यात सर्वाधिक कृषी क्षेत्राचा विकास ८.७ टक्के, उद्योग क्षेत्राचा विकास ४.९ टक्के तर सेवा क्षेत्राचा विकास ७.८ टक्के असेल असा अंदाज अहवालात वर्तवण्यात आला आहे.

आर्थिक पाहणी अहवालानुसार राज्याचे २०२४-२५ चे स्थूल उत्पन्न ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी इतके नमूद करण्यात आले आहे. आर्थिक पाहणी अहवालात २०२४-२५ साठी राज्याच्या महसुली जमेचा अंदाज ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी नमूद करण्यात आला आहे. २०२३-२४ साठी सुधारित अंदाज ४ लाख ८६ हजार ११६ कोटी आहे. याशिवाय कर महसूल व करेतर महसूल यांच्यासाठीचे अंदाज अनुक्रमे ४ लाख १९ हजार ९७२ कोटी व ७९ हजार ४९१ कोटी आहेत. महाराष्ट्राच्या कर्जात लक्षणीय वाढ झाली आहे, २०२३-२४ मध्ये राज्याने ८२ हजार ४३ कोटी रुपये कर्ज घेतले आहे. त्यामुळे एकूण कर्ज ७.११ लाख कोटी रुपये झाले आहे. २०२४-२५ साठी दोन लाख कोटी रुपयांची अंदाजित वित्तीय तूट ही राज्याच्या आर्थिक व्यवस्थापनासमोर एक महत्त्वाचे आव्हान आहे. महाराष्ट्राची राजकोषीय तूट ही एक गंभीर चिंतेची बाब आहे. येत्या वर्षात राज्याचे कर्ज ७.८ लाख कोटींपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. २०२४-२५ साठी राजकोषीय तूट सुमारे २ लाख कोटी असण्याचा अंदाज आहे. मागील वर्षाच्या तुलनेत लक्षणीय वाढ आहे. दुसरीकडे राज्याची महसुली तूटदेखील चिंतेची बाब आहे. २०२२-२३ मध्ये महसुली अधिशेष राखण्याच्या उद्दिष्टाच्या तुलनेत १,९३७ कोटींची तूट नोंदवली गेली आहे. सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या (जीएसडीपी) टक्केवारी म्हणून राजकोषीय तूट २०२२-२३ मध्ये १.९२ टक्के होती. ती महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत निश्चित केलेल्या तीन टक्क्यांच्या उद्दिष्टाच्या आत आहे. वाढती कर्ज पातळी आणि राजकोषीय तूट महाराष्ट्राच्या दीर्घकालीन आर्थिक आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण धोके निर्माण करते. राज्य सरकारने त्यांच्या अर्थसंकल्पीय प्राधान्यांचे पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक आहे. या आव्हानांना तोंड देण्यासाठी पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढवण्यावर आणि आर्थिक व्यवस्थापन सुधारण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रावरील कर्जाचा बोजा हा एक गंभीर चिंतेचा विषय आहे. राज्याचे कर्ज-ते-जीडीपी गुणोत्तर अंदाजे १८.४ टक्के आहे. ते भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत तुलनेने कमी आहे. असे असले तरी आर्थिक उत्पादनाच्या तुलनेत कर्जाच्या पातळीत सतत वाढ होत असल्याने राज्याच्या आर्थिक आरोग्याविषयी आणि शाश्वततेबद्दल चिंता निर्माण होते.

राज्याने मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले असूनही, विकास प्रकल्पांवरील खर्च आणि भांडवली खर्च कमी झाला आहे. तो प्राधान्यक्रमांमध्ये चांगला बदल दर्शवत नाही. महाराष्ट्र सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ४६ हजार कोटीच्या बजेटची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेचे उद्दिष्ट राज्यातील आर्थिकदृष्ट्या वंचित महिलांना आर्थिक मदत देणे हे आहे. त्यांना दरमहा दीड हजार रुपये देण्यात येत आहेत. आतापर्यंत सुमारे २.३४ कोटी महिला लाभार्थी म्हणून ओळखल्या गेल्या आहेत. त्यांच्यासाठी सरकारने आधीच २१ हजार कोटी वितरित केले आहेत. राज्य सरकारच्या सध्याच्या आर्थिक आव्हानांचा विचार करता, या योजनेचा आर्थिक भार मोठा आहे. या योजनेसाठी सरकारला त्याच्या बजेटचा एक मोठा भाग वाटप करावा लागेल. त्याचा परिणाम इतर महत्त्वाच्या विकास प्रकल्पांवर आणि उपक्रमांवर होऊ शकतो. एकंदरीत, "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेचे उद्दिष्ट आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना सक्षम बनवणे असले, तरी राज्य सरकारवरील त्याचे आर्थिक परिणाम लक्षणीय आहेत. महाराष्ट्र सरकार विविध उपक्रमांद्वारे आपल्या अर्थसंकल्पात उत्पन्न निर्माण करण्याची योजना आखत आहे. पर्यटनाला चालना देणे ही एक प्रमुख रणनीती आहे. त्यात पुढील दशकात एक लाख कोटी रुपयांची कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे आणि १८ लाख रोजगार निर्माण करणे हे एक व्यापक पर्यटन धोरण आहे. हे साध्य करण्यासाठी, सरकार मजबूत पायाभूत सुविधा विकसित करण्यावर आणि टूर ऑपरेटर आणि 'एमआयसीई' आयोजकांसह भागधारकांशी भागीदारी करण्यावर लक्ष केंद्रित करेल. यामुळे या क्षेत्रांमध्ये महसूल निर्मिती दुप्पट होण्याची अपेक्षा आहे. याव्यतिरिक्त, सरकार महाराष्ट्राला एक प्रमुख जागतिक पर्यटन स्थळ म्हणून स्थान देण्याची योजना आखत आहे. त्यात आंतरराष्ट्रीय पर्यटकांना सेवा देणारी आकर्षणे, सुविधा आणि सेवांमध्ये गुंतवणूक करणे समाविष्ट असेल. अर्थसंकल्पातील तपशील अद्याप स्पष्ट नसला, तरी सरकार इतर संपत्ती निर्माण करणाऱ्या उपक्रमांवर लक्ष केंद्रित करण्याची शक्यता आहे.

# धुरांच्या वलयापासून दूर जाण्यासाठी...

**दर वर्षी नऊ मार्च जागतिक पातळीवर धूम्रपानविरोधी दिवस म्हणून पाळला जातो. केवळ धूम्रपानाची सवय सोडण्यास प्रोत्साहन देणे हा या दिवसाचा उद्देश नाही तर, त्याच्या घातक परिणामांविषयी जागरूकता वाढवणे आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीला सुरक्षित शारीरिक आणि मानसिक आरोग्याची जीवनशैली स्वीकारण्याची प्रेरणा देणे हे आहे. या निमित्ताने आजच्या पिढीला या समस्येची ओळख करून करुन देणेही गरजेचे आहे.**

दखल

रा

उर्मिला राजोपाध्ये

दर वर्षी नऊ मार्च हा दिवस 'नो स्मोकिंग डे' अर्थात धूम्रपानविरोधी दिवस म्हणून पाळला जातो. धूम्रपान आरोग्याला घातक असून त्यामुळे कर्करोगासारखे आजार जडण्याची तसेच जीवाला धोका उत्पन्न होण्याची शक्यता अनेक पटींनी वाढते, हे माहिती असले आणि मान्यवरांनी वारंवार त्यासंबंधी सूचित केले असले तरी सिगारेटच्या पाकिटावर लिहिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करत धूम्रपान करणाऱ्यांचे प्रमाण आजही कमी झालेले नाही. त्यामुळेच या दिवसाच्या निमित्ताने यासंबंधीच्या सध्याच्या आव्हानांवर चिंतन करणे गरजेचे ठरते. 9 मार्च या दिवशी धूम्रपानाच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता वाढवण्याचा प्रयत्न होतो. हेच हा दिवस पाळला जाण्यामागील प्रयोजन आहे. धूम्रपानाच्या सवयीचे समाज आणि व्यक्तीवर होणारे हानिकारक परिणाम सांगणारा हा दिवस केवळ धूम्रपान करणाऱ्यांच्याच नव्हे तर त्याच्याबरोबर राहणाऱ्या, वावरणाऱ्या प्रत्येकाच्या आरोग्याच्या दृष्टीने एक गंभीर संदेश देतो. आधुनिक युगात तर धूम्रपानाशी संबंधित अनेक नवे प्रश्न आणि आव्हाने समोर येत आहेत, कारण सिगारेट किंवा अन्य तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन केवळ शारीरिक हानी करत नाही, तर सामाजिक, मानसिक आणि आर्थिक परिणामही घडवतो. म्हणूनच त्याचा विचार करणे आवश्यक आहे.

आजच्या काळात धूम्रपानाच्या हानीची माहिती लोकांपर्यंत पोहोचली असली तरी अनेक कारणांमुळे ते या व्यसनापासून मुक्त होऊ शकत नाहीत. त्यामुळेच सध्या आधुनिक तंत्रज्ञानाने जग माहितीशी जोडले असले आणि या माध्यमातून जगभर संकलित होणारी माहिती आणि त्याचे गांभीर्य समोर येत असले तरीही धूम्रपानाची सवय हे एक सामाजिक ओझेच आहे. त्यामुळेच यावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्याचे आव्हान आज जगासमोर आहे. आजकाल धूम्रपानाचे प्रमाण वाढले आहे. विशेषत: तरुणांमध्ये ते कमालीचे वाढले आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून जास्त माहिती पोहोचत असल्याने धूम्रपानाकडे एक फॅशन म्हणून बघण्याची मानसिकता दिसत आहे. कधी कधी फॅशनच्या, थ्रीलच्या नावाखाली तर कधी मानसिक ताणतणाव किंवा एखाद्या ठिकाणी वेटिंगच्या वेळेत, ग्रुपबरोबर मस्तीच्या मूडमध्ये असताना धूम्रपान करण्याची सवय लागते, जी अल्पावधीत व्यक्तीचा कब्जा घेते. अर्थातच या सवयीमुळे युवा पिढीच्या आरोग्याबाबतच्या अडचणी वाढतात.

धूम्रपानामुळे जागतिक आरोग्यावर होणाऱ्या गंभीर परिणामांची चर्चाही या निमित्ताने करायला हवी. कारण 'वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन'च्या अहवालानुसार धूम्रपानामुळे प्रत्येक आठ सेकंदाला एक व्यक्ती मृत्युमुखी पडते. या व्यसनामुळे जडणाऱ्या आजारांची यादी तर बरीच लांबलचक आहे. जसे की, यामुळे फुफ्फुसांचा कर्करोग, हृदयरोग आणि इतर शारीरिक विकार जडतात आणि त्यामध्ये जगभर लाखो लोकांचा जीव जातो. म्हणूनच याबद्दल अधिक माहिती देऊन लोकांमध्ये अधिक प्रमाणात जागरूकता निर्माण होण्याची आवश्यकता आहे. यासबंधीचा आणखी एक मुद्दा म्हणजे आता सिगारेट्स आणि तंबाखूजन्य उत्पादने केवळ पारंपरिक पद्धतीनेच नाही तर इलेक्ट्रॉनिक सिगारेट्स आणि व्हेपिंगच्या रूपातदेखील बाजारात उपलब्ध आहेत. अनेकजण व्हेपिंग किंवा ई-सिगारेट्स कमी धोकादायक मानतात. प्रत्यक्षात अशी उत्पादने स्वास्थ्यासाठी इतर सिगारेट्सपेक्षा जास्त धोक्याची ठरू शकतात. त्यामुळेच यासंबंधीचे इत्यंभूत शिक्षण आणि जागरूकता निर्मितीसाठी या दिवसाचे औचित्य साधायला हवे.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे धूम्रपानाचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक परिणाम अत्यंत जटील आणि धोकादायक आहेत. आजच्या जगात धूम्रपानाची समस्या केवळ व्यक्तीला प्रभावित करत नाही तर त्याचा परिणाम संपूर्ण समाजावर आणि कुटुंबावर होतो. त्यामुळेच हा एक सामाजिक प्रश्न बनतो. धूम्रपानाच्या शारीरिक परिणामांची चर्चा नेहमीच होते. मात्र मानसिक दृष्टीनेही धूम्रपान अनेक मानसिक समस्या निर्माण करते. या एका सवयीमुळे शरीरातील रसायनांचे संतुलन बिघडते. परिणामस्वरूप ताण, चिंता आणि



इतर मानसिक विकार उद्भवतात. खेरीज धूम्रपानामुळे समाजावर देखील प्रतिकूल प्रभाव पडतो. तंबाखूचे सेवन ही एक महागडी सवय असल्यामुळे व्यक्तीच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करू शकते. याशिवाय सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे हे दुसऱ्या लोकांच्या आरोग्याशी खेळ करण्यासारखे तसेच त्यांचे आरोग्य धोक्यात आणणारे कृत्य ठरते.

हे सर्व लक्षात घेता हा दिवस धूम्रपानाच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता वाढवण्यासाठी आणि हे व्यसन सोडण्याची प्रेरणा देण्यासाठी किती महत्त्वपूर्ण आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. या दिवशी जागतिक स्तरावर विविध उपक्रम आयोजित केले जातात. लोकांना धूम्रपानाच्या हानीबद्दल अधिक माहिती देणे, त्याचे दुष्परिणाम समजावणे आणि धूम्रपान सोडण्यासाठी मदत करणारे कार्यक्रम राबवणे यांचा त्यात समावेश असतो. आता लोकांना तंबाखू सेवनाच्या सवयीपासून मुक्त करण्यासाठी सरकार, आरोग्य संघटना आणि समाजाच्या सर्व स्तरांवर व्यापक प्रयत्न होताना दिसत आहेत. त्याचा लाभ घेतला तर अनेकजण या व्यसनाच्या जोखडातून सुखरुप बाहेर पडू शकतील. धूम्रपानाच्या विरोधात जागरूकता निर्माण करण्यासाठी सरकारचे नेहमीच महत्त्वपूर्ण योगदान असते. अनेक देशांमध्ये धूम्रपानाच्या प्रतिबंधासाठी कडक कायदे केले गेले आहेत. उदाहरणार्थ, सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानावर बंदी, तंबाखू उत्पादकांवर जबरी कर लावणे आणि तंबाखू उत्पादनांच्या पॅकिंगवर आरोग्यसंबंधित सूचना देणे हे सर्व प्रभावी उपाय आहेत. भारततही सरकारने निगेटिव्ह इन्फॉर्मेशन किंवा हे व्यसन घातक असल्याचे संकेत देणाऱ्या चिन्हांचा वापर करण्याकामी पुढाकार घेतला आहे.

तसे पाहायचे तर अनेक लोक धूम्रपानाच्या सवयीपासून मुक्त होण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्यातील सगळेच यशस्वी होतात असे नाहीत. म्हणूनच व्यसनापासून दूर जाण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या उपायांचीही या निमित्ताने चर्चा व्हायला हवी. जसे की, समुपदेशन, व्यसनमुक्ती सत्रे, निकोटिन रिप्लेसमेंट थेरपी आणि इतर शारीरिक आणि मानसिक उपचारांची वारंवार चर्चा होत राहिली आणि उपयुक्तता समोर आणली गेली तर अनेकांना या विळख्यातून सुटण्याचा श्रेयस्कर मार्ग सापडू शकतो. खेरीज यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींचीही चर्चा होऊ शकते. उदाहरणार्थ, मानसिक आणि शारीरिक रूपाने आत्मविश्वास वाढवणे, तणाव आणि चिंता कमी करणे आणि मनापासून धूम्रपानाची सवय सोडण्यासाठी प्रयत्नशील राहणे याचे महत्त्व अधोरेखित केल्यास हा व्युह भेदणे शक्य होऊ शकेल. तंबाखूविरोधी जागरूकता वाढवण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक संघटना कार्यरत आहेत. त्याचबरोबर भारतातील स्मोक फ्री इंडिया कॅम्पेन, क्विटलाईन हेल्पलाइन तसेच आरोग्यसंबंधित संस्थांमार्फत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे यावर चर्चा होणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. सामाजिक माध्यमांद्वारे धूम्रपानाचे दुष्परिणाम सांगणारे संदेश आणि जाहिरात हेदेखील सध्याच्या काळातील प्रभावी उपाय ठरतात.

धूम्रपानाचा परिणाम व्यक्तीच्या आरोग्याबरोबरच पर्यावरणावरही होतो. सिगारेटच्या धुरामुळे हवा आणि जमिनीमध्ये प्रदूषण होते. धुराचे कण वातावरणात पसरतात आणि पर्यावरणाच्या गुणवत्तेवर घातक परिणाम करतात. त्यामुळे धूम्रपानावर नियंत्रण ठेवणे ही केवळ आपल्या आरोग्यासाठी नाही तर पृथ्वीच्या आरोग्यासाठीही महत्त्वाची बाब आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. शेवटी धूम्रपान हा मानसिक आणि भावनिक स्थितीशी संबंधित असू शकते, हे यायोगे लोकांनी समजून घ्यायला हवे. धूम्रपानाने मानसिक ताण आणि चिंता कमी होत नाहीत, तर वाढतात. व्यसनाने मिळणारे तात्पुरते समाधान तुमच्या दीर्घकालीन मानसिक स्वास्थ्यावर गंभीर परिणाम करु शकते. म्हणूनच धूम्रपान सोडण्यासाठी मनाची ताकद वाढवणे इतर शारीरिक तंत्रांचा वापर करत या व्यसनापासून शक्य तेवढ्या लवकर दूर होणे केव्हाही चांगले.

फिटनेस फंडा

## मन शांत ठेवा

दोस्तांनो, ध्यानधारणा ही आपल्याकडे चालत आलेली मोठी परंपरा आहे. त्यालाच मेडीटेशन म्हणतात. ध्यानधारणा म्हणजे मेडीटेशनमुळे बरेच लाभ होतात. ही मेंदू आणि मन शांत ठेवण्याची एक पध्दती आहे. मेडिटेशनमुळे मेंदू, शरीर आणि आत्मा या तिघांनाही लाभ मिळतात. मेडिटेशन सुरू करणार असाल किंवा घरीच मेडिटेशन करत असाल तर या टिप्स उपयोगी पडतील.



✻ मेडिटेशनसाठी शांत जागा शोधा. मेडिटेशन करताना कोणताही आवाज किंवा गोंगाट नसावा. तसंच एखाद्या खोलीत एकट्याने बसून करा. खोलीत भरपूर प्रकाश, खेळती हवा असावी.

✻ मेडिटेशनसाठी ठराविक वेळ निश्चित करा. रोजच्या धावपळीत सकाळी दहा मिनिटं स्वत:साठी राखून ठेवा.

✻ मेडिटेशनसाठी लागणाऱ्या सीडी, डिव्हिडी, जपमाळ आधीच काढून ठेवा. मेडिटेशन सुरू करण्याआधी या सगळ्या वस्तू जवळ ठेवा.

✻ मेडिटेशन हा फक्त मेंदूचा व्यायाम आहे, असं अनेकांना वाटतं. त्यामुळे त्यासाठी बसताना शारीरिक स्थितीकडे दुर्लक्ष होतं. मेडिटेशन करण्यासाठी कुठेही बसता येईल. पण आरामदायी स्थितीत बसा. मन एकाग्र होणं गरजेचं आहे.

खेचाखेची

## क्रम योग्य ठेव


**काका:** पोरी,मोठी झाल्यावर तू काय करणार आहेस?

**मुलगी:** काही नाही. आई बनेन, चांगले शिक्षण घेईन, नोकरी करेन, लग्न करेन. आणखी काय करणार?

**काका:** योजना चांगल्या आहेत तुझ्या बेटा. फक्त जे काही करशील ते योग्य क्रमाने कर, म्हणजे झालं!!!

वेगळं काही

फ्रान्समधीलल 'प्राग्मा इंडस्ट्रीज' नावाच्या कंपनीने हायड्रोजनवर चालणाऱ्या सायकलची निर्मिती केली आहे. 'अल्फा बाईक' असं तिचं नाव आहे. ही बाईक दोन लीटर हायड्रोजनमध्ये ६२ मैल म्हणजे जवळपास १०० किलोमीटर अंतर कापू शकते. एक किलो हायड्रोनजमध्ये एक किलो लिथियम बॅटरीच्या तुलनेत जवळपास ६०० पट जास्त ऊर्जा असते. सध्या या सायकलची किंमत बरीच जास्त आहे. पण लवकरच किंमत कमी होण्याची अपेक्षा आहे. सध्या लष्करी कामांसाठी या सायकलचा उपयोग करण्यात येणार आहे. या सायकलची किंमत कमी झाली तर तिचा वापर वाढू शकतो आणि प्रदुषणाला आळा घालणं सोपं होऊ शकतं.





राशीभविष्य

- **मेष** : अडकलेला पैसा वसुल होईल. सामाजिक कार्यात रस घ्याल. यांत्रिक क्षेत्रात प्रगती साधता येईल.
- **वृषभ** : साहस आणि पराक्रमात वाढ होईल. आप्तेष्टांच्या गाठी भेटी होतील. कौटुंबिक समस्या संभवतात.
- **मिथुन** : व्यवहारात स्पष्टपणा दाखवावा. आज प्रवास शक्यतो टाळायला हवा. मानसिक तणाव राहील.
- **कर्क** : महत्त्वाचे निर्णय सल्लामसलतीने घ्यावेत. स्थावर सौख्य लाभेल. कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल.
- **सिंह** : आरोग्य चांगलं राहील. कोर्टप्रकरणात मनासारखी फळं मिळतील. अपेक्षित घटना समाधान देतील.
- **कन्या** : कार्यक्षेत्रात अपेक्षित प्रगती साधता येईल. आर्थिक स्थिती सुधारेल. दुसऱ्यांवर विसंबू नका.
- **तूळ** : आपल्या कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. यश, मान, प्रतिष्ठा लाभेल. कौटुंबिक सौख्य लाभणार आहे.
- **वृश्चिक** : नोकरीत बढतीचे योग आहेत. कौटुंबिक जीवन आनंदी राहील. आर्थिक स्थितीत सुधारणा.
- **धनु** : कामकाजात सावधानी बाळगावी. कार्यसिद्धीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. अपेक्षित घटना.
- **मकर** : अपूर्ण राहिलेलं काम आज पूर्ण होणार आहे. वरिष्ठांची मर्जी लाभेल. आर्थिक प्राप्ती वाढणार आहे.
- **कुंभ** : राजकीय क्षेत्रात निर्णय फायदेशीर ठरतील. गृहसौख्य लाभेल. प्रवासात मौल्यवान वस्तू सांभाळा.
- **मीन** : श्रमाचं चीज होईल. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. मुलांच्या हितसंबंधाकडे लक्ष द्यायला हवं.

सल्ला मोलाचा

## गो विथ कूल ज्वेलरी

या वर्षात ज्वेलरीचे कोणते नवे ट्रेंड रॅम्पवर हिट आहेत ते पाहू...

✻ स्टेटमेंट ज्वेलरी– कोणत्याही बोअरिंग आउटफिटला क्लासी लूक द्यायचा असेल तर स्टेटमेंट ज्वेलरीला पर्याय नाही. वेस्टर्न किंवा एथनिक वेअरसोबत स्टेटमेंट ज्वेलरी खुलते. फंकी डिझाईन्स आणि आकर्षक कलर ही या ज्वेलरीची वैशिष्ट्यं आहेत. ✻ बाजूबंद– 'जुनं ते सोनं' या न्यायाने हा ट्रेंड परत आला आहे. पण या ॲक्सेसरीचा पूर्णत: मेक ओव्हर झाला आहे. सध्या मोराच्या आकारातील बाजूबंदांना मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. ✻ पेंडंट आणि लाँग चेन– सोबर लूक देणारं पेंडंट आणि एकपदरी किंवा तीनपदरी चेन सध्या ट्रेंडमध्ये आहे. ✻ पर्ल ज्वेलरी– मोती व्यक्तिमत्त्वाला मोहक लूक देण्यास मदत करतात. त्यामुळे खास प्रसंगांसाठी पर्ल ज्वेलरी ट्राय करायला हरकत नाही. ✻ ड्रॉप इअररिंग्ज– पार्टीमध्ये क्लासी लूक मिळवायचा असेल तर ड्रॉप इअररिंग्जना पर्याय नाही. पारंपरिक आणि मॉडर्न अशा दोन्ही प्रकारांमध्ये उपलब्ध असलेली ही ज्वेलरी वापरून बिनधास्त लूक मिळवता येईल.

दिनविशेष

## १० मार्च

- २०१३ : मुष्टियोद्धा विजेंदरसिंगच्या चौकशीचे संकेत.
- २०१४ : कोळसा गैरव्यवहार प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने दिल्लीतील न्यायालयात पहिले आरोपपत्र दाखल केले.
- २०१६ : दिशादर्शक उपग्रहांच्या मालिकेतील 'आयआरएनएसएस १ एफ' या सहाव्या उपग्रहाचे ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपकामार्फत यशस्वी प्रक्षेपण.
- २०१८ : आपलं नौदल तळ एकमेकांच्या युद्धनौकांसाठी खुलं करण्याचा भारत आणि फ्रान्सचा निर्णय.

महत्त्वपूर्ण काही...

## परीक्षा देताना...

मेडिकल, इंजिनिअरींग, एमबीए तसंच इतर अभ्यासक्रमांसाठीही प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात. या परीक्षांबाबतचं हे मार्गदर्शन.

✻ उच्च शिक्षण घेण्यासाठी बोर्डाच्या परीक्षेच्या गुणांना महत्त्व दिलं जातं. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या परीक्षेकडे विशेष लक्ष द्यायला हवं. ✻ कठिण विषयांचा अभ्यास सकाळच्या वेळात करा. सकाळी वाचलेलं अधिक काळ लक्षात राहतं. सातत्याने अभ्यास करत राहिल्याने मेंदूवर ताण येतो. त्यामुळे अभ्यासादरम्यान थोडी विश्रांती घ्यायला हवी. मधल्या काळात तुम्ही पुस्तकं वाचू शकता. आवडीची गाणी ऐकू शकता. यामुळे तुम्ही ताजेतवाने होता. ✻ अभ्यासाचं वेळापत्रक तयार करा. त्याचं काटेकोर पालन करा. परीक्षा कोणतीही असली तरी वेळापत्रक महत्त्वाचं आहे. कोणत्या विषयाला किती वेळ द्यायचा हे ठरवा. ✻ परीक्षेचा अजिबात ताण घेऊ नका. पेपरच्या आधी शांत झोप घ्या. यामुळे पेपर लिहिताना तुम्हाला झोप येणार नाही. सगळी उजळणी आधीच करून ठेवा. शेवटच्या क्षणी धावाधाव करू नका.

पंचांग

**सोमवार, १० मार्च २०२५**
क्रोधीनामसंवत्सर, शके १९४६,
फाल्गुन शु. ११, नक्षत्र : पुष्य,
चंद्रराशी : कर्क, योग : शोभन,
सूर्योदय : ६.५३, सूर्यास्त : ६.४५

फॉरवर्डस

कधी कधी पराभवही कमालीचं सुख देऊन जातो...
**अपनी हार पर इतना सुकून था मुझे,**
**जब उसने गले लगाया जीतने के बाद।**

आरोग्यमंत्र

## जाणून घ्या

खाण्याचं मीठ आणि पिण्याच्या पाण्याची शुद्धता या दोन महत्त्वाच्या गोष्टी क्लोरीनमुळेच शक्य झाल्या आहेत. क्लोरीन हा वायू स्वरूपात मिळवला आणि साठवला जातो. मात्र नैसर्गिकरित्या क्लोरीन आढळत नाही. सोडियमबरोबर त्याचं संयुग पटकन बनतं. त्यालाच आपण मीठ म्हणतो. १७७४ मध्ये शील यांनी त्याचा शोध लावला. फिकट हिरव्या रंगावरून ग्रीक भाषेतील क्लोरॉस या शब्दावरून त्याचं नाव पडलं आहे. क्लोरीन हा वायू मुख्यत: पाणी शुद्ध करण्याच्या ब्लिचिंग पावडरमध्ये वापरला जातो. त्याच्यामुळे पाण्यातील जंतू मरतात आणि मुक्त झालेला क्लोरिन हवेत मिसळतो. अगदी सहज पूर्ण झालेल्या या प्रक्रियेमुळेच आपण मोठ्या प्रमाणावर पाण्याचं शुद्धीकरण करून गावं, शहरं, महानगरं यांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करू शकतो. क्लोरिनचे अनेक औद्योगिक उपयोगही आहेत. क्लोरीनचा गैरवापर करून पहिल्या महायुद्धात शत्रूच्या सैनिकांवर त्या वायूचा मारा केला गेला होता. कोणत्याही जिवंत प्राण्यांसाठी क्लोरीन हा अतिशय घातक वायू आहे. मात्र संयुग स्वरूपातील त्याची उपयुक्तता वादातीत ठरावी. माणसाच्या खाण्यातील एक अत्यावश्यक घटक म्हणजे मीठ. शरीरातील सोडीयमचा साठा शरीरातील अनेक क्रियांना मदत करतो. असा हा घटक म्हणजे सोडियम आणि क्लोरीनचं संयुग होय.



वाचा तर खरं

✻ तुम्ही शेरवानीसोबत बंडी कॅरी करू शकता. सोबत चुडीदार आणि मोजडी घालता येईल. ✻ लग्न असो वा सण, तुम्ही इंडो–वेस्टर्न लूक कधीही कॅरी करू शकता. ही स्टाईल कधीही बदलणार नाही. फॅशनमध्ये तुम्ही मस्त फ्युजन करू शकता. ✻ समस्त मित्रांसाठी प्लेन, लायनिंगवाल्या किंवा चेक्सच्या शर्टपेक्षाही बरंच काही वेगळं उपलब्ध आहे. फ्लोरल, ॲब्स्ट्रॅक्ट प्रिंटचा जमाना आहे. पेस्टर रंगाचे फेटे, फ्लोरल शेरवानी, बुद्धा प्रिंटवाली नेहरू जॅकेट्स फॉर्ममध्ये आहेत. पॉप पॅचवर्कवाले शर्ट आणि पेस्टल धोती पॅंट्सही आहेत.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### धनंजय मुंडे यांचा धस यांना इशारा

**मुंबई :** धनंजय मुंडे हे वाल्मिक कराडच्या एवढे आहारी गेले होते की, त्यामुळे त्याचे कुटुंब देखील त्यांच्यावर नाराज असेल, त्यांची आई तर गेल्या दीड वर्षांपासून मुळ गावी नाथ्रा येथे गेल्या आहेत, त्या अजून आल्या नाहीत, असा मोठा गौप्यस्फोट सुरेश धस यांनी केला होता. त्यांच्या या दाव्यानंतर आता राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान, सुरेश धस यांच्या या विधानानंतर आता धनंजय मुंडे चांगलेच आक्रमक झाले आहेत. त्यांनी ट्विट करत सुरेश धस यांना इशारा दिला आहे.

परळी वैजनाथ शहरातील पंढरी या माझ्या निवासस्थानाचे नूतनीकरणाचे काम हाती घ्यायचे असल्याने मी, माझी आई व कुटुंबीय मागील काही महिन्यांपासून आमच्या नाथरा या जन्म गावात असलेल्या शेतातील घरात स्थलांतरित झालो आहोत, तिथेच राहत आहोत, ही गोष्ट सर्वांनाच माहित आहे. ज्यांनी आरोप केले त्यांनीच या आधी एका मुलाखतीत मी शेतातील घरात राहतो, असे सांगितले होते काल मात्र त्यांनी फक्त माझी आई राहते, असे सांगितले आणि खोटे नाटे आरोप केले, असं धनंजय मुंडे म्हणाले.

ते म्हणाले, माझे चुलत भाऊ हे प्रत्येक निर्णयात माझ्या सोबतीने भक्कमपणे उभे असतात, हेही सर्वांना माहिती आहे. मात्र त्याबाबतीतही चुकीचे आरोप केल्या गेले. मागील काही महिन्यांपासून माझ्यावर सातत्याने आरोप केले जात आहेत. मात्र आता कदाचित आणखी काही खोटे आरोप करायला शिल्लक नसावेत म्हणून काहीजण माझ्या कुटुंबावर सुद्धा खोटारडे आरोप करून घृणास्पद राजकारण साधत आहेत.

# मेट्रो अधिकाऱ्यांवरच पेट्रोल टाकले

## शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांचे : धक्कादायक कृत्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील महापालिका मेट्रो स्थानकावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या कार्यकर्त्यांनी आंदोलन करत मेट्रो सेवा ठप्प केली. मात्र आंदोलनाचा तणाव इतका वाढला की आंदोलकांनी थेट पोलिस अधिका-यांवर पेट्रोल टाकण्याचा धक्कादायक प्रकार केला.

या हिंसक आंदोलनात पोलिस उपायुक्त संदीपसिंह गिल्ल आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांच्या अंगावर आंदोलनकर्ते नरेंद्र पावटेकर आणि त्यांच्या सहका-यांनी पेट्रोल फेकले. सुदैवाने मोठा अनर्थ टळला, मात्र परिस्थिती हाताबाहेर जात असल्याने पोलिसांनी आंदोलकांना चांगलाच चोप देत ताब्यात घेतले. राष्ट्रवादी काँग्रेसचे कसबा मतदारसंघातील कार्यकर्ते नरेंद्र पावटेकर दुपारी दोनच्या सुमारास कार्यकर्त्यांसह महापालिका मेट्रो स्थानकावर आले.

त्यांच्या हातात पेट्रोलच्या बाटल्या होत्या आणि काही महिला कार्यकर्त्याही त्यांच्यासोबत होत्या. आंदोलनकर्त्यांनी थेट मेट्रोच्या मार्गिकेवर धाव घेत मेट्रो सेवा ठप्प केली. मेट्रोच्या अधिका-यांनी तातडीने पोलिसांना बोलावले. पोलिस उपायुक्त संदीपसिंह गिल्ल आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रशेखर सावंत घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलकांना समजावण्याचा प्रयत्न केला. तब्बल तासभर आंदोलकांची समजूत काढण्यासाठी पोलिसांनी हात जोडून विनंती केली, मात्र आंदोलक मागे हटण्यास तयार नव्हते.




### पावटेकरांची नेत्यांनाही शिवीगाळ

● संवादादरम्यान पावटेकर आणि त्यांचे एक साथीदार रेल्वे मार्गिकेवरील कठड्यावर चढले. त्यांची कुठल्याही क्षणी तोल जाऊन अपघात होण्याची शक्यता होती. उपायुक्त गिल्ल यांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला असता आंदोलकांनी त्यांना थेट शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. परिस्थिती अधिकच गंभीर होत असल्याने गिल्ल यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांना फोन करून परिस्थिती समजावून सांगितली. मात्र पावटेकर यांनी पक्षनेत्यांनाही शिवीगाळ करत ते आम्हाला पुढे येऊ देत नाहीत असा आरोप केला आणि बोलण्यास नकार दिला.

### पोलिसांनी घेतला आक्रमक पवित्रा

● आंदोलकांशी चर्चा अयशस्वी झाल्याने पोलिसांनी त्यांना हटवण्यासाठी पुढे पाऊल टाकले. त्याच वेळी नरेंद्र पावटेकरने पोलिस उपायुक्त संदीपसिंह गिल्ल आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांच्या अंगावर पेट्रोल फेकले. या घटनेमुळे पोलिस पथकात गोंधळ उडाला. सुदैवाने उन्हाच्या तीव्रतेमुळे किंवा मेट्रोच्या ओव्हरहेड वायरमुळे पेट्रोल पेट घेतले नाही, अन्यथा मोठा अनर्थ घडला असता. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला. गिल्ल यांनी स्वत: पावटेकरला पकडून खाली खेचले आणि पोलिसांच्या ताफ्यात ओढत नेले.

# पोलिसांना हाताशी धरून गुन्हे : पाटील



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात आता पोलिसांना हाताशी धरून रोज गुन्हे करण्याची नवीन पद्धत सुरू झाली आहे, पोलिसांना गुन्हा होण्याच्या आधीच माहिती असते, हे मी अनेक ठिकाणी ऐकले आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्थेची अतिशय वाईट परिस्थिती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोघांमध्ये कदाचित शीतयुद्ध सुरु असल्याचे दिसते, असे जयंत पाटील यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.

**राजकारण**

माजी मंत्री धनंजय मुंडेंच्या अडचणीत दिवसेंदिवस वाढच होताना दिसत आहेत. त्यांनी मंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या पाठीमागील शुक्लकाष्ट संपेल असे वाटत होते. मात्र सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया, आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडे कृषीमंत्री असताना त्या काळात पीकविमा घोटाळा, आणि डीपीडीसीमधील निधीत घोटाळा झाल्याचे म्हटले होते.

करुणा शर्मा यांनी कौटुंबिक न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणामुळे धनंजय मुंडे अडचणीत सापडले आहेत. तर राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची अतिशय वाईट परिस्थिती आहे, असा हल्लाबोल करीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मोठे विधान केले आहे.

यावेळी जयंत पाटील यांनी पुन्हा एकदा राज्य सरकारच्या कारभारावर जोरदार निशाण साधला आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला आहे. येत्या काळात महाविकास आघाडीच्या बैठक होत आहे. या बैठकीत अधिवेशनात येत्या काळात कुठल्या रणनीतीचा वापर करायचे हे ठरेल, असेही यावेळी जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.

### मुंडेंच्या राजीनाम्यावर मुख्यमंत्र्यांची छुप्पी

● राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत सभागृहात माहिती देणे अपेक्षित होते. मात्र, राजीनामा देऊन पाच दिवस झाले त्यांनी अजूनही त्यावर बोलले नाहीत. त्यामुळे हा राजीनामा झाला असे आम्ही मानत नाही. येत्या काळात जर या प्रकरणात पोलिसांना धागेदोरे सापडले तर ते धनंजय मुंडे यांच्यावर देखील गुन्हा दाखल करू शकतात. मला माहित नाही की पोलिसांजवळ काय माहिती आहे असे जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.

# बब्बर खालसाच्या दहशतवाद्याला अटक

**नवी दिल्ली :** नांदेड हत्या प्रकरणात सहभागी असलेल्या बब्बर खालसा इंटरनॅशनल या बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनेच्या दहशतवाद्यांना पंजाब पोलिसांनी अटक केली आहे. सचिनदीप सिंग ऊर्फ सचिन असे आरोपीचे नाव असून तो अमृतसरमधील अजनाला येथील दयालपुरा गावचा रहिवासी आहे. शुक्रवारी नवी दिल्ली विमानतळावर त्याला अटक करण्यात आली. पंजाबचे डीजीपी गौरव यादव यांनी सांगितले की, इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून स्टेट स्पेशल ऑपरेशन सेल एसएएस नगरच्या पथकाने अटक केली. आरोपी सचिन पळून जाण्याच्या प्रयत्नात थायलंडला पळून गेला होता. पंजाब पोलिसांच्या सामरिक प्रयत्नांमुळे भारतात परतल्यावर दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळावर त्याला अटक करण्यात आली. नांदेड हत्या प्रकरणात पंजाब पोलिसांनी बीकेआय मॉड्यूलचे दोन सदस्य जगदीश सिंग उर्फ जग्गा आणि त्याचा साथीदार शुभदीप सिंग उर्फ शुभ यांना अटक केली होती

# खेड खरेदी विक्री संघ : निकाल जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**खेड :** खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या ९ संचालकांच्या निवडीसाठी रविवारी (दि. ९) उत्साहात मतदान झाले. मतदान केंद्राबाहेर कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होती. राजगुरुनगर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये एकाच केंद्रात सर्व प्रभागातील मतदान प्रक्रिया पार पडली. अ वर्ग गटातील वाडा, खेड, आळंदी या गटातील ३ तसेच महिला गटातील २, इतर मागास प्रवर्गातील एक जागा, अनुसूचित जाती जमाती गटाची १, बिगरशेती सोसायटी प्रतिनिधी गटातील एक आणि प्रोसेसिंग कंज्युमर्स संस्था प्रतिनिधी गटाची एक जागा अशा ९ संचालकांची निवड बिनविरोध झाली आहे.

उर्वरित ९ जागासाठी रविवारी मतदान झाले. निवडणूक होत असलेल्या सोसायटी संस्था गटातुन दुरंगी लढती झाल्या. या गटात अवघे १०-१५ मतदार होते. त्यामुळे या मतदारांना सुगीचे दिवस आल्याचे पहायला मिळाले. माघार झाल्या बरोबर उमेदवारांनी मतदारांना राजकीय सहलीवर पाठवले होते. बहुतांशी मतदान आर्थिक देवाणघेवाण, सहलीला जाऊन झाले. तर काही गटात नात्यागोत्याचा परीणाम जाणवला.

दरम्यान, संध्याकाळी मतमोजणी झाली. त्यात सोसायटीच्या वाफगाव गटातून संतोष गोरडे, चाकण मधून संभाजी दौंडकर, कडूसमधून दत्ता शितोळे , चासमधून अनिल टोके,महाळुंगेमधून दत्तात्रय टेमगिरे निवडून आले.भटक्या विमुक्त गटामधून सुधाकर मिडगे निवडून आले तर व्यक्ती गटातुन आनंदा काळे, विनायक घुमटकर, नरेंद्र थिगळे निवडुन आले.

### नाहीतर तुझा बाबा सिद्दिकी करू- महेश गायकवाड यांना धमकी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कल्याण :**'गणपत गायकवाड आणि वैभव गायकवाड यांचं नाव घेऊ नको नाही तर तुझा बाबा सिद्दिकी करू' अशी धमकी शिवसेनेचे माजी जिल्हाध्यक्ष महेश गायकवाड यांना देण्यात आली आहे. ही धमकी भाजपचे माजी आमदार गणपत गायकवाड यांनी जेलमधून पाठवली आहे, असा आरोप महेश गायकवाड यांनी केला आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा गायकवाड विरुद्ध गायकवाड असा वाद पेटण्याची चिन्ह आहे.

पोलीस स्टेशनमध्ये गोळीबार प्रकरणी गणपत गायकवाड हे सध्या जेलमध्ये आहे. आता पुन्हा एकदा गणपत गायकवाड यांचं नाव समोर आलं आहे. महेश गायकवाड यांनी पत्रकार परिषद घेऊन आपल्याला धमकी देण्यात आली, याचे फोटोच दाखवले आहे. एका पत्रकावर हा मजकूर लिहिलेला आहे. यामध्ये 'गणपत गायकवाड आणि वैभव गायकवाड यांचं नाव घेऊ नको नाही तर तुझा बाबा सिद्दिकी करू' अशी धमकी दिली आहे

# संघवाले गच्चीतून देशप्रेम शिकवतात : उद्धव ठाकरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ज्यांचा स्वातंत्र्य लढ्यामध्ये काडीचाही संबंध नाही अशा लोकांच्या हाती आज देशाची सूत्रे आहेत. पाकिस्तानविरोधात युद्ध सुरू झाले तर हे गच्चीतून देशप्रेम शिकवतात असा टोला उद्धव ठाकरे यांनी आरएसएस आणि भाजपला लगावला. दैवतांवरून भांडण लावणारे आता भाषेच्या मुद्यावरून वाद निर्माण करत आहेत असाही आरोप त्यांनी केला. मुलुंड येथील कालिदास नाट्यगृहात पार पडलेल्या ईशान्य मुंबई पदाधिकारी निर्धार शिबीरात उद्धव ठाकरे बोलत होते.

उद्धव ठाकरे म्हणाले की आरएसएसवाले हे गच्चीत काठ्या घेऊन बसतात, त्या काठ्याकपडे वाळत घालायला ठिक आहे. पाकिस्तानविरोधात युद्ध सुरू असताना घराच्या गच्चीतून हे देशप्रेम शिकवणारे लोक आहेत. जसा यांचा देशाच्या स्वातंत्र्य लढ्याशी संबंध नाही तसाच संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याशी काही संबंध नाही. ज्यांचा स्वातंत्र्याशी संबंध नाही त्यांच्या हातात देशाची सूत्रे आहेत.

आम्ही मोहन भागवतांचे फॉलोअर आहे. तेच कुंभमेळ्यात गेले नाहीत तर आम्ही कसे जाणार? असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. छावा चित्रपट आला. त्यामध्ये भाजप वाल्यांचा कर्तृत्व काय? त्यामध्ये तुमचा काय संबंध? आणाजी पंताने भगव्याला डाग लावलेला पाहायला जायचे असेल तर जा असाही टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला.



### तुम्ही उद्धव ठाकरे होऊच शकत नाही

● देवेंद्र फडणवीसांवर टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, कामाला स्थगिती द्यायला काय उद्धव ठाकरे आहे का? असे विचारणारे फडणवीस हे उद्धव ठाकरे कधीच होऊ शकणार नाहीत. आपल्या राज्याचे नुकसान होऊन त्यांच्या मालकाच्या मित्राचे खिसे भरणारे हे उद्धव ठाकरे कधीच होऊ शकणार नाहीत.


पान १ वरून

# भारतच 'चॅम्पियन'




विकेट गमावली. यावेळी भारताला विजयासाठी ६० चेंडूत ६१ धावांची गरज होती. मायकेल ब्रेसवेलच्या ४२व्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात अक्षर पटेल झेलबाद झाला. भारताचा निम्मा संघ यावेळी तंबूत परतला होता. मायकेल ब्रेसवेलच्या ४२व्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात अक्षर पटेल झेलबाद झाला. यासह भारताचा निम्मा संघ तंबूत परतला आहे. आता भारताला ५१ चेंडूत ४९ धावांची गरज होती. ४७ षटकांत ५ गडी गमावून २४० धावा झाल्या. विजयासाठी १८ चेंडूत १२ धावांची गरज होती. त्यावेळी राहुलने २९ आणि हार्दिकने १८ धावा केल्या. मात्र, त्यानंतर हार्दिकची विकेट घेण्यात न्यूझीलंडला यश मिळाले. हार्दिक पांड्या १८ चेंडूत १८ धावांची संघासाठी अतिशय उपयुक्त खेळी करून तो पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याने आपल्या डावात एक चौकार आणि एक षटकार मारला. हार्दिकने विजयाचे समीकरण सोपे केले.

### मुंबईत पुन्हा दहशतवादी हल्ला?



महाराष्ट्र एटीएसच्या ताब्यात आहेत. मिळालेल्या माहितीनुसार या दोन्ही आरोपींवर एनआयएनं पाच लाख रुपयांचे बक्षीसही जाहीर केलं होतं. हे दोघंही आरोपी अल सुफा या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याचंही तपासात निष्पन्न झालं आहे.

# सरकार लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार?



**मुंबई :** लाडक्या बहिणींना वाढीव रक्कम देण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन आहे. त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. लाडकी बहीण योजना बंद करणार, असे विरोधक म्हणत असले तरीही ही योजना कधीही बंद होणार नाही, असा पुनरुच्चार त्यांनी केला.

दरम्यान, जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शिवसेना महिला आघाडीने आयोजित केलेल्या शिवदुर्गा सन्मान सोहळ्यात त्यांनी बोलताना ही माहिती दिली. त्यामुळे लाडक्या बहिणींना उशिरा का असेना पण २१०० रुपये मिळणार, हे मात्र निश्चित झाले आहे. कारण अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये महिला व बालविकास मंत्री यांनी २१०० रुपये देणार असे म्हटलेच नाही, असे विधान केले. ज्याने लाडक्या बहिणींच्या गोटात खळबळ उडाली आहे.

महिला दिनाच्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, सरकार लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी देणार असे विचारणा-यांनी निवडणुकीत ३००० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. पण मतदारांनी त्यांना घरी बसवले, अशी टीका शिंदे यांनी विरोधकांवर केली. खुर्चीच्या मोहापायी कोणतीही तडजोड करणार नाही. लाडकी बहीण योजनेत जी काही वाढ करायची आहे त्याचे नियोजन आमच्या डोक्यात आहे, योग्य वेळी योग्य होईल, असे शिंदे यांनी लाडक्या बहिणींना आश्वस्त केले.

### आजपासून केंद्रिय अर्थसंकल्पाचा दुसरा टप्पा

आदींवर सरकारचा भर असेल. वक्फ सुधारणा विधेयक मार्गी लावण्यालाही सरकारचे प्राधान्य असेल. त्याउलट, इंडिया आघाडीने त्या विधेयकाला जोरदार विरोध करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित विधेयकावरून संसद ढवळून निघण्याची शक्यता आहे. मणिपूरमध्ये याआधीच राष्ट्रपती राजवट लागू झाली आहे. त्याविषयीच्या घोषणेला संसदेची मंजुरी मिळवण्याच्या उद्देशातून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा वैधानिक ठराव मांडणार असल्याचे समजते. त्याशिवाय, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडून मणिपूरसाठीचा अर्थसंकल्प सादर केला जाईल. अधिवेशन ४ एप्रिलला समाप्त होईल.

### मुंबईत गॅस पाईपलाईन लिकेजने आगीचा भडका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईतील अंधेरी परिसरात शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास गॅस पाईपलाईन लिकेज झाल्याने आगीचा भडका उडाला.

या आगीच्या भडक्यात तीन वाहने जळून खाक झाली. तर, तीन जण जखमी झाले. जखमी उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. ज्या खोदकामामुळे आग लागली, ते खोदकाम अनधिकृत असल्याचे महानगर गॅसने म्हटले आहे.

# भाजपला मिळणाऱ्या मतांमध्ये वाढ

## भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांचे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची राजकीय संस्कृती बदलली. प्रत्येक वेळी अधिक मतं देऊन जनता मोदींना आशीर्वाद देत आहे. भाजपला मिळणाऱ्या मतांमध्ये वाढ होतेय, असे भाष्य भाजपचे अध्यक्ष जे.पी.नड्डा यांनी रविवारी केले. त्रिपुरा राज्यात सत्तेवर असणाऱ्या भाजपच्या सरकारने दुसऱ्या कार्यकाळातील दुसरे वर्ष पूर्ण केले. त्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सभेत नड्डा बोलत होते.

त्यावेळी त्यांनी मोदींच्या नेतृत्वाची प्रशंसा केली. तसेच, भाजपच्या कामगिरीतील चढत्या आलेखाकडेही लक्ष वेधले. देशातील मागील ३ लोकसभा निवडणुकांचा विचार करता भाजपच्या मतांचे प्रमाण वाढलेले दिसते. पक्षाला २०१४ यावर्षी देशभरात १७ कोटी मतं मिळाली. त्यावेळी झालेल्या मतदानाचा विचार करता ते प्रमाण ३१.३० टक्के इतके होते.

पुढील निवडणुकीत (वर्ष २०१९) भाजपला २२ कोटी म्हणजे ३६.७ टक्के मतं प्राप्त झाली. मागील वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत पक्षाच्या मतांमध्ये आणखीच भर पडली. आमच्या पक्षाला सुमारे २४ कोटी म्हणजे ३७ टक्के मतदारांनी कौल दिला, असे त्यांनी नमूद केले. सरकारविरोधी भावनेचे रूपांतर सरकारला अनुकूल भावनेत करून मोदींनी देशाची राजकीय संस्कृती बदलण्याची किमया केली, अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

## जंतर-मंतरवर १३ मार्चपासून आंदोलन

# वक्फ दुरुस्ती विधेयकाला विरोध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा १० मार्चपासून सुरू होणार आहे. अशा परिस्थितीत, वक्फ विधेयकाबाबत पुन्हा एकदा राजकारण तापले आहे. त्यातच अनेक मुस्लिम समुदाय त्याला विरोध करत आहेत. दरम्यान, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड आक्रमक भूमिकेत असल्याचे समोर आले आहे. त्यातच 'जमियत उलेमा-ए-हिंद'चे अध्यक्ष अर्शद मदनी यांनी १३ मार्चपासून दिल्लीतील जंतर-मंतरवर मोठे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.




माध्यमांशी बोलताना अर्शद मदनी यांनी यांविषयी माहिती दिली. त्यांनी याविषयी बोलताना, वक्फ हा आमचा धार्मिक विषय आहे. राजकीय पक्ष वक्फ विधेयकात किरकोळ सुधारणा करून ते मांडण्याची तयारी करत आहेत. आम्ही याला विरोध करत आहोत. मला वाटतं इस्लामविरोधी पक्षांना हे विधेयक आणायचं आहे. बेजबाबदार पक्षांना वाटते की मुस्लिमांना या देशात राहू देऊ नये, आम्ही याला विरोध करतो.

अर्शद मदनी म्हणाले, १९९१ च्या पूजा कायद्यानुसार, १९४७ नंतर गोष्टी जशा आहेत तशाच राहिल्या पाहिजेत. मुस्लिमविरोधी पक्षांनी हे पाळले नाही. वाराणसीतील मशीद किंवा इतर ठिकाणच्या मशिदी या कायद्याच्या कक्षेत ठेवाव्यात पण असे दिसते की देशाच्या कायद्याला काही महत्त्व नाही. १० मार्चपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या अधिवेशनात वक्फ विधेयक मंजूर होण्याची शक्यता असल्याने, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल बोर्डाने १३ मार्चपासून दिल्लीतील जंतरमंतर येथे निषेध करण्याची घोषणा केली आहे. यामध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम आणि इतरांना सामील होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयक सादर करण्यात आले आहे. हे विधेयक सभागृहात सादर होताच विरोधी पक्षांनी प्रचंड गोंधळ घातला.

#रा

# शक्तिपीठ विरोधात विधानभवनावर धडक

## १२ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा, १० हजार शेतकऱ्यांचा सहभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शेतक-यांना देशोधडीला लावणारा शक्तीपीठ महामार्ग कदापि होऊ देणार नाही असा एल्गार पुकारत येत्या बुधवारी अधिवेशन काळात मुंबईतील विधानभवनावर १२ जिल्ह्यातील शेतक-यांचा भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीचे समनव्यक गिरीश फोंडे यांनी रविवारी दिली.

दरम्यान, आझाद मैदानात सकाळी ९ वाजता या मोर्चाला सुरुवात होईल. राज्यभरातून या मोर्चाला दहा हजारांहून अधिक शेतकरी येणार असून कोल्हापूर जिल्ह्यातील चार हजार शेतकरी या मोर्चात सहभागी होणार आहेत. काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघणार आहे. १२ जिल्ह्यातील शेतक-यांनी शक्तीपीठ महामार्गाला एक इंचही जमीन देणार नसल्याची शपथ घेत कोल्हापुरातून एल्गार पुकारला होता.

कोल्हापूर, सांगली, सोलापूर, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, धाराशिव, सिंधुदुर्ग, बीड, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांतील शेतक-यांनी सुरुवातीपासूनच या महामार्गाला विरोध दर्शिवला होता. या महामार्गाविरोधात कोल्हापुरातून वात लागल्याने सत्ताधारी हादरले आहेत. शक्तीपीठ महामार्गाला आमदारांचे समर्थन आहे म्हणणा-या मुख्यमंत्र्यांनी कोणत्या आमदारांचे समर्थन आहे हे एकदा जाहीर करावे, असे आव्हान शक्तीपीठ विरोधी संघर्ष समितीने दिले आहे. मुख्यमंत्र्यांनी शक्तीपीठाबाबत शेतक-यांशी चर्चा करुन निर्णय घेणार असल्याचे सांगितले होते, मात्र, गेल्या वर्षभरापासून त्यांनी एकाही शेतक-याशी चर्चा केली नसल्याचा दावा समितीने केला आहे.

कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील शेतक-यांच्या विरोधामुळे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर स्थगित करण्यात आलेल्या शक्तिपीठ महामार्गाच्या कामाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा कंदील दाखवल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर झालेल्या पहिल्याच पत्रकार परिषदेत देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात सूतोवाच केले होते. परंतु, आता या शक्तिपीठ महामार्गावरून १२ जिल्ह्यातील शेतक-यांनी १२ मार्चला एल्गार करण्याचा निर्णय घेतला आहे.

शक्तीपीठ महामार्गाने कोल्हापूरची करवीर निवासिनी अंबाबाई, महाराष्ट्राची कुळस्वामिनी तुळजापूरची तुळजाभवानी, नांदेडमधील माहूरची रेणुकादेवी ही तीन शक्तीपीठे जोडली जाणार आहेत. यासोबतच परळी वैजनाथ आणि औंढा नागनाथ या दोन ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्रांनाही हा शक्तीपीठ महामार्ग जोडला जाणार असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, या भागातील शेतक-यांना महामार्ग नको तर पाणी हवे आहे. सरकार मात्र, उद्योगपतींचे खिसे भरण्यासाठी या महामार्गाचा घाट घालत असल्याचा आरोप होत आहे.




### ८६ हजार कोटी खर्च

● नागपूर – वर्धा असा ८० किमीचा समृद्धी महामार्गाचा भाग आहे. त्यामुळे शक्तीपीठ वर्धा येथून सुरू होणार असून हा मार्ग वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातुर, धाराशीव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यातून जाणार आहे. या प्रकल्पाचा खर्च ८६ हजार कोटी इतका येण्याची शक्यता आहे.



## पंजाबमध्ये अंमली पदार्थांचे आव्हान

**नवी दिल्ली :** पंजाबमधील तरुणांना व्यसनाच्या जाळ्यात ओढण्यासाठी तस्करांनी हेरॉईनच्या पाकिटांसोबत मोफत 'आईस' (क्रिस्टल मेथ) वाटप करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे ते रोखण्याचे मोठे आव्हान सुरक्षा यंत्रणांपुढे उभे राहिले आहे. 'आईस' (आयईसी) किंवा क्रिस्टल मेथ, सामान्यतः एक कृत्रिम औषध असते. परंतु, आता पुरवठा होणारे 'आईस' वनस्पतीआधारित असून, अफगाणिस्तानातून येते. हे एफेड्रा नावाच्या वनस्पतीपासून तयार केले जाते, जी त्या भागात मोठ्या प्रमाणावर आढळते. हे अफगाण बनावटीचे 'आईस' अधिक स्वस्त आणि सहज उपलब्ध होते. तालिबानने २०२१ पासून अफगाणिस्तानमध्ये अफूच्या शेतीवर बंदी आणल्यामुळे हेरॉईनचा पुरवठा मोठ्या प्रमाणात घटला आहे. हेरॉईन हे रासायनिक प्रक्रियेद्वारे अफूपासून तयार केले जाते. अफूच्या उत्पादनात तब्बल ७० टक्के घट झाली असून, तस्कर सध्याच्या साठ्यावर अवलंबून आहेत.

## उपराष्ट्रपती जगदीप धनखड रुग्णालयात दाखल



**नवी दिल्ली :** उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांना रविवारी सकाळी एम्स दिल्लीच्या हृदयविकार विभागात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे आणि त्यांना आता डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले आहे. उपराष्ट्रपतींना रात्री उशिरा अस्वस्थ वाटू लागले आणि छातीत दुखू लागले, त्यानंतर रविवारी सकाळी त्यांना तातडीने एम्समध्ये दाखल करण्यात आले. अशा आशयाचे ट्वीट वृत्तसंस्था 'एएनआय'ने त्यांच्या सोशल मिडियावर केले आहे. धनखड यांना पहाटे २ च्या सुमारास रुग्णालयात नेण्यात आले आणि सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. त्यांना क्रिटिकल केअर युनिट (सीसीयू) मध्ये निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. एम्सच्या कार्डिओलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. राजीव नारंग यांच्या देखरेखीखाली उपराष्ट्रपती धनखड यांच्यावर उपचार सुरू आहेत. डॉक्टरांचे एक पथक त्यांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी एम्समध्ये जाऊन धनखड यांच्या प्रकृतीची माहिती घेतली.

# औरंगजेबची कबर हटविणार?

## कबरीबाबत कायद्यानुसार निर्णय : मुख्यमंत्री फडणवीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** समाजवादी पक्षाचे आमदार अबु आझमी यांनी औरंगजेबाचे कौतुक केल्यानंतर मुघल सम्राटाच्या कबरीबाबत राज्यात चर्चा सुरू झाली आहे. केवळ भाजपाच नाही तर राज्यातील तसेच देशातील जनतेनेही मुघल शासकाची कबर पाडावी अशीच भावना व्यक्त केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. ‘श्री गुरु तेग बहादूर जी महाराज’ यांच्या ३५० व्या शहीद वर्षाच्या निमित्ताने आयोजित ‘गुरमत समागम’ कार्यक्रमाला आल्यानंतर माध्यमांशी बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी औरंगजेबाच्या कबरीबाबत राज्य सरकारची भूमिका स्पष्ट केली. औरंगजेबाच्या कबरीबाबत कायद्यानुसार काही काम करावे लागेल. कारण ही कबर काँग्रेसच्या राजवटीत जतन करण्यात आली होती. तेव्हापासून कबर ही भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाच्या संरक्षणाखाली आहे. कबरीचे संरक्षण कायदेशीर प्रक्रियेनुसार करण्यात आलं होतं. ते हटवणे किंवा बदलण्यासाठी कायद्याचे पालन करून करणे आवश्यक आहे. या मुद्यावर घाईघाईने कोणताही निर्णय घेता येणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

नुकतेच हिंदू जनजागृती समितीने सरकारकडून औरंगजेबाच्या कबरीवर खर्च होणा-या निधीबबत प्रश्न उपस्थित केले आहेत. माहिती अधिकारातील उत्तरानुसार केंद्रीय पुरातत्व विभागानं २०११ ते २०२३ पर्यंत औरंगजेबाच्या कबरीच्या देखभालीवर सुमारे ६.५ लाख रुपये खर्च केले आहेत.

दुसरीकडे सिंधुदुर्ग किल्ल्यावरील राज राजेश्वर मंदिराच्यादेखभालीसाठी सरकारकडून वर्षाला फक्त ६ हजार रुपये दिले जातात. केंद्रीय पुरातत्व विभागाकडून औरंगजेबाच्या कबरीवर इतका पैसा खर्च होताना तर इतर धार्मिक स्थळांच्या देखभालीला असे प्राधान्य दिले जात नाही. सरकारने भेदभावपूर्ण वागणुकीवर स्पष्टीकरण द्यावे, अशी हिंदू जनजागृतीने मागणी केली.



### औरंगजेबाचा मृत्यू आणि त्याची कबर

● २७ वर्षे मराठ्यांविरुद्ध लढल्यानंतर औरंगजेबाचा मृत्यू अहमदनगर जिल्ह्यातील भिंगार येथे १७०७ मध्ये, ८९ व्या वर्षी झाला. त्याच्या इच्छेनुसार त्याच्या गुरूच्या कबरीजवळच त्याचे अंतिम स्थान करण्यात आले. सुफी संत शेख झैनुद्दीन यांच्या दर्गा परिसरात खुलताबाद येथे ही कबर असून, त्यासाठी त्याने मृत्यूपत्रात १४ रुपये १२आणे खर्चाच्या सूचनाही दिल्या होत्या.

## मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार उसळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मागील काही महिन्यांपासून शांततेकडे वाटचाल करणाऱ्या मणिपूर राज्यात शनिवारी पुन्हा एकदा हिंसाचाराचे गालबोट लागले. राज्यातील वाहतूक सुरळीत करण्याच्या आदेशाची अंमलबजावणी सुरु झाली. यावेळी इम्फाळ-दिमापूर महामार्गावर कुकीसमुदायाच्या सदस्यांमध्ये सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एकाचा मृत्यू झाला असून, २७ सुरक्षा कर्मचारी जखमी झाल्याचे वृत्त आहे.

सुरक्षा व्यवस्थेचा आढावा बैठकीवेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ८ मार्चपासून मणिपूरमधील सर्व रस्त्यांवर लोकांची सुरळीत वाहतूक सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले होते. शनिवारी याची अंमलबजावणी करण्याचा पहिला दिवस होता. इम्फाळहून सेनापतीकडे जाणाऱ्या वाहनांच्या ताफ्याला कुकीबहुल भागात थांबवण्यात आल्याने तणाव वाढला. सुरक्षा दलांनी हस्तक्षेप केला आणि सौम्य बळाचा वापर केला. निदर्शकांना पांगवण्यात आले आणि अश्रूधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. त्यानंतर नागरिकांच्या हालचालीसाठी मार्ग मोकळा होऊ शकला. कानपोक्पीमध्ये, विशेषतः राष्ट्रीय महामार्ग २ च्या बाजूच्या भागात तणाव वाढल्याने, स्थानिक अधिकाऱ्यांनी संचारबंदी लागू केला आहे. शुक्रवारी सरकारी वाहनांच्या हालचालीत अडथळा आणण्यासाठी टायर जाळून राष्ट्रीय महामार्ग २ रोखणाऱ्या संतप्त निदर्शकांना पांगवण्यासाठी सुरक्षा दलांना अश्रूधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या.



# कॅलिफोर्नियात हिंदू मंदिराची तोडफोड!

## भारताकडून निषेध; दोषींवर कारवाईची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अमेरिकेतील कॅलिफोर्नियातील चिनो हिल्स येथील बीएपीएस हिंदू मंदिरात तोडफोडीची घटना समोर आली आहे. यासोबतच मंदिरावर आक्षेपार्ह संदेश लिहिले होते. बीएपीएसच्या सोशल मीडियावरुन ही माहिती शेअर केली आहे. यामध्ये त्यांनी असेही अधोरेखित केले की, ते कधीही द्वेषाला मूळ धरू देणार नाहीत आणि शांती आणि करुणा कायम राहील, दरम्यान आता या तोडफोडीच्या घटनेवरुन भारताने निषेध व्यक्त केला आहे.

भारताने या घटनेचा निषेध व्यक्त केला असून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, कॅलिफोर्नियातील चिनो हिल्स येथील एका हिंदू मंदिराच्या तोडफोडीचे वृत्त आम्ही पाहिले आहे. आम्ही अशा घृणास्पद कृत्यांचा तीव्र निषेध करतो.

स्थानिक अधिका-यांना याबाबत जे जबाबदार असतील त्यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणी केली असून प्रार्थना स्थळांवर सुरक्षा पुरवण्याची मागणी केल्याची माहिती त्यांनी दिली.

गेल्या वर्षीही मंदिर तोडफोडीच्या घटना घडल्या होत्या, २५ सप्टेंबरच्या रात्री कॅलिफोर्नियातील सॅक्रामेंटो येथील बीएपीएस स्वामीनारायण मंदिराची तोडफोड करण्यात आली होती. न्यू यॉर्कमधील बीएपीएस मंदिरात अशाच प्रकारची घटना घडल्यानंतर १० दिवसांपेक्षा कमी वेळात ही घटना घडली.



## सीरियात पुन्हा हिंसाचाराचा आगडोंब

**नवी दिल्ली :** बशर अल-असद सरकारने सत्ता सोडल्यानंतर सीरियामध्ये अनेक वर्षांपासून सुरू असलेला हिंसाचार थांबला होता. परंतु, काही दिवसांच्या शांततेनंतर, देश पुन्हा एकदा हिंसाचाराच्या विळख्यात सापडला आहे. खरं तर, गेल्या दोन दिवसांपासून सीरियन सुरक्षा दल आणि माजी अध्यक्ष बशर अल-असद यांच्या समर्थकांमध्ये सुरू असलेल्या संघर्षात एक हजाराहून अधिक लोक मारले गेले आहेत. सीरियातील परिस्थितीवर लक्ष ठेवणाऱ्या एका संस्थेने म्हटले आहे की, मृतांमध्ये ७४५ नागरिक आहेत, ज्यांना जवळून गोळ्या घालण्यात आल्या. सिरियातील परिस्थितीवर लक्ष ठेवणाऱ्या संघटनेचे म्हणणे आहे की, या संघर्षात १२५ सुरक्षा दल आणि १४८ असद समर्थक अतिरेकी मारले गेले. सीरिया सरकारने हिंसाचारग्रस्त लताकिया शहराचा पिण्याचे पाणी आणि वीज पुरवठा खंडित केला आहे. सीरियामध्ये गुरुवारी (दि.६) हिंसाचार सुरू झाला, जो लवकरच देशाच्या अनेक भागात पसरला.

# सोयाबीन, तुरीचे दर गडगडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : हंगामातील हरभरा ज्वारीची काढणी झाल्यानंतर बाजारात विक्रीसाठी आणला जात आहे. मात्र शेतक-यांच्या घरात माल आल्यानंतर भावात घसरण होत असल्याचे याही वर्षी पुन्हा एकदा पहावयास मिळत आहे. सध्या तूर, हरभ-याची आवक वाढली आहे. तूर ४ हजार रुपये, हरभरा ५०० रुपयांनी खाली आले आहेत. शेतक-याचे पिवळे सोने म्हणजे सोयाबीनचे दर एक हजार रुपयांनी खाली आले आहे.

मंठा तालुक्यातील महत्त्वाचे पीक असलेल्या सोयाबीने यंदा कंबरडे मोडले उत्पादन खर्च ही निघणे मुश्किल झाले. इतका निचांकी दर सोयाबीनला मिळत आहे. भरीस भर म्हणजे सरकारने सोयाबीन खरेदी बंद केल्याने खुल्या बाजारात हरभरा, सोयाबीन, तूर, ज्वारी या शेतकरी धान्याचे गेल्या दहा ते बारा वर्षांतील निचांकी दर गाठले.

या दहा ते बारा वर्षांत पेरणीचे दर गगनाला भिडलेले असताना पीक काढणीचा हंगाम जवळ आला की सरकार बाहेर देशातील शेती माल आयात करते. त्यामुळे या पिकांचे दर घसरले जातात.




ओकलंड कॅलिफोर्नियातील ओकलंडमध्ये अमेरिकेच्या टॅरिफवरून व्यापारी युद्धाचा भडका भडकला असताना, येथील ओकलंड बंदरावर शिपिंग कंटेनरने भरलेले एक मालवाहू जहाज दिसत आहे.



## अब्दुल्ला सरकारचा वादग्रस्त निर्णय

**नवी दिल्ली :** श्रीलंकेचा माजी क्रिकेटपटू मुथय्या मुरलीधरन याच्या कंपनीसाठी जम्मू-काश्मीरमधील कठुआ जिल्ह्यात 'मोफत' जमीन देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यावर जम्मू आणि काश्मीरमधील विरोधी पक्षांच्या आमदारांनी चिंता व्यक्त केली आहे. तथापि, ओमर अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखालील सरकारने या प्रकरणाची कोणतीही माहिती नसल्याचे विधानसभेत म्हटले आहे. मुरलीधरन याची सिलोन बेव्हरेजेस ही कंपनी आहे. ही कंपनी कठुआ येथे १,६०० कोटी रुपयांच्या बॉटलिंग प्लांट उभारत आहे. यासाठी २५.७५ एकर जमीन मोफत देण्यात आल्याची माहिती समोर आली. यावर शनिवारी (दि.८) अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्नोत्तर तासादरम्यान काँग्रेस आणि सीपीआय(एम) च्या आमदारांनी चिंता व्यक्त केल्या. माकपचे आमदार एम.वाय. तारिगामी यांनी मोफत जमीन वाटप करण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच या प्रकरणी राज्य सरकारने उत्तर द्यावे, अशी मागणी केली.

# आयकरानंतर ‘जीएसटी’ दरात कपात होणार?




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थसंकल्पात मोदी सरकारने १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करुन मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा दिला. यानंतर आणखी एक गुड न्यूज देण्याची तयारी केंद्र सरकार करत आहे. आयकर दरात कपात केल्यानंतर आता जीएसटीचे दर कमी होणार आहेत. खुद्द अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी याबाबतचे संकेत दिले आहेत. वस्तू आणि सेवा कराचे दर आणि स्लॅबचे तर्कसंगतीकरण करण्याचे काम जवळपास अंतिम टप्प्यात आले आहे. लवकरच दर कमी करण्याचा निर्णय घेतला जाईल, असे अर्थमंत्री म्हणाले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी एका माध्यमाला मुलाखत देताना जीएसटी दर आणि स्लॅब तर्कसंगत करण्याचे काम जवळजवळ अंतिम टप्प्यात आल्याचे सांगितले. ते म्हणाले की, महसूल तटस्थ दर १ जुलै २०१७ रोजी जीएसटी लागू करताना १५.८ टक्क्यांवरून २०२३ मध्ये ११.४ टक्क्यांवर घसरला आहे आणि तो आणखी कमी होईल. अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील ‘जीएसटी’ परिषदेने सप्टेंबर २०२१ मध्ये दर तर्कसंगत करण्यासाठी आणि स्लॅबमध्ये बदल सुचवण्यासाठी मंत्र्यांचा एक गट स्थापन केला होता.

अर्थमंत्री म्हणाले, की जीओएमने चांगलं काम केलं असून आता मी पुन्हा एकदा प्रत्येक गटाच्या कामाचा सखोल आढावा घेण्याचे काम हाती घेतले आहे. यानंतर हे ‘जीएसटी’ परिषदेसमोर नेलं जाईल. त्यानंतर आपण या संदर्भात अंतिम निष्कर्षापर्यंत पोहोचू शकतो की नाही याचा विचार केला जाईल. दर तर्कसंगत करण्यासाठी आणखी काही काम करणे आवश्यक आहे. आम्ही काही अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यांवर अंतिम निर्णय घेण्याच्या अगदी जवळ आलो असल्याचे अर्थमंत्र्यांनी सांगितले. यामध्ये दर कपात, तर्कशुद्धीकरण, स्लॅबची संख्या यात बदल केले जातील.

### जीएसटी स्लॅबमध्ये बदल होणार?

● मागणी आणि वापर वाढवण्यासाठी सरकारवर दबाव आहे. या पार्श्वभूमीवर जीएसटी परिषद आता ‘जीएसटी’ दर कमी करण्याचा विचार करत आहे. सरकार १२ टक्के स्लॅब जीएसटी दर रद्द करू शकते, असा दावा केला जात आहे. या स्लॅबमध्ये येणा-या वस्तू आणि सेवा ५ टक्के स्लॅबमध्ये किंवा आवश्यक असल्यास १८ टक्के स्लॅबमध्ये जाऊ शकतात. ‘जीएसटी’ दर रचना तर्कसंगत करणे आणि वापर वाढवणे हा या अभ्यासाचा उद्देश आहे.

# उजनीतील फिशमाफियांवर कठोर कारवाई

## वडापच्या जाळ्या केल्या नष्ट, बेकायदेशीर मासेमारीला चाप

■ लोणी देवकर

राज्यातील माशांचे कोठार, अशी ओळख असलेल्या उजनीतील बेकायदा मासेमारीमुळे मत्स्य उत्पादनात मोठी घट निर्माण होऊन पिढीजात व भूमिपुत्रांचा रोजगार संकटात सापडला होता. फिशमाफियांनी बेकायदेशीर मत्स्यबीज व लहान मासे मारण्याचा सपाटा लावला होता. अखेर अशा अवैध मासेमारीवर जलसंपदा विभागाच्या पथकाने शनिवारी (दि. ८) कारवाई करत त्यांचे साहित्य नष्ट करण्याची जोरदार मोहीम हाती घेतली. परिणामी, बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या फिशमाफियांचे धाबे दणाणले आहेत.

पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अभियंता एन. एम. खाडे, शाखाधिकारी महेश दळवी तसेच आकाश पवार, सचिन ठोंबरे, पल्लवी अंबोरे, ज्योती भिसे आदींच्या पथकाने शनिवारी सकाळपासूनच खानोटा (ता. दौंड) व परिसरात कारवाई सुरू केली. यामध्ये लहान आकाराच्या वडापच्या जाळ्या नष्ट करण्यात आल्या.

गेल्या वर्षी उजनीत मत्स्यबीज सोडल्यानंतर या मत्स्यबीजाचे व इतर जातींच्या माश्यांचे संगोपन होण्यासाठी कोणत्याही आकाराच्या वडाप, पंड्या जाळ्यांच्या साहाय्याने मासेमारी अथवा वाहतूक करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. गेल्या वर्षी या बंदीचे पालन करण्यात आल्याने या वर्षी मत्स्य उत्पादनात कमालीची वाढ झाली आहे. परंतु उजनीचे पाणी कमी होताच फिशमाफियांनी वडाप, पंड्याच्या साहाय्याने मासेमारी करण्याचा धडाका सुरू केला आहे. यामुळे बहुतांश मच्छिमार हवालदिल झाला होता. त्यातून ही बेकायदा मासेमारी त्वरित बंद करण्याच्या मागणीने जोर धरला होता, त्यामुळे शनिवारी जलसंपदा विभागाने कारवाईचा बडगा उगारला. ही कारवाई सुरू होताच अनेकांनी पळ काढल्याचे कळते. दरम्यान यापुढेही कारवाई सुरूच राहणार असल्याचे खाडे यांनी सांगितले; मात्र फिशमाफियांवर गुन्हेदेखील दाखल करण्याची मागणी मच्छिमार वर्गाने केली आहे.



### उजनीला धोका तरी देखील...

● उजनी धरणात परराज्यातील मच्छिमारांच्या आडून उजनीच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्याचा अहवाल खुद्द शासनाचा आहे. तरी देखील बेकायदेशीर परप्रांतीयांचे लोंढेच्या लोंढे उजनीत दाखल होऊन त्यांची साधी चौकशी केली जात नसल्याने अवैध मासेमारीला अधिकाऱ्यांचे बळ मिळत आहे का, अशी शंका निर्माण होत आहे. बेकायदा मासेमारीबरोबरच चोरीची वीज, उघड्यावर शौचालय, पक्ष्यांची शिकार, बालकामगार असे अनेक बेकायदा गोष्टी परप्रांतीयाकडून होत असल्याचा आरोप मच्छिमार करीत आहेत.

गेल्या वर्षापासून मत्स्यबीज सोडताच अवैध मासेमारीवर बंदी घातल्याने याचा दृश्यपरिणाम यंदा दिसू लागला आहे. नैसर्गिक प्रजनन होणारे शिवडा, सुंबर, कोळीस, गुगळी, शिंगटा, कानस आदी जातींसह प्रमुख कार्प असलेले कटला, रोहू, मृगल या माशांच्या उत्पादनात वाढ झाली आहे. यातून मच्छीमारांना अच्छे दिन आले आहेत.

बेकायदा मासेमारीमुळे धरणातील संपुष्टात आलेली मत्स्यसंपदा पूर्ववत येण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच क्रीडा व युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या कडक सूचनेनंतर जिल्हाधिकारी यांनी समिती देखील स्थापन केलेली आहे. परंतु, अधिकारीच या सूचनेला केराची टोपली दाखवत असल्याने फिशमाफियांचे बळ वाढत आहे. वास्तविक समितीत इंदापूर, करमाळा, कर्जत, माढा तालुक्यांतील तहसीलदार तसेच पोलिस, प्रदूषण मंडळ आदींचा समावेश आहे. सध्या जलसंपदा विभागाकडून कारवाई सुरू झाली असली, तरी नेमलेल्या समितीने संयुक्त कारवाई केल्यास ती प्रभावी ठरेल, असे मत व्यक्त होत आहे.



## स्नेहप्रभा अरणकल्ले यांचे प्रेरणादायी कार्य

**आळंदी :** दिव्यांग आदर्श शिक्षिका स्नेहप्रभा अरणकल्ले ( अष्टपुत्रे ) यांचे प्रेरणादायी कार्य कौतुकास्पद आहे. त्या ८० वर्षाच्या दिव्यांग असून युवक तरुणांना लाजवेल असे व्यक्तींमत्त्व असल्याचे श्री ज्ञानेश्वर विद्यालय आळंदी येथील प्रशाळेतील आदर्श शिक्षिका सरला जोशी यांनी सांगितले. महिला दिन विशेष साठी माहिती देताना जोशी म्हणाल्या, स्नेहप्रभा माझी बहीण असून६ वर्षा पूर्वी तिचे दीनानाथ हॉस्पिटल मध्ये हृदयाच्या झडप बद्दलचे मोठे ऑपरेशन झाले. त्यानंतर लॉकडाऊनच्या काळात झोपेत वरून खाली पडून खुब्याचे हाड मोडले. त्यावेळी पुन्हा दीनानाथ मध्ये भरती करून ऑपरेशन झाले. घरी आणल्यावर परत त्या पायाचे दुखणे इतके असाह्य झाले की पुन्हा भरती करून दुसरे ऑपरेशन झाले. पायाला एकूण ३६ टाके पडले. घरीच असते. चालता येत नसल्याने वॉकर घेऊन चालते. त्या एमएबीएड आहेत. त्यांनी वाघेश्वर विद्याधाम शिरूर येथे शिक्षिकेची नोकरी केली आहे. या दरम्यान आदर्श शिक्षकेचा पुरस्कार देखील मिळाला आहे. पायाने दिव्यांग आहेत. असे असताना देखील सतत वाचन करून आपले आवडता जोपासत आहे. या शिवाय छंद म्हणून झबले, टोपे व दुपट्टे हाताने शिवत असून इतरांना प्रेरणादायी कार्य करून दुसर्या समोर आदर्श ठेवला आहे. छंद म्हणून झबले, टोपे व दुपट्टे हाताने शिवलेले कपडे गोरगरिबांच्या बालकांना हे कपडे भेट म्हणून पाठवीत आहे. कापड देखील तिच्या स्वतःचेच असते. यातून पैसा मिळवणे हा हेतू नाही. स्वतःचा आनंद व छंद म्हणून ती से एक सेवा कार्य करीत आहे. आता पर्यंत पाचशेवर बाळांना हे कपडे देऊन छंद जोपासला आहे. अशा या प्रेरणादायी मातृवत्सल आदर्श महिला व्यक्तिमत्वास महिला दिना निमित्त हार्दिक शुभेच्छा देत सरला जोशी यांनी कार्याचा सन्मान केला आहे.




## खेड तालुक्यातील १८ गावांचे सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**पुणे :** जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील १ जानेवारी २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या एकूण १०८ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये खेड तालुक्यातील एकूण १८ गावांच्या सरपंच पदाचे आरक्षण ही जाहीर करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे ही आरक्षण सोडत पार पडली होती. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास वर्ग, सर्वसाधारण या प्रवर्गासाठी सरपंच आरक्षण सोडत काढण्यात आली होती. यामध्ये खेड तालुक्यातील एकूण १८ ग्रामपंचायतीचा समावेश होता.

**ग्रामपंचायतीचे नाव आणि सरपंच पदाची आरक्षण यादी पुढील प्रमाणे:**

खराबवाडी- सर्वसाधारण (महिला), जऊळके खुर्द-सर्वसाधारण, कोहिंडे बुद्रुक- सर्वसाधारण, सोळू- सर्वसाधारण, वडगाव घेनंद- नागरिकांचा मागास वर्ग, धामणे- सर्वसाधारण, गुळाणी- नागरिकांचा मागास वर्ग, रौंधळवाडी- नागरिकांचा मागास वर्ग (महिला), आसंखेड बुद्रुक- सर्वसाधारण (महिला), आंबेठाण-अनुसूचित जमाती, वाशेरे-सर्वसाधारण (महिला), सायगाव- नागरिकांचा मागास वर्ग, कडाचीवाडी-नागरिकांचा मागास वर्ग (महिला), बोरदरा-सर्वसाधारण (महिला), पाईट- नागरिकांचा मागास वर्ग, कोये- सर्वसाधारण (महिला), खालुंब्रे-अनुसूचित जमाती (महिला), टेकवडी-सर्वसाधारण (महिला).

## अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवले



**शिरूर :** रांजणगाव सांडस (ता.शिरूर) येथून एका अज्ञात व्यक्तीने अल्पवयीन मुलीला फूस लाऊन पळवून नेल्याची घटना घडली आहे. याबाबत मुलीच्या आईने शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला रांजणगाव सांडस येथील राधेवाडी रोड जवळ मुलीसह एका कोपीमध्ये राहत होत्या. त्या मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होत्या. मात्र, २ ते ३ मार्च दरम्यान अल्पवयीन मुलीची आई कामावर गेली असता एका अज्ञात व्यक्तीने मुलीला फूस लावून पळवून नेले. अशी तक्रार शिरूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. संबंधित मुलीने पिवळ्या रंगाचा ड्रेस, पांढऱ्या रंगाची पँट, पांढऱ्या रंगाची ओढणी, कानात बेंन्टेक्स पांढऱ्या रिंगा, उजव्या हाताच्या अंगठ्यावर इंग्रजीत 'व्ही'असे गोंदलेले, पायात काळ्या कलरची साधी चप्पल, रंगाने सावळी, बांधा सडपातळ, उंची ५ फुट, नाक सरळ, केस काळे लांब, सोबत रेडमी कंपनीचा मोबाईल अशा वर्णनाची मुलगी कोणाला आढळून आल्यास शिरूर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सटवाजीबुवा मंदिर देवस्थानला सहआयुक्तांचा हिरवा कंदील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** गुळाणी, ता. खेड येथील श्री क्षेत्र सटवाजीबुवा मंदिर देवस्थानच्या कार्यरत असलेल्या देवस्थानच्या अध्यक्ष, संचालक मंडळाला काम करण्यासाठी धर्मादाय सह आयुक्त रजनी क्षीरसागर यांनी हिरवा कंदील दाखवला आहे. तसा आदेश नुकताच मिळाला असल्याची माहिती देवस्थानाचे अध्यक्ष व गुळाणीचे माजी सरपंच दिलीप ढेरंगे यांनी दिली.

अध्यक्ष आणि सहकारी चुकीचे कामकाज करीत असल्याचा आरोप करत संचालक मंडळातील ॲड ज्ञानेश्वर थोडे, संदीप पिंगळे, कान्हु ढेरंगे व इतर सदस्यांनी देवस्थानच्या विरोधात सन २०१७ मध्ये धर्मादाय सह आयुक्त यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. कार्यरत संचालक मंडळाला कामकाज करण्याचा अधिकार नसुन तसा प्रतिबंध करावा अशी मागणी त्यात केली होती. याशिवाय राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात देखील खटला दाखल केला आहे. गेली सात वर्षे सुरू असलेल्या या न्यायालयीन प्रक्रियेमुळे सटवाजीबुवा मंदिर देवस्थानला तीर्थक्षेत्री महत्त्वाची कामे करता आली नाही. कार्यरत राहण्याच्या निकालामुळे यापुढे संचालक मंडळाच्या बैठकी, कामकाजाला वेग येऊन भाविकांच्या सुख, सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न होणार आहेत अशी भावना अध्यक्ष दिलीप ढेरंगे व सहकारी संचालकांनी व्यक्त केली आहे. देवस्थानच्या बाजूने ॲड डी डी शहा यांनी वेळोवेळी यशस्वी युक्तिवाद केला.



गुळाणी येथील सटवाजीबुवा मंदिर हे जागृत देवस्थान आहे. राज्यभरातील भाविक येथे दर्शनासाठी येतात. रोज आणि उत्सव काळात येथे मोठी गर्दी होत असते. मात्र देवस्थानच्या सदस्यांमध्ये वाद सुरू झाल्याने येथील व्यवस्थापनात त्रुटी निर्माण झाल्या होत्या. येथील मंदिराला पुरातन वारसा असून नव्याने मंदिर देवस्थानच्या विकासाला चालना देण्यात येत आहे. त्यात खंड पडणार नाही यासाठी धर्मादाय सह आयुक्तांच्या निकालाला महत्व आहे असे दिलीप ढेरंगे म्हणाले. संचालक मंडळाच्या विरोधात भुमिका घेणाऱ्या सहा संचालकांना मंडळाने कमी केले होते. त्याचा राग मनात धरून त्यांनी देवस्थान विरोधात तक्रार दाखल केली होती. आम्ही सत्य होतो म्हणुन न्याय मिळाला.

> धर्मादाय सह आयुक्तांनी दिलेला निर्णय आणि आमची तक्रार भिन्न बाबी आहेत. अवैध उत्खननात साडेचार लाख रुपये दंड ठोठावला आहे. अशा अनेक चुकीच्या कारभाराची पुराव्यासहित माहिती दिली असुन संचालक मंडळ बरखास्त करण्याची मागणी धर्मादाय सह आयुक्त यांना दिली आहे. त्याचा निकाल अद्याप बाकी आहे.
>
> — **संदीप पिंगळे,** संचालक तथा तक्रारदार व माजी उपसरपंच, गुळाणी

# माळेगाव कारखान्याची निवडणूक लांबणीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक लांबणीवर टाकण्यात आली आहे. कारखान्याच्या मतदार यादीच्या अर्हता दिनांक बाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या दाखल याचिकेसंदर्भात उच्च न्यायालयाचे आदेश होईपर्यंत कारखान्याची निवडणूक पुढे ढकलण्यात येत असल्याचा आदेश अप्पर निबंधक तथा सहसचिव संतोष पाटील यांनी दिले आहेत.

माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या अनुषंगाने साखर आयुक्तांनी मंगळवारी (दि. ४) शासनास प्रस्ताव सादर केला होता. प्रादेशिक सहसंचालकांनी निश्चित केलेल्या कारखान्याच्या मतदार यादीच्या अर्हता दिनांक बाबत उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ६०७६/२०२५ व ५८६०/२०२५ दाखल करण्यात आली आहे. या याचिकेच्या अनुषंगाने माळेगाव सहकारी साखर कारखान्याचा निवडणूक कार्यक्रम स्थगित करण्याबाबत माळेगाव कारखान्याचे कार्यकारी संचालकांनी साखर आयुक्तांना विनंती केली होती.

याचिका उच्च न्यायालयात दाखल असल्याने अशा परिस्थितीत निवडणूक कार्यक्रम सुरू ठेवल्यास व त्यानंतर उच्च न्यायालयाचे विपरीत आदेश झाल्यास पुनश्च निवडणूक कार्यक्रम प्रसिद्धी व इतर अनुषंगिक खर्चामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.अशा परिस्थितीमध्ये उच्च न्यायालयाचा अंतिम आदेश प्राप्त होईपर्यंत कारखान्याचे निवडणूक प्रक्रिया घोषित करणे उचित होणार नाही, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, बारामती यांनी साखर आयुक्तांना सादर केला होता.



### अपर निबंधकांचे आदेश

● साखर आयुक्तांनी शासनास सादर केलेल्या अहवालातील वस्तुस्थिती विचारात घेऊन माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या मतदार यादीच्या अर्हता दिनांकाबाबत दाखल केलेल्या याचिकेसंदर्भात उच्च न्यायालयाचा आदेश येईपर्यंत माळेगाव कारखान्याची निवडणूक पुढे ढकलण्यात येत असल्याचे आदेश अप्पर निबंधक तथा सहसचिवांनी दिले.

# संत ज्ञानेश्वरांचे साहित्य जगाला वाचविणारे

## 'ओळख श्री ज्ञानेश्वरीची' उपक्रमास हरिनाम गजरात प्रारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** ज्ञानेश्वरी ही जगाच्या कल्याणासाठी संत ज्ञानेश्वर माऊलींनी ७३४ वर्षांपूर्वी सांगितली. माऊलींचे साहित्य फक्त वाचन करण्यासाठी नाहीतर ते आत्मसात करण्यासाठी असून ते जगाला वाचविण्यासाठी असल्याचे श्री संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती अध्यक्ष प्रकाश काळे यांनी सांगितले.

जनता शिक्षण संस्थेच्या अहिल्यादेवी होळकर विद्या मंदिरात महिला दिना निमित्त ओळख श्री ज्ञानेश्वरीची हा शालेय मुलासाठी असलेला मूल्य संस्कारक्षम उपक्रम श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटी आळंदी, ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवाराचे वतीने श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती अध्यक्ष प्रकाश काळे यांचे हस्ते दीप प्रज्वलन, प्रतिमा पूजन करून उत्साहात सुरु करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य युवराज घोळवे होते. या प्रसंगी व्यासपीठावर ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवाराचे विश्वंभर पाटील, अर्जुन मेदनकर, दीपक काळे, जिजामाता हायस्कूलचे शिक्षक प्रतिनिधी साहेब पिसाळ, छाया पोटे, माध्यमिक शिक्षक प्रतिनिधी श्रवणकुमार बेलदार, ज्युनिअर कॉलेज शिक्षक प्रतिनिधी महेश तांबे, अमोल जगताप, दीपक गिरमे, जितेंद्र कोकणी, प्रशालेचे सर्व शिक्षक, शिक्षिका व सर्व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

ओळख श्री ज्ञानेश्वरी उपक्रम अंतर्गत मूल्य शिक्षण, संस्कारक्षम शिक्षण, महिला दिनाचे उपक्रमास अस्थी कलश स्थळ स्मारक पूजनाने झाली. मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते व सर्व महिला भगिनींच्या हस्ते गुरुवर्य दादा व माई यांच्या प्रतिमेचे, माता सरस्वती पूजन, श्री संत ज्ञानेश्वर महाराज प्रतिमा पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी उपक्रमाती संत साहित्य सार्थ श्री ज्ञानेश्वरी, ओळख श्री ज्ञानेश्वरी, हरिपाठ, सार्थ हरिपाठ आदी संत साहित्य प्रशालेस सुपूर्द करण्यात आले.



# एसटीतील महिला कर्मचाऱ्यांना ८ तासच ड्युटी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नारायणगाव (ता. जुन्नर) बस स्थानकात काम करणाऱ्या वाहक महिलांच्या कामाचा कालावधी १२ तासांऐवजी आठ तासांचा करण्यात आला आहे. कामाचा कालावधी कमी झाल्यामुळे काम करणाऱ्या महिलांनी आगार प्रमुख वसंत अरगडे, सहाय्यक अधिकारी तुकाराम पवळे व शुभम खरमाळे यांचे आभार मानून सत्कार केला.

यावेळी वाहतूक नियंत्रक पवन भोर, सहाय्यक वाहतूक नियंत्रक रामदास आवटे, महिला कर्मचारी जयश्री डोके, पुनम हांडे, योगिता जगताप, लता डोके, सुजाता वाघ, आशा मुंढे, अर्चना अभंग, राजश्री पवार, पुष्पा ढाके उपस्थित होते. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नारायणगाव बस स्थानकाच्या अधिकाऱ्यांनी महिला कर्मचाऱ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.

नारायणगाव बस स्थानकात २७ वाहक, १ चालक व लेखनिक मिळून ४० महिला कर्मचारी काम करीत आहे. त्यामध्ये वाहक म्हणून काम करणाऱ्या महिलांना १२ तासांची ड्युटी असल्याने सकाळी घरातून लवकर बाहेर पडावे लागत होते व ड्युटी संपल्यानंतर घरी पोहोचण्यासाठी उशीर होत होता.

एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी महिला कर्मचाऱ्यांच्या ड्युटीचे योग्य पद्धतीने नियोजन करावे यासाठी मागील १५ वर्षांपासून मागणी केली जात होती; परंतु १५ वर्षांच्या कालावधीत नारायणगाव बस स्थानकात अनेक आगार प्रमुखांनी काम केले; परंतु महिला कर्मचाऱ्यांच्या मागणीचा गांभीर्याने विचार केला गेला नाही.

### सर्व महिला कर्मचाऱ्यांकडून आनंद व्यक्त

● नारायणगाव बस स्थानकाचे आगार प्रमुख वसंत अरगडे यांनी महिला कर्मचाऱ्यांच्या अडचणींचा गांभीर्याने विचार करून त्यांच्या ड्युटीचे शेड्युल सोयीस्कर करून दिले. महिलादिनी समजूतीने प्रश्न मार्गी लावल्याने बस स्थानकातील सर्व महिला कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला, असे वाहक जयश्री डोके, पुनम हांडे यांनी नमूद केले.

# इंदापूर नगरपालिकेचा शिलकी अर्थसंकल्प

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** इंदापूर नगर परिषदेचा सन २०२५-२६ चा ४२ कोटी ७९ लाख ७० हजार महसुली जमा व १७५ कोटी ७१ लाख ५० हजार भांडवली जमा असलेल्या अर्थसंकल्पाला कोणतीही करवाढ न करता मंजुरी देण्यात आली.

इंदापूर येथील नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी रमेश ढगे यांनी सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाच्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाचा प्रस्तावित अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पामध्ये कोणतीही करवाढ करण्यात आलेली नाही. यात नियमानुसार महिला बालकल्याण, दिव्यांग, दुर्बल घटक, तसेच क्रीडा महोत्सव यासाठी विशेष राखीव निधीची तरतूद केली आहे, अशी माहिती नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमेश ढगे यांनी दिली.

कोणतीही कर वाढ नसलेला रुपये १४ लाख ५० हजार २१३ रुपये शिल्लकेचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. यामध्ये मागील वर्षाची शिल्लक ३१ कोटी ९० लाख २० हजार ४२० असून सन २०२४-२५ मध्ये अंदाजे महसूली जमा रक्कम ४२ कोटी ७९ लाख ७० हजार व भांडवली जमा रक्कम १७५ कोटी ७१ लाख ५० हजार असे एकुण रक्कम रक्कम २१८ कोटी ५१ लाख २० हजार अपेक्षित जमा धरणेत आलेली आहे. तसेच महसूली खर्च रुपये ४२ कोटी ७५ लाख २० हजार २०७ रुपये व भांडवली खर्च रुपये २०७ कोटी ५१ हजार ७० हजार असे एकुण रूपये २५० कोटी २६ लाख ९० हजार २०७ रुपये खर्च अपेक्षित धरण्यात आलेला आहे.

शहरात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत इंदापूर शहरासाठी नवीन भुयारी गटार योजना मंजूर असून, त्या योजनेचे काम प्रगतिपथावर आहे. नगरपरिषदेचा स्वहिस्सा या अनुषंगाने निधीची भरीव तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविणे, संगणकीकरण यासह नागरी सुविधा केंद्र अद्ययावत करण्याच्या अनुषंगाने तरतूद, तसेच शहराची वाढती लोकसंख्या व विस्तार विचारात घेऊन, प्रस्तावित शहर विकास आराखडा विचारात घेऊन नवीन रस्ते, नगरपरिषदेसाठी नवीन प्रशासकीय इमारती साठी आवश्यक आर्थिक तरतूद केली आहे. शहराची वाढती लोकसंख्या व रहिवासी वस्ती लक्षात घेता पाणीपुरवठा विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग यासाठी दैनंदिन देखभाल व दुरुस्ती व त्या कामासाठी अर्थसंकल्पात भरीव आर्थिक तरतूद केली आहे.

शासनाने अर्थसंकल्प सादर केला असला तरी गेली तीन वर्ष नगरपरिषदेवरती लोकप्रतिनिधी नसल्याने नागरिकांच्या समस्या सुटण्यात अडचण येत आहे यामुळे शासनाने लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी तात्काळ नगर परिषदेच्या निवडणुका घेऊन नगरपालिकेवरील प्रशासकराज संपुष्टात आणावे



" गेल्या तीन वर्षाहून अधिक काळ झालं नगरपरिषदेच्या निवडणुका न झाल्याने प्रशासकीय अधिकारी अर्थसंकल्प सादर करत आहेत. यंदाच्या अर्थसंकल्पात कोणतीही करवाढ करण्यात आली नाही ही समाधानाची बाब आहे. सर्वसामान्य नागरिक आपल्या सर्वच मागण्या थेट प्रशासनापर्यंत पोहोचवू शकत नाहीत मात्र जर वेळीच निवडणुका झाल्या तर नगरपरिषदेचा कारभार लोकप्रतिनिधींच्या हाती असल्यास नागरिकांच्या मागण्यांचा समावेश अर्थसंकल्पामध्ये करणे अधिक प्रभावी ठरेल. यामुळे शासनाने या गोष्टीचा विचार करून तात्काळ निवडणुका घ्याव्यात.

— **भरत शहा**
माजी उपनगराध्यक्ष,
इंदापूर नगरपरिषद



## राजगुरू महाविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**खेड :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त व्याख्यान, स्त्रीवादी कवितांचा जागर, पोस्टर प्रदर्शन, मनोरंजनपर खेळ अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, समन्वयक डॉ. श्वेतांबरी मांडे, सर्व महिला प्राध्यापिका व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. विद्यार्थिनी कल्याण मंडळाच्या वतीने चौधरी पाटील इंग्लिश मीडियम स्कूलच्या रोहिणी गव्हाणे यांचे 'शिक्षण आणि महिला सबलीकरण' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. विद्यार्थिनी, महिला प्राध्यापिका यांच्यासाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. तसेच सर्व महिलांचा पेन व गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. मराठी विभागाच्या वतीने स्त्रीवादी कवितांचा जागर करण्यात आला. मलिका अमरशेख, हिरा बनसोडे, नीरजा, कल्पना दुधाळ अशा बाईपणाच्या आरशातून समाजचित्रे पाहणाऱ्या कवयित्रींच्या कवितांचे विद्यार्थिनींनी सादरीकरण केले. स्त्रीवादी कवितांचे पोस्टर प्रदर्शन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. केतकी गावडे व प्रा. हर्षदा कोळी यांनी तर आभार डॉ. श्वेतांबरी मांडे यांनी मानले.

## आयटीआय व्यवस्थापन समितीवर मनोहर चव्हाण

**जुन्नर :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग तर्फे महाराष्ट्रातील प्रत्येक शासकीय आयटीआय वर शासकीय व्यवस्थापन समिती असते. महाराष्ट्र राज्याचे कौशल्य रोजगार व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या सूचनेनुसार प्रज्ञान अकॅडमीचे संस्थापक मनोहर विठ्ठल चव्हाण यांची पुणे जिल्ह्यातील क्रांतिकारी होनाजी केंगले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) घोडेगाव (गोणवाडी) ता. आंबेगाव या संस्थेवर व्यवस्थापन समितीवर शासकीय सदस्य म्हणून निवड झाली आहे. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शासनाच्या सर्व सोयी सुविधा, भौतिक सुविधा, दर्जेदार कौशल्य शिक्षण मिळते ही नाही, केंद्र शासनाच्या फंड व्यवस्थित खर्च होतो की नाही या सर्व गोष्टी पाहण्याचे काम व्यवस्थापन समितीचे असते. मनोहर चव्हाण यांच्या निवडीबद्दल शिक्षण क्षेत्रातील व्यक्तीकडून कौतुक होत आहे.



## स्त्रीशक्ती म्हणजे संस्कृती, विचार आणि प्रेरणा

**खेड :** हिंदु संस्कृतीत महिलेला आदराचे स्थान आहे. संस्कृतीचे जतन करून विचार आणि प्रेरणा शक्तीचा अखंड जागर करणाऱ्या महिलांनी विविध क्षेत्रात उच्च कामगिरी केली आहे. आजच्या स्थितीत समाजाकडून स्त्रीचा सन्मान होणे अपेक्षित आहे. असे मत राजगुरुनगर सहकारी बँकेच्या संचालिका, शिवसेनेच्या (उबाठा) जिल्हा महिला संघटक विजया शिंदे यांनी व्यक्त केले. राजगुरुनगर सहकारी बँकेच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधुन शनिवारी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला अधिकारी, कर्मचारी यांचा सन्मान समारंभ आयोजित केला होता. यावेळी मार्गदर्शन करताना विजया शिंदे बोलत होत्या.बँकेचे अध्यक्ष दिनेश ओसवाल, संचालिका अश्विनी पाचारणे, राजेंद्र सांडभोर, अधिकारी दिलीप मलघे तसेच बँकेच्या महिला अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. भारतात अग्रस्थानी असलेल्या ५४ नागरी सहकारी बँकांमध्ये राजगुरुनगर सहकारी बँकेला वरचे स्थान आहे. संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी, कर्मचारी वर्गाने बँकेच्या प्रगतीचा आलेख उंचावत ठेवला आहे. यात बँकेतील महिला वर्गाचा महत्वाचा व मोलाचा वाटा आहे. अध्यक्ष दिनेश ओसवाल यांनी महिला अधिकारी, कर्मचारी यांच्याबद्दल असे गौरवोद्गार काढले. संचालिका अश्विनी पाचारणे यांनीही मनोगत व्यक्त केले.

# भर उन्हात 'तिचा जीवघेणा खेळ'... पाहायला नाही कुणाला वेळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** भर उन्हात दोरीवर चालुन जीवघेणा खेळ ती रोज खेळते.. आजही खेळत होती.. लहान वयातला तीचा साहसी खेळ सहज पाहायला उपलब्ध होता.. मात्र उन्हाच्या कडाक्यात कोणी थांबत नव्हते.. आई ढोल वाजवत होती.. हातातली काठी सावरत आणि घामाच्या धारा आवरत दोन रुपयांच्या आशेने दोरीवर चकरा मारणारी ती अखेर खाली उतरली.. दुसऱ्या चौकात काही मिळेल या आशेने खेळ मांडायला निघाली.. जागतिक महिला दिन साजरा होत असताना या चौकात तिचे जग दीनच राहिले होते.

चांद दिनेश नट, वय १३, राहणार खोकरा, जिल्हा जहांगीरछापा, छत्तीसगड असे तीचे नाव. वडील मयत झाल्यावर पोटाची खळगी भरण्यासाठी नात्यातल्या तांड्या बरोबर हिंडून ती गेले तीन महिने हे काम करीत आहे. सन २०२४ च्या जानेवारी महिन्यात तीने गाव सोडले.जवळचे नातेवाईक बरोबर आहेत. जिथे खायला मिळेल तिथे सगळ्यांबरोबर खाते, त्यांच्याच झोपते. छत्तीसगड मधील नट ( डोंबारी) जातीतले असे अनेक लोक विविध राज्यात विभागले आहेत. जमीन नाही, घरदार नाही, फिरता धंदा करायचा म्हणुन शिक्षणही नाही.



अशी कुटुंबातल्या मुलांची अवस्था. पनवेल येथे त्यांची मोठी वस्ती आहे. या ठिकाणी चांद हिला गेल्या वर्षभरात दोरीवर चालण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

शनिवारी (दि ८) राजगुरुनगर शहराच्या रस्त्यांवर सकाळ पासून त्यांचा खेळ सुरू होता. दुपारपर्यंत कमाई मात्र खायला घेण्याइतकी पण झाली नव्हती. भावनिक प्रतिक्रीया येतात.आमच्या प्रती कळवळा जाणवतो .. पण खिशात हात जात नाही. जगायचे असेल तर हे सहन करून पुढे जावे लागते अशी प्रतिक्रिया यातील मुखियाने दिली.

## गुटखा विक्रीप्रकरणी दोघांना अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** जुन्नरमधील भर वस्तीच्या भागात असलेल्या दोन पानाच्या दुकानामध्ये शासनाने बंदी घातलेला विविध कंपन्यांचा गुटखा, सुगंधित पान मसाला, तंबाखू विक्रीसाठी ठेवलेला असताना, पोलिसांना मिळून आला असून, या प्रकरणी दोन दुकान मालकांविरोधात विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यांना अटक करण्यात आली आहे.

दिनेश अनिल परदेशी (रा परदेशपुरा जुन्नर) व राजेंद्र तुळशीराम भालेकर (रा नारूडी आंबेगाव) यांच्या विरोधात पोलीस अंमलदार कैलास केंद्रे यांनी फिर्याद दाखल केली आहे. जुन्नर एसटी बस स्थानका लगत परदेशी यांचे तर परदेशपुरा चौकात भालेकर यांचे पानाचे दुकान आहे. याठिकाणी शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पान मसाला, तंबाखू हे अन्य पदार्थ विविध कंपन्यांचे विक्री करिता ठेवलेले असताना पोलीस पथकाला मिळून आले. या दोनही दुकानातून प्रतिबंधित मुद्देमालासह या दोघांना ताब्यात घेण्यात येऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, जुन्नर परिसरामध्ये लहान-मोठ्या पान टपऱ्यांची संख्या मोठी असून, याठिकाणी गुटखा, तंबाखू , सुगंधित सुपारी हे बंदी असलेले अन्न पदार्थ बिनधास्तपणे विक्री केले जात आहेत. शहरातील कोणत्याही भागात गेले असता रस्त्यांवर खाऊन टाकलेली विविध कंपन्यांची गुटख्याची मोकळी पाकिटांची संख्या मोठ्या प्रमाणात सर्वत्र दिसून येते.

## तरुणाकडून पिस्तुल व काडतूस हस्तगत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**महाळुंगे :** गुरुवारी दिनांक ६ मार्च रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत निघोजे तालुका खेड येथील सावली हॉटेलच्या मागे ताब्यात घेण्यात आलेल्या तरुणाकडून पिस्तुल आणि काडतुसे हस्तगत करण्यात आली आहे. आकाश बाळू थोरात (२६, रा. चाकण) असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्याकडून एक देशी बनावटीचे पिस्तुल व जिवंत काडतूस असे ५१ हजार रुपयांचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे. त्याच्यावर विविध कलमान्वये महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधिताकडे मिळालेले शस्त्र हे अग्निशस्त्र असून, ते गावठी बनावटीचे असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. महाळुंगे एमआयडीसी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## शिरूरमधील ऊस उत्पादकांचा गुऱ्हाळ घरांकडे कल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरूर :** साखर कारखान्यांप्रमाणेच गुऱ्हाळघर मालकदेखील ऊस नेण्यासाठी शेतकऱ्यांच्या क्रमपाळीचा अवलंब करीत आहेत. शिवाय कारखान्यांच्या बरोबरीने दर देतात तसेच वजनाचीही खात्री मिळते. त्यात कारखाने ऊस उशिरा नेत असल्यामुळे शेतकरी आपला ऊस गुऱ्हाळांना पाठविण्याला पसंती देऊ लागले आहेत.

शेतातील ऊस लवकरात लवकर जावा आणि पुढील पिकासाठी शेती रिकामी व्हावी यासाठी शेतकरी मिळेल तिकडे ऊस घालवण्याच्या मन:स्थितीत असतात. लवकर ऊस नेणाऱ्या कारखान्याला ऊस दिला जात आहे. सध्या कारखान्यांचा यंदाचा गळीत हंगाम अखेरीस आला आहे. त्यामुळे कारखान्यांकडून लवकर ऊस नेला जात नाही. ऊसतोड कामगार तोडीसाठी पैसे मागतात, ऊस पेटवून तोडला जातो. ऊसतोड कामगारांच्या या मनमानीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

छोट्या शेतकऱ्यांच्या उसाला उशीर लागत आहे. ऊस लवकर जात नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेतकऱ्यांची घालमेल वाढू लागली आहे. त्यात कारखाना प्रशासनही गप्प आहे. उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कारखानेदेखील इतर भागांतील ऊस आणणे पसंत करीत आहेत. त्यामुळे शेतकरी सध्या ऊस घालविण्यासाठी पळापळ आणि तडजोड करण्याच्या मन:स्थितीत आला आहे. कारखान्याच्या कर्मचाऱ्यांना भेटूनदेखील लवकर ऊस जात नाही. यामुळे शेतकरी गुऱ्हाळ घरांकडे ऊस देण्यास पसंती दर्शवित आहे.



**श्रीखंडोबाला द्राक्षांची आरास :** जेजुरी महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या श्रीखंडोबा देवाला श्रीगोंदा येथील महिला भाविक अर्चना दत्तात्रय धाकड यांच्या वतीने द्राक्षांची आरास करण्यात आली. कुलदैवत खंडोबा देवाला वर्षभरात पाने, फुले, फळे, धान्य, भात, बिल्वपत्र, भंडारा अशा विविध सप्त पूजा घालण्यात येतात.

# चाकणमध्ये कांद्याची आवक वाढून दरात घसरण

## कांदा, लसूण व भेंडीची प्रचंड आवक, पालेभाज्यांचे भाव कोलमडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये परवल, कांदा, लसुण व भेंडीची प्रचंड आवक झाली. कांद्याची आवक वाढून दरात घसरण झाली. ओल्या भुईमूग शेंगा व जळगाव भुईमूग शेंगांची काहीच आवक झाली नाही. फळभाज्या व पालेभाज्यांचे भाव कोलमडले आहेत. एकूण उलाढाल ६ कोटी ८० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १४,००० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ३ हजार क्विंटलने वाढल्याने भावात ४०० रुपयांची घट झाली. कांद्याचा कमाल भाव २,७०० रुपयांवरून २ हजार ३०० रुपयांवर स्थिर राहिला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली.गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ५०० क्विंटलने घटूनही बटाट्याचा कमाल भाव २ हजार रुपयांवर स्थिर राहिला.

लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक २ क्विंटलने वाढूनही लसणाचा कमाल भाव १० हजार रुपयांवर स्थिरावला.

हिरव्या मिरचीची एकूण आवक ३१० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार रुपयांपासून ते ६ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

**शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे**

- कांदा - एकूण आवक -१,४००० क्विंटल.भाव क्रमांक - १.२,३०० रुपये,भाव क्रमांक २.२,१०० रुपये,भाव क्रमांक ३.१,८०० रुपये.

बटाटा - एकूण आवक - १,५०० क्विंटल.भाव क्रमांक १.२,००० रुपये, भाव क्रमांक २.१,४०० रुपये,भाव क्रमांक ३.१,२०० रुपये.



चाकण बाजारात कांद्याची प्रचंड आवक झाली. (छायाचित्र अविनाश दुधवडे, चाकण.)

**जनावरे**

चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ४२ जर्शी गाईपैकी २८ गाईची विक्री झाली.(१०,००० ते ५०,००० रु.),८० बैलांपैकी ६८ बैलांची विक्री झाली.(१०,००० ते ४०,००० रु.), ९५ म्हशीपैकी ७५ म्हशींची विक्री झाली.(२०,००० ते ८०,००० रु.),१० हजार ९५० शेळ्या - मेंढ्यापैकी १०,२३० शेळ्यांची विक्री झाली.(२,००० ते १५,००० रु.),.

**फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -**

- टोमॅटो - ३१६ क्विंटल (८०० ते १,२०० रू.),कोबी - २६० क्विंटल (३०० ते ५०० रू.),फ्लॉवर -२५० क्विंटल (४०० ते ८००रु.),वांगी - ८२ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.),भेंडी - ८६ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.),दोडका - ६३ क्विंटल (३,००० ते ४,५०० रु.),कारली - ७२ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.),दुधीभोपळा - ६२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.),काकडी - १०० क्विंटल (१,००० ते २,००० रु.),फरशी - ५२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.),वालवड - ४२ क्विंटल (२,००० ते ५,००० रुपये),ढोबळी मिरची -१६६ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.),चवळी -४० क्विंटल (२,००० ते ३,००० रु.),शेवगा -३४ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.),गाजर - ३०० क्विंटल (१,००० ते १,५०० रु.),गवार -६० क्विंटल (५,००० ते ७,००० ),वाटाणा -२०० क्विंटल (४,००० ते ४,५००),आले -१९५ क्विंटल ( २,००० ते ४,००० ).,

**पालेभाज्या**

- चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे - मेथी - एकूण १८ हजार ९५० जुड्या (५०० ते ७०० रुपये ),कोथिंबीर - एकूण २३ हजार ६०० जुड्या (६०० ते १,००० रुपये,),शेपू - एकूण ४ हजार १०० जुड्या (६०० ते ८०० रुपये ), पालक - एकूण ३ हजार ८०० जुड्या (४०० ते ५०० रुपये),.

# तोडा मनाची बंधने

आपल्यापैकी प्रत्येकाने स्वत:वर काही बंधनं लादली आहेत. शारीरिक किंवा सामाजिक बंधनांपेक्षा आपण मानसिक बंधनांमध्ये अडकून पडलोय. ही बंधनं तोडण्याची क्षमता असली तरी वर्षानुवर्षांच्या नकारात्मक मानसिकतेमुळे आपण प्रयत्न करत नाही. आपला स्वत:वरचा विश्वासच उडून गेलेला असतो. आपण स्वत:ला ठराविक साच्यात गुंडाळून घेतो. त्यामुळे आयुष्यात आलेल्या अपयशाच्या साखळ्या आपल्याला भेदता येत नाहीत. एका उदाहरणाद्वारे ही बाब जाणून घेऊ. रस्त्यावरून जाणाऱ्या एका व्यक्तीला काही हत्ती बांधलेले दिसतात. या महाकाय हत्तींचा पुढचा पाय दोरखंडाने बांधलेला असतो. हत्तीसारख्या प्रचंड शक्तीशाली जीवाला साध्या दोरखंडाने बांधणं त्याला विचित्र वाटतं. हत्तीला साखळीने बांधण्याऐवजी दोरखंडाने बांधण्यामागचं कारण तो शोधू लागला. त्यातच हे हत्ती बंधनातून मुक्त होण्यासाठी कोणताही प्रयत्न करत नव्हते. यामुळे तर त्या माणसाला जास्तच आश्चर्य



वाटलं. याबाबत त्याने माहुताला प्रश्न केला. हे हत्ती शांतपणे कसे काय उभे राहू शकतात, साध्या दोरखंडाने बांधलेले असूनही मुक्त होण्याचा मार्ग त्यांना कसा मिळत नाही, असे प्रश्न त्याने विचारले. यावर माहुत म्हणाला, या हत्तींना लहानपणापासून अशाच रस्सीने बांधलं जातं. त्यावेळी हा दोरखंड भेदण्याची क्षमता त्यांच्यात नसते. अनेक प्रयत्नांनंतरही हे हत्ती दोरखंड भेदू शकत नाहीत. हे दोरखंड तोडण्यात आपण अक्षम आहोत अशी खात्री त्यांना पटते. त्यांचा स्वत:वरचा विश्वास ढळू लागतो. यामुळे मोठे झाल्यानंतरही ते तसा प्रयत्न करत नाहीत. माहुताचं हे उत्तर ऐकल्यानंतर त्याने याबाबत साधूशी चर्चा केली. त्यावर साधू म्हणाला, या प्राण्यांचा बंधनावर विश्वास आहे. त्यामुळे ते हे बंधन तोडू इच्छित नाहीत. या हत्तींप्रमाणे माणसंही अशाच बंधनात अडकलेली दिसतात. आयुष्यातल्या अपयशाला ते बंधन मानतात. हे अपयश दूर करण्याचा प्रयत्नही ते करत नाहीत. आपण हे करू शकत नाही, अशी त्यांची मानसिकता झालेली असते. अशा वेळी आपल्या मानसिक बंधनांमध्ये अडकून माणूस प्रगतीच्या सगळ्या वाटा बंद करतात. त्यामुळे आपण आपले प्रयत्न कधीही सोडू नयेत. सगळी बंधनं तोडण्याची क्षमता आपल्यात असते. स्वत:वर विश्वास ठेऊन मार्गक्रमण केलं पाहिजे. तरच तुम्ही यशस्वी होऊ शकता.

बोध

# 'असभ्यते' चं सांस्कृतिक दर्शन!

भक्ती विशेष

सगळीकडे होळीचं वातावरण रंगू लागलं आहे. होळीसाठी लागणाऱ्या गोवऱ्या, ढपल्या, ताशा आदी सामानाने बाजारात प्रवेश केला आहे. त्याबरोबरच विविध रंगांनी भरलेल्या टोपल्याही बाजारात सजू लागल्या आहेत. होळी हा वर्षातील शेवटच्या महिन्यात येणारा एक महत्त्वाचा सण... या दिवशी पुरोहित बोलावून होलिका पूजन केलं जातं. ही होळी म्हणजे देवी आहे. तिच्या पूजनाने जीवनातील अनिष्ट प्रसंग टळतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. या पेटत्या होळीला नारळ अर्पण केला जातो आणि नंतर तो काढल्यावर प्रसाद म्हणून उपस्थितांना वाटला जातो. महिला होळीसाठी केलेल्या पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करतात, त्यानंतर पाण्याची धार धरुन होळीभोवती प्रदक्षिणा घातली जाते. काही कर्मठ लोक गुळाचे साप, विंचू, झुरळ, ढेकूण बनवून होळीच्या आगीत जाळतात. हे सगळं सुरू असताना जमलेले पुरुष बोंब मारत राहतात. इंग्रजी राजवटीत त्यांच्या अन्याय्य शासनपद्धतीचा निषेध म्हणून एक बोंब ठोकली जायची. 'होळी म्हण होळी, पुरणाची पोळी... इंग्रज मेला संध्याकाळी...' अशा काही टवाळखोर घोषणा होळीभोवती दिल्या जात असल्याची आठवण वृद्धांच्या तोंडून आपल्याला ऐकायला मिळते.

जैमिनीच्या पूर्वमीमांसा सूत्रात होळी या सणाचा उल्लेख 'होलाका' म्हणून केला आहे. हा सण भारताच्या पूर्व भागात अतिशय लोकप्रिय होता. तो साजरा करण्याचे विविध प्रकार जैमिनीसूत्र, काठक गृह्यसूत्र, लिंग पुराण, हेमाद्रिचं व्रत खंड, वराहपुराणात सांगितले आहेत. या ग्रंथांमध्ये या सणासंबंधीचे अनेक प्राचीन संदर्भ आणि सण साजरा करण्याच्या पद्धती सांगितलेल्या आहेत. काठक गृह्यसूत्रामध्ये 'राकाहोलाके' नावाचं सूत्र आहे. टीकाकारांनी याचा अर्थ लावताना होलाके हा स्त्रीच्या सौभाग्य वर्धनासाठी करावयाचा एक विधी असल्याचं सांगितलं आहे. त्यात राका म्हणजे पौर्णिमा ही देवता असते. म्हणजेच पौर्णिमेच्या दिवशी केल्या जाणाऱ्या या विधीने स्त्रीचं सौभाग्य वाढतं असं यात सांगितलं आहे.

**जैमिनीच्या पूर्वमीमांसा सूत्रात होळी या सणाचा उल्लेख 'होलाका' म्हणून केला आहे. हा सण भारताच्या पूर्व भागात अतिशय लोकप्रिय होता. तो साजरा करण्याचे विविध प्रकार जैमिनीसूत्र, काठक गृह्यसूत्र, लिंग पुराण, हेमाद्रीचं व्रत खंड आणि वराहपुराणात सांगितलेले आहेत. या ग्रंथांमध्ये या सणासंबंधीचे अनेक प्राचीन संदर्भ आणि सण साजरा करण्याच्या पद्धती सांगितल्या आहेत.**



वात्स्यायनाने कामसूत्रात स्त्री-पुरुषांच्या क्रीडाप्रकारात वीस खेळ सांगितले आहेत. त्यावेळी हे खेळ कमी-अधिक प्रमाणात विविध प्रातांमध्ये खेळत असतं. त्यात 'होलाका' हा एक खेळ सांगितला आहे. यात जनावरांच्या शिगांमधून, बांबू वा तत्सम साधनांमधून एकमेकांवर रंग उडवला जात असे. यावेळी पाण्याचाही वापर होत असे. हेमाद्रीने बृहद्यमाच्या ग्रंथात होळी पौर्णिमेला 'फाल्गिनिका' म्हटले आहे. तो दिवस बालीश चेष्टा करुन, बालीशपणा करुन साजरा केल्यास संसार सुखाचा होतो असं सांगितलं आहे. यामुळे लोकांची भरभराट होते असंही हा ग्रंथ सांगतो. वराहपुराणात या पौर्णिमेला 'पटवासविलासिनी' असं म्हटलं आहे. या दिवशी एकमेकांच्या अंगावर रंगीत पुड्या उधळून दिवस साजरा करावा असं या पुराणात सांगितलं आहे. भविष्योत्तर पुराणात कृष्ण-युधिष्ठीर संवादात रघुराजाची एक कथा सांगितली आहे. त्याच्या राज्यात 'ढुंढा' नावाची एक राक्षसी मुलांना रात्रंदिवस पीडत असे. देव वा मनुष्य यांच्यापासून तुला मरण येणार नाही, असा वर तिला ब्रह्मदेवाने दिलेला असतो. तिच्या पीडेच्या निवारणार्थ पुरोहिताच्या सल्ल्याने राजाने फाल्गुनी पौर्णिमेला घराबाहेर लाकडाचा ढीग करुन रात्रभर पेटता ठेवावा, अश्लील शब्द उच्चारुन मोठा ध्वनी करावा अशी आज्ञा दिली. आणि खरंचच त्यायोगे राक्षसी मरण पावली. तेव्हापासून तो दिवस 'अडाडा' किंवा 'होलिका' या नावाने प्रसिद्ध आहे. वद्य प्रतिपदेला होळीच्या राखाडीला वंदन करुन, तेथे पाणी तापवून, अंगाला राख फासून स्नान करावं असं सांगितलं आहे.

होळी म्हणजे हिवाळ्याचा शेवट आणि उन्हाळ्याची सुरूवात. या दिवसात वसंताचं साम्राज्य पसरलेलं असतं. म्हणून या दिवशी चंदन आणि आम्रमोहोर यांच्या साह्याने कामदेवाची पूजा करण्याविषयीदेखील सांगितलं आहे. ही पूजा आयुष्यभर सुख प्रदान करते. जैमिनी आणि काठक गृह्यसूत्रातील संदर्भावरुन हा सण ख्रिस्तपूर्व काळात काही शतकं अस्तित्वात आणि लोक अनुभूतीत असावा असं दिसून येतं. वसंताच्या आगमनाचं स्वागत कामोद्दिपक नृत्य-गीत गायनाने करावा असं यात म्हटलं आहे. भविष्योत्तर पुराण आणि कामसूत्रातही हा सूर आळवला गेलेला दिसतो. विविध प्रांतात होलिकोत्सव परंपरेप्रमाणे एक, तीन वा पाच दिवस साजरा केला जातो. शूलपाणीलिखित 'दोला यात्रा विवेक' या ग्रंथात या सणाचं विधीविधान सांगितलं आहे.

पंढरपुरात होळीसाठी गल्ली-गल्लीतून शेणाच्या गोवऱ्या गोळा केल्या जातात. त्यासाठी 'आया-बायांनो पाच पाच शेण्या' अशी साद घालत मुलं फिरत असतात. महाद्वार घाटावर श्री विठ्ठल मंदिरातर्फे मानाची पहिली होळी पेटते. या होळीतून अग्नी आणून इतरत्र होळ्या पेटवल्या जातात. धुळवडीचा दिवस राख-चिखल एकमेकांवर टाकून साजरा केला जातो. पुण्या-मुंबईसारख्या शहरांमध्ये घरोघरी होळी केली जात नाही तर सार्वजनिकरित्या एक होळी केली जाते. काही गणेश मंडळं होळी पेटवतात. मात्र खेडेगावामध्ये आजही घरोघरी होळी केली जाते. या दिवशी सगळे उपचार पार पडतात पण कोणी त्यामागील शास्त्र, प्रतीकं आणि संदेश जाणून घेण्याचा प्रयत्न करत नाही. खरं तर याविषयी सखोल माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करणं गरजेचं आहे, कारण जी संस्कृती अत्यंत सभ्य, विवेक आणि सुसंस्कारित विचारसरणीचं अधिष्ठान मान्य करते, जी अमंगल वाणी, विचार यांना अपवित्र मानते, जी त्यांचा त्याग करण्याचा सल्ला देते त्याच संस्कृतीत एखाद्या सणानिमित्त अर्वाच्च भाषेच्या प्रयोगाला सांस्कृतिक मान्यता मिळते तेव्हा त्यामागे विचार होण्याची आवश्यकता आहे. हा माणसाच्या मनातील नकारात्मक भावनांचं निरसन करण्याचा एक विधी आहे असं वाटतं. सध्या शरीरातील विषाक्त घटक दूर करण्यासाठी विशिष्ट आहार सांगितला जातो. होळीसारखे सणवार मनातील विषाक्त भावनांच्या त्यागातून मनशुद्धीचा एक प्रांजळ प्रयत्न करताना दिसतात.

# मुलांच्या अभ्यासिकेत करा हे बदल

वास्तू भक्ती

सध्या परीक्षांचा माहोल आहे. यामुळे मुलं अभ्यासात गढून गेली आहेत. परीक्षेत चांगले गुण मिळवण्यासाठी भरपूर अभ्यास केला पाहिजे. पण काही मुलांचं अभ्यासात लक्ष लागत नाही. पाठांतर करून काही लक्षात रहात नाही. खूप अभ्यास केला तरी चांगले गुण मिळत नाहीत. अभ्यासिकेतल्या वास्तूदोषांमुळे असं होऊ शकतं. अभ्यासिकेची रचना करताना या बाबी ध्यानात घेतल्या तर वास्तूदोष दूर होऊन त्यांना यश मिळू शकतं.



✼ मुलांच्या अभ्यासाचं टेबल चौकोनी असावं. गोल किंवा अंडाकृती टेबलवर अभ्यास केल्याने अपेक्षित यश मिळत नाही.

✼ अभ्यासाच्या टेबलच्या पृष्ठभागाचा रंग पांढरा, राखाडी किंवा फिकट गुलाबी असला पाहिजे. पृष्ठभागाचा रंग फार गडद असू नये.

✼ अभ्यासाच्या टेबलवर पुस्तकांव्यतिरिक्त दुसरं काहीही ठेऊ नये.

✼ बंद घड्याळं, तुटलेली पेनं, पेन्सिली, चाकू, सुरी, कात्री अशी हत्यारं ठेऊ नये.

✼ कॉम्प्युटर टेबलच्या उत्तर किंवा पूर्व दिशेला ठेवायला हवा. टेबलच्या ईशान्य कोपऱ्यात कॉम्प्युटर ठेऊ नये.

✼ अभ्यासाचं टेबल जिन्याखाली ठेऊ नये.

✼ स्वीच बोर्ड अभ्यासाच्या खोलीच्या ईशान्य कोपऱ्यात असू नये.

✼ अभ्यासाच्या खोलीत छोटं मंदिर किंवा देवाची मूर्ती ठेवावी.

✼ विद्यार्थ्यांनी देवासमोर दिवा लावायला हवा. यामुळे देवाची कृपा राहिल आणि अभ्यासात यश मिळू शकेल.

# लाभ गायत्रीमंत्राचे

**गायत्री मंत्र हा अत्यंत शक्तीशाली मंत्र मानला जातो. या मंत्रात दैवी शक्ती असते असं मानलं जातं. गायत्री मंत्र वेदांमध्ये लिहिण्यात आला होता. या मंत्राचे शरीरावर भावनिक आणि मानसिक असे दोन्ही परिणाम होतात. गायत्री मंत्राच्या लाभांविषयी जाणून घेऊ...**

मंत्रजागर

गायत्री मंत्रात चमत्कारिक शक्ती असल्याचं मानलं जातं. देवाची आराधना करताना, त्याची प्रार्थना करताना, ब्रह्मज्ञान मिळवताना, भौतिक सुखासाठी तसंच पैसा मिळवण्यासाठी गायत्री मंत्र म्हटला जातो. दिवसात तीन वेळा गायत्री मंत्र म्हणता येतो. हा मंत्र म्हणण्याच्या ठराविक वेळा आहेत. त्यापैकी एक म्हणजे संध्याकाल. तसंच सूर्योदयाआधी आणि सूर्य उगवेपर्यंत हा मंत्र म्हणता येतो.

✼ या वेळांव्यतिरिक्त इतर वेळी मंत्र म्हणता येतो. पण मन शांत असताना अगदी हळू आवाजात हा मंत्र म्हणायचा असतो. हा मंत्र मोठ्या आवाजात म्हणू नये.

✼ या मंत्राच्या उच्चारामुळे माणसात भक्तीभाव विकसित होतो. ठराविक अध्यात्मिक पातळी गाठल्यानंतर देव तुमच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करतो.

✼ मनातल्या वाईट विचारांमुळे, नकारात्मक भावनेमुळे लोक आजारी पडतात. गायत्री मंत्राच्या उच्चाराने या वाईट भावना दूर सारल्या जातात आणि माणसाची तंदुरूस्ती कायम राहते.

✼ गायत्री मंत्र नियमितपणे म्हटल्याने पुढच्या पिढ्यांना लाभ होतो. पुढच्या पिढ्या बुद्धीवान निपजतात.

✼ गायत्री मंत्रामुळे शांत, आनंदी कुटुंबाची खूप भरभराट होते. प्रचंड पैसा असूनही साधेपणा जपणाऱ्या लोकांना गायत्री मंत्रामुळे अनेक लाभ होतात.

✼ गायत्री मंत्र प्रत्येकासाठी लाभदायी मानला जात असला तरी लहान मुलांना याचे अनेक लाभ होतात. या मंत्राचं दररोज १०८ वेळा पठण केल्यास मुलांच्या मेंदूचा विकास होतो. स्मरणशक्ती सुधारते आणि आयुष्यात जे हवं ते मिळतं.




✼ शत्रूंमुळे तुम्हाला त्रास होत असेल तर दर मंगळवारी, शनिवारी आणि अमावस्येला या मंत्राचं पठण करा. यावेळी लाल कपडे परिधान करा. गायत्री मंत्र म्हणताना दुर्गा देवीचं स्मरण करा. यामुळे सगळ्या समस्यांचं निराकरण होऊ शकेल.

✼ लग्न ठरत नसेल तर दर सोमवारी हा मंत्र १०८ वेळा म्हणा. यावेळी पिवळी वस्त्रं परिधान करा. देवी पार्वतीचं स्मरण करा. तुम्हाला सुयोग्य जोडीदार मिळेल.

✼ जुनाट आणि गंभीर विकारांपासून सुटका हवी असेल तर मंगल दिवशी या मंत्राचं पठण करा. यावेळी पाण्याने भरलेला घडा किंवा तांब्या जवळ ठेवा. मंत्र म्हणताना लाल कापड अंथरून त्यावर बसा. मंत्र म्हटल्यानंतर तांब्यातलं पाणी पिऊन टाका.

✼ गायत्री मंत्राच्या नियमित पठणामुळे तुमच्या चेहऱ्यावर तेज येतं. त्वचा चमकदार दिसते.

✼ गायत्री मंत्रामुळे उत्तम आरोग्य राखता येतं. मंत्राच्या नियमित पठणामुळे जंक फूड किंवा अनारोग्यदायी पदार्थांवरुन वासना उडते आणि आपलं आरोग्य चांगलं राहतं.

✼ डोळ्यांशी संबंधित विकार असतील तर गायत्री मंत्राचं पठण लाभदायी ठरू शकतं. यामुळे दृष्टीदोष दूर होतात.

# घालावे कोणते कपडे

जाणून घ्या

कोणतंही धार्मिक स्थळ अत्यंत पवित्र मानलं जातं. या स्थानाचं पावित्र्य आणि मांगल्य जपणं गरजेचं असतं. म्हणूनच मंदिरात किंवा कोणत्याही धार्मिक स्थानी जाताना पेहरावाला महत्त्व दिलं जातं. विशिष्ट धार्मिक स्थानी जाताना ठराविक पेहराव करणं बंधनकारक असतं. देवाच्या मूर्तीचा अभिषेक करताना रेशमी वस्त्र परिधान करण्याबाबत सांगितलं जातं. धर्मस्थळी जाताना कोणत्या प्रकारचा पेहराव करावा, याबाबत बरीच मतमतांतरं आहेत पण देवासमोर हात जोडताना आरामदायी आणि शालीन कपडे घालणं योग्य ठरतं. ही बाब स्त्री आणि पुरूष दोघांनाही लागू पडते. धार्मिक स्थानी आल्यानंतर आपलं लक्ष देवावर केंद्रित होणं गरजेचं असतं पण तंग किंवा टोचणारे कपडे घातल्यास सगळं लक्ष तिकडे लागून राहतं. अशा वेळी देवाची कृपा प्राप्त होऊ शकत नाही. देवाचं ध्यान करताना एकाग्रता महत्त्वाची मानली जाते. प्राचीन काळात ऋषी-मुनी तसंच सर्वसामान्य माणसं धोतर नेसत असतं. धोतर हा अत्यंत आरामदायी पेहराव मानला जातो. जुन्या काळात यज्ञयागांना खूप महत्त्व होतं. अशा वेळी धोतरामुळे हालचाल करणं सोपं होत असे. त्यामुळे आराधना, यज्ञ करताना सगळं लक्ष देवाकडे केंद्रित करता येत असे. महिलाही आरामदायी पेहराव करत असत. मंदिराचं पावित्र्य राखण्याची परंपरा आजही कायम आहे. त्यामुळे मोठमोठ्या मंदिरांमध्ये पूजेदरम्यान पारंपरिक वस्त्रं घातली जातात. रेशमी वस्त्रांना प्राधान्य दिलं जातं. मंदिरात जाताना पिवळ्या किंवा लाल रंगाची वस्त्रं परिधान केली जातात. पिवळा रंग सकारात्मक मानला जातो तर लाल हा देवीचा रंग मानला जातो. या रंगाचं अध्यात्मिक महत्त्व आहे. त्यामुळे धार्मिक स्थानी जाताना पिवळ्या किंवा लाल रंगाचे आरामदायी आणि पारंपरिक कपडे घालणं योग्य ठरतं.



# मंदिर विभिषणाचं

तीर्थक्षेत्र



हिंदू धर्मात अनेक पौराणिक व्यक्तिमत्त्वं आढळतात. या धर्मातल्या ३३ कोटी देवी-देवतांची मंदिरं भारतासह जगातल्या इतर देशांमध्येही आहेत. यासोबतच काही पौराणिक व्यक्तिमत्त्वांची मंदिरंही आहेत. लंकाधिपती रावणाचा भाऊ विभिषण रामभक्त होता. रावणाचा वध करण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती. या विभिषणाचं मंदिर राजस्थानातल्या कोटा शहरात आहे. या ठिकाणी कोटा-डोरिया नावाचं एक स्थान आहे. या ठिकाणी विभिषणाचं मंदिर वसलंय. हे मंदिर इसवी सन चौथ्या शतकात बांधण्यात आल्याचं बोललं जातं. मार्च महिन्यात या ठिकाणी मोठी जत्रा भरते.

या मंदिराची निर्मितीबाबत अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. त्यापैकी एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. ती अशी की, अयोध्येत श्रीरामाचा राज्याभिषेक होत असताना विभिषणाने हनुमान आणि शंकराच्या मूर्तींना पालखीत बसवलं आणि तो तीर्थयात्रेला निघाला. पालखीचा स्पर्श जमिनीला होऊ द्यायचा नाही, असा संकल्प त्याने केला होता. या यात्रेदरम्यान विभिषण कोटा डोरियाच्या जवळ असलेल्या कैथून येथून जात असताना पालखीचा एक भाग कोट्याच्या रंगबाडी बालाजी या स्थानी तर दुसरा भाग चारचौमा या ठिकाणी स्पर्शून गेला. या स्थानी शंकर आणि हनुमानाचं मंदिर बांधण्यात आलं. विभिषणाचा महिमा या भागात पसरल्यानंतर चौथ्या शतकात त्याचं मंदिर बांधण्यात आलं, असं म्हणतात. विभिषणाचं हे मंदिर अनोखं म्हटलं पाहिजे.

# समूहात काम करताना...

भक्ती मनाची

आजच्या जगात टीम वर्कला महत्त्व आहे. सगळी कामं एकत्रितपणे केली पाहिजेत. आयुष्याचं ध्येय एकट्याने ठरवण्याचे, एकट्याने यश मिळवण्याचे आणि एकट्याने व्यवसाय करण्याचे दिवस केव्हाच मागे पडले आहेत. सर्वांनी एकत्र येऊन स्वत:च्या आणि व्यवसायाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी काम केलं पाहिजे. हिंदू धर्मातले ऋषीमुनी ध्यानाला बसत असत, यज्ञ करत असत तेव्हा समूहाने बसत असत. एकट्याने यज्ञ करण्याचं प्रमाण बरंच कमी होतं. कोणत्याही धर्मातल्या पूजा-अर्चनेच्या प्रथा जाणून घेतल्या तर समूह प्रार्थनेला महत्त्व दिल्याचं दिसून येतं. इस्लाममध्ये एकत्र नमाज पढला जातो. चर्चमधली प्रेयरही समूहाने होते. आरत्या करताना मंडळी एकत्र जमतात. समुहाने केलेली कोणतीही गोष्ट यशस्वी ठरते.

आता हीच बाब आपल्या व्यवसायाशी जोडून बघा. व्यवसाय किंवा नोकरीत पुढे जाताना सगळ्यांना जोडून ठेवावं लागतं. आता तुम्ही समूहाचं नेतृत्त्व करू शकता किंवा समूहाचा एक भाग असू शकता. सगळ्यांना एकत्र घेऊन पुढे चालायचं असेल तर पूजा-अर्चनेच्या पद्धती तुमच्या कामी येऊ शकतात. त्यामुळे जीवनात पूजा, प्रार्थनेला महत्त्व देण्यात आलंय. यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वात अनेक बदल घडतात. प्रत्येक व्यक्तीची दोन व्यक्तिमत्त्वं असतात. एक शारीरिक व्यक्तिमत्त्व तर दुसरं मानसिक व्यक्तिमत्त्व. शारीरिक व्यक्तिमत्त्व शरीराने कार्य करत असतं तर मानसिक व्यक्तिमत्त्वावर मनाचा प्रभाव असतो. शारीरिक व्यक्तिमत्त्व सगळं समजून घेतं पण मनातल्या गोष्टींना आवर घालणं कठीण असतं. मनात इर्ष्या निर्माण होते. हेवेदावे निर्माण होतात. वैमनस्य वाढतं. मन षडयंत्र रचू लागतं. असं हाऊ नये म्हणून देवाची आराधना करायला हवं. यामुळे तुमच्यात नेतृत्त्वगुण विकसित होऊ शकतील आणि समुहात काम करणं सोपं होईल.





## मोहम्मद आमीर आयपीएल खेळणार

आयपीएलमध्ये आता पाकिस्तानच्या खेळाडूची एंट्री होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. पण बीसीसीआयने पाकिस्तानच्या खेळाडूंनी एंट्री न देण्याचे ठरवले होते. पाकिस्तानने भारतावर २००८ साली दहशतवादी हल्ला केल्यानंतर बीसीसीआयने पाकिस्तानच्या खेळाडूंवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आजतागायत बीसीसीआयने पाकिस्तानच्या खेळाडूंवर बंदी कायम ठेवली होती. पाकिस्तानच्या खेळाडूंना तर आयपीएलमध्ये प्रवेश नव्हता, मग या खेळाडूला कशी एंट्री दिली, हा प्रश्न सर्वांनाच पडला असेल. पण या प्रश्नाचे उत्तरही आता समोर आले आहे. कारण या खेळाडूने आता युनायटेड किंगडमचे नागरिकत्व पत्करले आहे. त्यामुळे त्याला आता आयपीएलमध्ये एंट्री मिळू शकते, यापूर्वी अशीच एंट्री पाकिस्तानच्या अझर मेहमूदला दिली होती. पण आता पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज युनायटेड किंगडमचे नागरिकत्व घेऊन आयपीएल खेळणार आहे आणि या खेळाडूचे नाव आहे मोहम्मद आमीर.

# भारतासमोर 252 धावांचे लक्ष्य

## मिचेल-ब्रसवेलच्या खेळीने भारतासमोर आव्हानात्मक धावसंख्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दुबई :** येथे चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना, भारतासमोर २५२ धावांचे लक्ष्य ठेवले. न्यूझीलंडनकडून डॅरिल मिशेलने सर्वाधिक ६३ धावा केल्या, तर मायकेल ब्रेसवेलने नाबाद अर्धशतक झळकावून संघाला २५० धावांचा टप्पा ओलांडण्यास मदत केली. भारताकडून वरुण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले, तर मोहम्मद शामी आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. भारतीय फिरकी गोलंदाजांनी न्यूझीलंडच्या फलंदाजांवर दबाव कायम ठेवला.

न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरने टॉस जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. यावेळी न्यूझीलंडकडून विल यंग आणि रचिन रविंद्र मैदानात उतरला होता.या दोघांनी न्यूझीलंडला चांगली सूरूवात करून दिली होती. यावेळी दोन्ही खेळाडू आपली विकेट टीकवून खेळत होते.



त्यामुळे टीम इंडियासमोर ही जोडी फोडण्याचे मोठे आव्हान होते.


अखेर विकेट पडत नसल्याने रोहित शर्माने गोलंदाजीसाठी मिस्ट्री स्पिनर वरूण चक्रवर्तीला बोलावून घेतले. आणि वरूण चक्रवर्तीने विल यंगला फिरकीच्या जाळ्यात अडकवून अवघ्या १५ धावांवर बाद केले. त्यानंतर रचिन रविंद्र आणि केन विल्यमसन या फॉर्ममध्ये असलेल्या दोन खेळाडूंची विकेट काढण्याचे टीम इंडियासमोर आव्हान होते. मात्र मैदानात चायनामॅन कुलदिप यादवची जादू चालली आणि त्याने दोन्ही खेळाडूंना ३७ आणि ११ धावांवर बाद केले.

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा रोहित शर्माचा एकदिवसीय सामन्यांमध्ये नाणेफेक गमावण्याचा नकोसा लौकिक कायम राहिला. रोहितने या फॉरमॅटमध्ये सलग १२ वा वेळा नाणेफेक गमावली. भारताने उपांत्य सामन्यातील संघ कायम ठेवला. न्यूझीलंड संघातील मॅट हेन्री खांदा दुखापतीने संघाबाहेर पडला, तर त्याच्या जागी नॅथन स्मिथला अकरा जणांमध्ये स्थान देण्यात आले.

कुलदीप यादवच्या (२/४०) शानदार गोलंदाजीच्या मदतीने, भारतीय फिरकीपटूंनी न्यूझीलंडला मोठी धावसंख्या उभारू दिली नाही. डॅरिल मिशेल आणि मायकेल ब्रेसवेल यांच्या अर्धशतकांमुळे न्यूझीलंडला अंतिम सामन्यात ७ बाद २५१ धावा अशी सन्मानजनक धावसंख्या उभारता आली. प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर डॅरिल मिशेल (६३, १०१ चेंडू) आणि ब्रेसवेल (४० चेंडूत ५३) यांच्या अर्धशतकांच्या जोरावर न्यूझीलंडने भारतासमोर २५२ धावांचे लक्ष्य ठेवण्यात यश मिळवले.

# आयपीएल पूर्वी मुंबईचा गोलंदाज विल्यम्स जखमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** मुंबई इंडियन्सचा वेगवान गोलंदाज लिझाड विल्यम्स इंडियन प्रीमियर लीग-२०२५ मधून बाहेर पडला आहे. लिझादच्या जागी मुंबई फ्रँचायझीने दक्षिण आफ्रिकेच्या कॉर्बिन बॉशला संघात सामील केले आहे. फ्रँचायझी व्यतिरिक्त, इंडियन प्रीमियर लीग आयोजन समितीनेही मुंबई इंडियन्सच्या या बदलीला मान्यता दिली आहे. समितीने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

३० वर्षीय बॉशची चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी दक्षिण आफ्रिकेच्या संघात एनरिक नॉर्कियाऐवजी निवड झाली आहे. त्याने दक्षिण आफ्रिकेसाठी एक कसोटी, दोन एकदिवसीय आणि ८६ टी-२० सामने खेळले आहेत. २०२२ च्या हंगामासाठी तो राजस्थान रॉयल्समध्ये नेट बॉलर म्हणून सामील झाला असला तरी, बॉश आता इंडियन लीगमध्ये पदार्पण करू शकत नाही. त्याची निवड नाथन कुल्टर-नाईलच्या जागी करण्यात आली.

लिजाद विल्यम्स व्यतिरिक्त, मुंबई इंडियन्सचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह देखील आयपीएल-२०२५ च्या सुरुवातीच्या सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही. तो बंगळुरूमधील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) मध्ये बरा होत आहे. सिडनी येथे झालेल्या BGT-२०२४-२०२५ च्या शेवटच्या सामन्यात बुमराहला दुखापत झाली होती. बुमराह व्यतिरिक्त, लखनौ सुपर जायंट्सचा मयंक यादव देखील बरा होत आहे. आयपीएलचा पहिला सामना २२ मार्च रोजी आरसीबी आणि केकेआर यांच्यात होणार आहे. आयपीएल-२०२४ चा पहिला सामना २२ मार्च रोजी गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) यांच्यात कोलकाता येथे खेळला जाईल. इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) चे प्रसारक स्टार स्पोर्ट्सने २० दिवसांपूर्वी वेळापत्रक जाहीर केले होते.

# निखील कोकाटेने सर्वोच्च शिखर - माउंट किलीमांजारो केला सर



**पुणे :** आफ्रिका खंडातील सर्वोच्च शिखर - माउंट किलीमांजारो (५८९५ मी.) नुकताच यशस्वीपणे सर करण्याचा मान तळेरानच्या (ता. जुन्नर) निखील किसन कोकाटे या आदिवासी युवकाने मिळवला आहे. या अनोख्या मोहिमेसाठी आदिवासी प्रकल्प विभागाने मोलाची मदत केली होती. या मोहिमेची सुरुवात निखिलने किल्ले शिवनेरीवर नतमस्तक होऊन केली. त्यानंतर तो विमानाने किलीमांजारो आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचला. त्यानंतर सात दिवसांच्या ट्रेकमध्ये कॅनडा, स्लोव्हेनिया, फ्रान्स, हाँगकाँग आणि इंग्लंड, रशिया येथील गिर्यारोहक सहभागी होते. स्थानिक पारंपरिक पोशाखात सन्मानित करून या ट्रेकचा शुभारंभ झाला. मचामे गेटपासून सुरू झालेला ट्रेक मवेका गेटपर्यंत यशस्वीरीत्या पूर्ण झाला. दरम्यान, या मोहिमेच्या विविध टप्प्यावर युवकांना कठीण परिस्थितीचा सामना करावा लागला. अत्यंत थंड हवामान, कमी ऑक्सिजन, डोंगराळ भागातील अवघड वाटा यावर मात करत प्रवास सुरू राहिला. तब्बल ६ तासांच्या कठीण चढाईनंतर, ५७८० मी. उंचीवरील स्टेला पॉइंट गाठल्यावर गिर्यारोहकांचा आत्मविश्वास वाढला. शेवटच्या टप्प्यात संपूर्ण जिद्दीने पुढे जात आफ्रिका खंडातील (टांझानिया) सर्वोच्च शिखर सर केले. हा मोहिमेचा पहिला टप्पा असून, आगामी पर्वतमोहिमा सुरू करणार असल्याचे निखिलने सांगितले.

# भारताच्या विजयासाठी चाहत्यांकडून आरत्यांचे आयोजन



**नवी दिल्ली :** क्रिकेट म्हणजे भारतीय चाहत्यांसाठी एखाद्या धर्माप्रमाणेच आहे. भारतीयांचे क्रिकेटवरील प्रेम आपल्याला वेळोवेळी दिसून येतेच. अशात आज भारत व न्यूझीलंड दरम्यान चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील अंतिम फेरीचा सामना रंगणार आहे. या सामन्यसाठी भारतीय चाहते प्रचंड उत्सुक आहेत. फायनलमध्ये भारताच्या विजयासाठी चाहत्यांनी देशभरातील विविध मंदिरात हवन, पूजा व आरत्यांचे आयोजन केले आहे. कानपूरमधझील चाहत्यांकडून राधा माधव मंदिरात भारताच्या विजयासाठी हवन करण्यात आला आला. यावेळी त्यांनी भारतीय खेळाडूंच्या फोटो व तिरंगा देखील घेतला होता. हवानाच्या इथे बॅट, हेल्मेट ठेवण्यात आले. वाराणसीमधील चाहत्यांनी टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफी विजेतपद पटकावण्यासाठी सारंगनाथ महादेव मंदिरात आरती केली. यावेळी चाहत्यांनी महादेवावर दुधाचा अभिषेक देखील केला. भारतीय चाहते टीम इंडियाच्या विजयसाठी नेहमीच अशाप्रकारचे प्रार्थना करताना पाहायला मिळतात.

# बुमराह, मयंक सुरुवातीचे सामने खेळणार नाहीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भारतीय संघाचा अनुभवी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि आयपीएल स्टार मयंक यादव या हंगामातील पहिल्या काही सामन्यांना मुकण्याची शक्यता आहे. बुमराह मुंबई इंडियन्सकडून खेळतो. तर मयंक यादव लखनौ सुपर जायंट्सकडून खेळतो. दोघेही सध्या बंगळुरूमधील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स (CoE) येथे पुनर्वसन प्रक्रियेतून जात आहेत.

बुमराहचा वैद्यकीय अहवाल ठीक आहे. त्याने CoE मध्ये पुन्हा गोलंदाजी सुरू केली आहे. तथापि, पुढील दोन आठवड्यांत आयपीएलच्या सुरुवातीला तो गोलंदाजी करू शकेल अशी शक्यता कमी आहे. सध्याच्या परिस्थितीनुसार तो एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात परतू शकतो.

बॉर्डर गावस्कर ट्रॉफीच्या शेवटच्या कसोटी सामन्यात बुमराहला दुखापत झाली होती.



पाठीच्या दुखापतीमुळे तो सध्या सुरू असलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीमधूनही बाहेर पडला.

गेल्या आयपीएलमध्ये मयंक यादवला दुखापत झाली होती. तेव्हापासून त्याने फक्त ३ देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. त्याला स्नायूंच्या ताणाचा त्रास होत आहे. सूत्रांच्या हवाल्याने वृत्तात म्हटले आहे की, बुमराह मुंबई इंडियन्सकडून पहिले तीन किंवा चार सामने खेळू शकणार नाही. त्याने गोलंदाजी सुरू केली आहे, मात्र तो अद्याप पूर्ण ताकदीने गोलंदाजी करत नाही.

# कोल्ट्स, मस्कीटर्स संघांची आगेकूच कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लब आयोजित आठव्या पीवायसी विनसिस रॅकेट लीग स्पर्धेत कोल्ट्स, मस्कीटर्स या संघांनी तिसरा विजय, तर, तलवार्स संघाने पहिला विजय नोंदवला.

पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या टेबल टेनिस, टेनिस व बॅडमिंटन कोर्टवर सुरु असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत तलवार्स संघाने रॅकेट्स संघाचा १२-०९ असा पराभव करून पहिला विजय मिळवला. बॅडमिंटन प्रकारात समीर जालन, विनीत रुकारी, गिरीश खिंवसरा, तुषार मेंगळे, विक्रम ओगळे, इशान कुदळे, मंदार विंझे, रोहन जोशी यांच्या विजयी कामगिरीच्या जोरावर रॅकेट्स संघाने तलवार्स संघाचा ४-३ असा संघर्षपूर्ण पराभव केला. टेबल टेनिस मध्ये रॅकेट्स संघाने तलवार्स संघाचा ५-२ असा पराभव करून संघाला आघाडी मिळवून दिली. टेनिस मध्ये तन्मय चोभे, जयदीप वाकणकर, केदार देशपांडे,



अभिजीत गानू, रोहन जमेनिस, शैलेश लिमये, अयान जमेनीस, अनुज साबडे, अनिश राणे, रोहन राजापुरकर, निनाद देशमुख, प्रीती मराठे, कुणाल भुरट, धृव देशपांडे यांच्या सुरेख खेळीच्या जोरावर तलवार्स संघाने रॅकेट्स संघाचा ७-० असा एकतर्फी पराभव करून संघाला विजय मिळवून दिला.

दुसऱ्या सामन्यात कोल्टस संघाने स्पिअर्स संघाचा १५-०६ असा पराभव तिसऱ्या विजयाची नोंद केली. बॅडमिंटन मध्ये केदार नाडगोंडे, आर्य देवधर, अनिकेत सहस्त्रबुद्धे, अभिजीत राजवाडे, रिआन करंदीकर, इशान भाले, कर्णा मेहता, चंद्रशेखर आपटे, विमल हंसराज, अमर श्रॉफ, कुणाल शहा, वरद चितळे यांच्या अफलातून खेळीच्या जोरावर कोल्टस संघाने स्पिअर्स संघाचा ६-१ असा पराभव संघाला चांगली सुरुवात करून दिली. टेबल टेनिसमध्ये मिहिर ठोंबरे, वर्षा बदामीकर, कौस्तुभ देशपांडे, चैतन्य वाळिंबे, नकुल बेलवलकर, इशान भाले, कुणाल शहा, क्षितिज कोतवाल, आर्यन सुतार यांच्या सुरेख खेळीच्या जोरावर कोल्टस संघाने स्पिअर्स संघाचा ५-२ असा पराभव करून संघाची आघाडी अधिक भक्कम केली.

# आरसीबीचा पराभव; प्लेऑफच्या ३ संघांवर शिक्कामोर्तब




**बंगलुरू :** वूमन्स प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत युपी वॉरियर्सने शनिवारी (८ मार्च) रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाविरुद्ध १२ धावांनी विजय मिळवला. या विजयासह युपीने स्पर्धेचा शेवट गोड केला आहे. या सामन्यापूर्वीच युपी प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर झाले होते. पण आता त्यांच्या विजयामुळे गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे आव्हानही संपले आहे. युपी आणि बंगळुरू यांचे आव्हान संपल्याने आता प्लऑफमधील संघ निश्चित झाले आहेत. दिल्ली कॅपिटल्सने आधीच प्लेऑफमधील स्थान पक्के केले आहे. याशिवाय आता मुंबई इंडियन्स आणि गुजरात जायंट्स संघाचेही प्लेऑफमधील स्थान निश्चित झाले आहे. या सामन्यात विक्रमी २२६ धावांचे लक्ष्य युपीने बंगळुरू संघासमोर ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना बंगळुरूला १९.३ षटकात सर्वबाद २१३ धावाच करता आल्या. त्यामुळे बंगळुरूचे या स्पर्धेतील आव्हानही संपले. युपीच्या विजयात जॉर्जिया वॉल आणि सोफी इक्लेस्टोनचे मोलाचे योगदान राहिले. बंगळुरूकडून कर्णधार स्मृती मानधनासह सलामीला फलंदाजीला उतरलेल्या शबनेनी मेघनाने आक्रमक सुरुवात केली होती. पण तिसऱ्याच षटकात मानधना ४ धावांवर बाद झाली. पुढच्याच षटकात १२ चेंडूत २७ धावा करून मेघनाही बाद झाली. एलिस पेरी आणि राखवी बिश्त यांनी डाव पुढे नेण्याचा प्रयत्न केला होता. पण ७ व्या षटकात १५ चेंडूत २८ धवा करणाऱ्या पेरीला अंजली सर्वानीने त्रिफळाचीत करत बंगळुरूला मोठा धक्का दिला. पाठोपाठ राघवीला चिनाल हेन्रीने १४ धावांवर बाद केले. कनिका अहुजाही ८ धावांवर बाद झाली. पण जॉर्जिया वेरहॅमने ऋचा घोषला चांगली साथ दिली. ऋचाने आक्रमक खेळताना बंगळुरूला विजयाच्या जवळ नेण्याचा प्रयत्न केला.

# सुर्योदय रायझर्स, गजर सुपरनोव्हाज्, गुरूजी तालिम टायटन्स् संघांची विजयी आगेकूच !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुनित बालन ग्रुप तर्फे आयोजित पुण्यातील गणपती मंडळ, नवरात्र मंडळ, ढोल-ताशा पथकांच्या संघांचा समावेश असलेल्या चौथ्या 'फ्रेंडशिप करंडक' क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत रंगारी रॉयल्स्, शिवमुद्रा ब्लास्टर्स, सुर्योदय रायझर्स, गजर सुपरनोव्हाज्, गुरूजी तालिम टायटन्स्, रमणबाग फायटर्स, साई पॉवर हिटर्स आणि श्रीराम पथक या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी आगेकूच केली.

सहकारनगर येथील ल.रा. शिंदे हायस्कूल येथील मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत वैभव



आव्हाळे याने केलेल्या कामगिरीमुळे सुर्योदय रायझर्स संघाने कसबा कसबा सुपरकिंग्ज् चा १० गडी राखून सहज पराभव केला. सुशांत तळेकर याने फटकावलेल्या नाबाद ७३ धावांच्या जोरावर साई पॉवर हिटर्सने दगडुशेठ वॉरीयर्स संघाचा ९ गडी राखून पराभव केला. अनिल काक्केरी योन केलेल्या नाबाद १०५ धावांच्या जोरावर गजर सुपरनोव्हाज् संघाने जोगेश्वरी जॅग्वॉर्स संघाचा १०० धावांनी एकतर्फी पराभव केला आणि आगेकूच केली. निलेश एस. आणि हरनीश दानी यांनी केलेल्या फलंदाजीमुळे रंगारी रॉयल्स् संघाने युवा योद्धाज संघाचा ६२ धावांनी पराभव करून आगेकूच केली.

रोहन शेडगे याने केलेल्या नाबाद ६१ धावांमुळे गुरूजी तालिम टायटन्स् ने तुळशीबाग टस्कर्स संघाचा १० गडी राखून सहज पराभव केला. सागर पुरी याने आणि गोलंदाजांच्या अचूक कामगिरीमुळे श्रीराम पथक संघाने मंडई मास्टर्स संघाचा ३६ धावांनी पराभव केला. सत्यजीत पाळे याने केलेल्या अर्धशतकी खेळीमुळे रमणबाग फायटर्स संघाने सुर्योदय रायझर्सचा ८ गडी राखून पराभव केला. रूपक तुबाजी याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे शिवमुद्रा ब्लास्टर्सने जोगेश्वरी जॅग्वॉर्सचा ९ गडी राखून पराभव केला आणि आगेकूच केली.

# चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलवर ५ हजार कोटींचा सट्टा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** रविवारी दुबईमध्ये भारत आणि न्यूझीलंड यांच्यात चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना खेळला जाईल. या सामन्यावर ₹५,००० कोटींपर्यंतचा सट्टा लावण्यात आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय स्तरावर पसरलेल्या एका अंडरवर्ल्ड नेटवर्कद्वारे ही सट्टेबाजी होत आहे. यामध्ये दाऊद इब्राहिमची डी कंपनी सहभागी असल्याचाही संशय आहे.

भारत हा आंतरराष्ट्रीय बुकींचा आवडता संघ आहे. प्रत्येक मोठ्या सामन्यादरम्यान, जगभरातील मोठे बुकी दुबईमध्ये जमतात. दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने अंतिम सामन्यापूर्वी पाच मोठ्या बुकींना अटक केली आहे. ते सर्वजण उपांत्य फेरीच्या सामन्यांवर सट्टा लावत होते. चौकशीनंतर तपास दुबईपर्यंत पोहोचला आहे.

पहिली अटक परवीन कोचर आणि संजय कुमार नावाच्या दोन बुकींना करण्यात आली. भारत-ऑस्ट्रेलिया सेमीफायनलवर सट्टा लावताना दोघांनाही रंगेहाथ पकडण्यात आले. पोलिसांनी त्यांच्याकडून लॅपटॉप आणि फोन जप्त केले आहेत. दुसरी अटक देखील दिल्लीतून करण्यात आली. यामध्ये मनीष साहनी, योगेश कुकरेजा आणि सूरज हे तीन आरोपी पकडले गेले. हे सर्वजण दुबईच्या बुकी गँगशी संबंधित होते.

# स्नूकर स्पर्धेत चिंतामणी जाधव, स्वप्नील बिचे, साद सय्यद, वैभव मालखेडेंची विजयी सलामी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना यांच्या वतीने व आरसीबीसी आणि अमनोरा स्पोर्टस क्लब(द फर्न) यांच्या सहकार्याने आयोजित पीवायसी मोतीलाल ओसवाल खुल्या स्नूकर स्पर्धेत चिंतामणी जाधव, स्वप्नील बिचे, साद सय्यद, वैभव मालखेडे, आशिष हुले यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजयी सलामी दिली.

पीवायसी हिंदू जिमखाना, आरसीबीसी आणि अमनोरा स्पोर्टस क्लब(द फर्न) या ठिकाणी आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत चुरशीच्या लढतीत चिंतामणी जाधवने अमित डहाळेचा



३-२(५१-६५, २०-५५, ५९-२७, ५१-४१, ६१-३५) असा तर, स्वप्नील बिचेने जयराज सोनीचा ३-२(६४-१५, ३०-५५, ४६-६६, ७६-४४, ६४-३२) असा संघर्षपूर्ण पराभव केला. साद सय्यदने समीर मानेवर ३-०(७७(४७)-००, ६४-१७, ७८-१८) असा एकतर्फी विजय मिळवला.

याआधी स्पर्धेचे उद्घाटन मोतीलाल ओसवाल प्रायव्हेट वेल्थचे महाराष्ट्राचे हेड प्रणव कृष्णा, ॲक्सिस ॲसेट मॅनेजमेंटच्या सर्कल मॅनेजर स्नेहा शर्मा, पीवायसी हिंदू जिमखानाचे मानद सचिव आणि सह सचिव सारंग लागू यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संचालक अरुण बर्वे व सलील देशपांडे, आरसीबीसीचे ऋषी रामय्या, समर खंडेलवाल, निशाद चौघुले आदी मान्यवर उपस्थित होते.

## बोधचिन्ह म्हणून 'बिबट्या'चा प्रथमच वापर

# राज्य कबड्डी स्पर्धेचे ठाण्यात आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेच्या मान्यतेने व ठाणे जिल्हा कबड्डी संघटना, विश्वास सामाजिक संस्था, ठाणे यांच्या सहकार्याने पुरुष व महिला गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करीत आहे. ठाण्यातील कॅडबरी कंपनी समोरील जे. के. केमिकल कंपनीच्या क्रीडांगणावर १९ ते २३ मार्च २०२५ या कालावधीत ही स्पर्धा रंगेल. राज्य अजिंक्यपद स्पर्धेच्या निमित्ताने पहिल्यांदाच ठाण्याने 'बिबट्या' या बोधचिन्हाचा



वापर करण्यात आला आहे. अहिल्यानगर येथे झालेल्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत 'बारशिंगे' याचा बोधचिन्ह म्हणून वापर करण्यात आला होता.

सर्व सामने मातीच्या सहा क्रीडांगणावर खेळवण्यात येणार असल्यामुळे त्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. सर्व सामने सायंकाळच्या सत्रात प्रखर विद्युत झोतात खेळवण्यात येणार आहेत. कबड्डी रसिकांना खेळाचा आनंद मनमुराद घेता यावा म्हणून १० हजार क्षमतेची प्रेक्षक गॅलरी उभारली जाणार आहे.

सर्व संलग्न जिल्हा संघांनी आपले संघ १८ मार्च रोजी दुपारी १२ वाजल्यानंतर स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित करावे. त्याच दिवशी खेळाडूंची वजने घेतली जातील. रेल्वेने येणाऱ्या संघाकरिता ठाणे रेल्वे फलाट क्रमांक एकवर स्वागत कक्ष उभारण्यात येणार आहे. जिल्हा संघांनी आपल्या आगमनाची पूर्व सूचना दिल्यास त्यांना स्पर्धेच्या ठिकाणी पोहोचविण्याची व्यवस्था करता येईल, अशी माहिती एका पत्रकाद्वारे स्पर्धा आयोजन समितीचे प्रमुख संजय वाघुले, ठाणे जिल्हा कबड्डी संघटनेचे अध्यक्ष कृष्णा पाटील व सचिव मालोजी भोसले यांनी दिली.

#रा